साप्ताहिक माणूस

२३ एप्रिल ८३ दोन रूपये

## डसला ग बाई डसला

काल रात्री अंगावरी, उमटला ग डाग
कवटाळून सर्वांगाला, चावला जणू नाग ।।
डोळ्यापुढे अजून उभा, उभारलेला फणा
इथे तिथे कुठे कुठे, उमटल्या ग खुणा ।।
सळसळतं होतं चैतन्य त्याच्या अंगात
धुंदीत मस्तीत, आला होता रंगात ।।
कसकसतंय अंग. उरला मादक अंश
'नको' म्हणते तरी, हवा वाटतो ग दंश ।।
ही किमया कोणाची? शक्ती जोम ताकद
तारुण्य आरोग्य यासाठी नवी आयुर्वेदिक कॅप्सूल

एनर्जी फोर्टे

23-2-83

निर्माते– इंडो जर्मन फार्मास्युटिकल्स, मुंबई– ८३, एनर्जी फोर्टे, फोमिनार्ईन फोर्टे, अस्थासॉल बॅलर्जीगान या सर्व कॅप्सूल्सचे विभागीय वितरक:– इंदिरा मेडिकल स्टोअर्स, नेहरू रोड, नाशिक.

## कुठून? कशी? किती? कुणी?

राया तुला, आली एनर्जी कुठून ?
समजत होते, आज हे गेलं कळून ।।
सख्या तुला, आली एनर्जी कशी ?
[illegible] ।।
राया तुला, आली एनर्जी किती ?
[illegible] ।।
राजा तुला, दिली एनर्जी कुणी ?
एनर्जी फोर्टे आयुर्वेदिक कॅप्सूल गुणी ।।

[illegible]र्जी फोर्टे

(फक्त पुरुषांनी) घेण्याकरिता
[illegible] विभागीय वितरक :
[illegible]पुर्वेद रसशाळा डेपो, [illegible] संघ, कोल्हापूर.

नवी दिल्ली [प्रेट्र]:– तरुण पिढी-वर विपरीत परिणाम करणाऱ्या अश्लिल वाङ्मयाचा प्रसार थांबविण्यासाठी सध्याच्या कायद्यातील राहिलेले दोष वा त्रुटी सुधारून योग्य ती उपाययोजना केली जाईल, असे आश्वासन गृह राज्य-मंत्री पी. व्यंकटसुब्बय्या यांनी प्रो. सत्य-साधन चक्रवर्ती व खा. महंमद असीर अहमद यांनी विचारलेल्या प्रश्नास उत्तर देताना लोकसभेत दिली.

# अश्लील वाङ्मय प्रसाराविरुद्ध उपाय योजणार ?

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : बाविसावे

अंक : पंचेचाळीसावा

□

२३ एप्रिल १९८३

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

□



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

सुभाष अवचट


पुणे वार्ता

# प्रदर्शन : परिवर्तनासाठी !

येथे जाती-धर्मांच्या स्त्री-पुरुषांना मुक्त प्रवेश आहे. हुकुमावरून. असे 'खाकी' कोरडे-पणाने लटकणारे टाइमपास फलक सार्वजनिक ठिकाणी आपण नेहमीच पहातो. त्यातला 'हुकुम' गाळून ही पाटी प्रेमानं इथले स्त्री-पुरुष आपल्या छातीला लटकावतील अशा अपेक्षेनं पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात नुकतंच एक प्रदर्शन लावलं आहे. प्रदर्शनाचे संयोजक 'सुगावा' प्रकाशन. आणि प्रदर्शनाचा विषय आहे 'समाजपरिवर्तनासाठी आंतरजातीय विवाह' प्रदर्शनातील चित्र-कल्पना आणि मांडणी 'आमची पंधरावी कला.'

समाजपरिवर्तनासाठी आंतरजातीय विवाहांचा पुरस्कार करणारं 'सुगावा' प्रकाशनाचं हे दुसरं माध्यम. गेल्याच महिन्यात याच विषयावरची फक्त दीड रुपया किंमत असलेली एक छोटी पुस्तिका 'विषमतेचा पुरस्कर्ता मनू' या पुस्तकाबरोबर सुगावानं प्रकाशित केली होती. त्या छोटयाश्या पुस्तिकेचं दृश्य स्वरूप म्हणजे हे प्रदर्शन.

भारतातल्या शेकडो जाती-पोटजाती, त्यांचं वेगळेपण, एकमेकांपासून दूर रहाणं आणि यालाच विविधतेतली एकता-एकात्मता म्हणून आपल्या संस्कृतीचा आपणच गौरव करणं या वृत्तीकडे बोट दाखवून प्रदर्शनाला सुरुवात होते. त्यापाठोपाठ जात कशी जोपासली जाते याचे दाखले एका फलकावर दाखवले आहेत. धार्मिक सण-उत्सवात वेगवेगळं स्थान, जातिनिहाय व्यवसाय, खाण्या-पिण्याच्या, बसण्या-उठण्याच्या वेगवेगळ्या पद्धती, जातीवाचक नाव-आडनाव जातीय संघटनांची (पोटजातीय सुद्धा !) जोपासना आणि हे सातत्य टिकवण्यासाठी जातीतच लग्न अशी वेगवेगळी कारणं या फलकावर मांडली आहेत.

जातींची जोपासना होते ही आपल्या-आपल्या जातीच्या शुद्धपणाच्या किंवा अस्सलपणाच्या अभिमानातूनच. हे खोडून काढणारा अभ्यासू विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञांचा निष्कर्ष प्रदर्शनात याच्यापाठोपाठच येतो की, कोणतीही जात शुद्धपणाचा दावा करू शकणार नाही. आर्य, द्रविड, शक, हूण, कुशाण, गुर्जर, क्षत्रीय, अमीर आणि यवन अशा दहा परस्पर आणि परकीय वर्णसंकरांतून असंख्य जाती आणि पोटजाती तयार झाल्या आहेत. जगातले सर्व वंश निग्रोलॉईड, युरोपॉईड आणि मंगोलॉईड या तीन वंशांच्या मिश्रणातून तयार झाले आणि अनेक चेहरे, शारीरिक ठेवणी तयार झाल्या. अशा सुमारे ६५ ते ७० मानवी नमुन्यांचा एक सचित्र नकाशाही (Map of mankind) प्रदर्शनात आहे. या सगळ्या मानवी नमुन्यात जोपर्यंत एकाच प्रकारचे रक्तगट आहेत तोपर्यंत शुद्धतेचा दावा खोटाच असणार आहे.

जातीभेद नष्ट करण्यासाठी ज्यांनी वेळोवेळी आपले वैचारिक शस्त्र उगारले अशा अनेक व्यक्तींची उदा. स्वा. सावरकर, डॉ. आंबेडकर, स्वामी विवेकानंद, दयानंद सरस्वती, महात्मा गांधी यांची अवतरणे प्रदर्शनातील फलकांवर मांडली आहेत. जात्युच्छेदक निबंधात सावरकरांनी लिहिलं आहे– 'सूतमगधादिकांपासून ते शुद्रपुरुषसंबंधाने ब्राह्मण स्त्रीस झालेल्या आणि चंडाळ म्हणून मानलेल्या आमच्या पूर्वास्पृश्य बांधवांपर्यंत ब्राह्मणादिक वर्णांचे रक्तबीज संकीर्ण झाले आहे. आमच्या सर्व जातींच्या नसानसातून परस्परांचे रक्त प्रवाहत आहे ही गोष्ट कोणास नाकारता येणे शक्य नाही.' सावरकरांनी हा विचार मांडून इतकी वर्षं झाल्यानंतरही रक्तशुद्धीची कल्पना अजूनही आपण मोडून काढू शकत नाही.

आपल्या भागातली जातीयता नष्ट करण्यासाठी आपल्याला व्यक्तिगत पातळीवर काय करता येईल हे प्रदर्शनात फार चांगल्या रीतीनं मांडलं आहे.

अमूक जातीत जन्मला म्हणून वरचा,

तमुक जातीत जन्मला म्हणून तो खालचा असं म्हणता येईल का ? वंशपरंपरेनंच आपण वरचढ आहोत असा जात्यभिमानी लोकांचा दावा चुकीचा नाही का ? वंशपरंपरेने टिकून रहाणारे गुणधर्म, उंची, रक्तगट बुद्धी, रंग आणि आनुवंशिक आजार किंवा प्रतिकारशक्ती येवढेच आहेत आणि हे गुणधर्म कोणत्याही एका जातीची मक्तेदारी नाही असं असतानाही आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणं वंशभेद म्हणजेच जातीभेद असं समजणं चुकीचं नाही का ? असे अनेक प्रश्न या प्रदर्शनाच्या निमित्तानं उभे रहातात.

आज जाती–पोटजातींवर आधारित संस्था–संघटना स्थापन झाल्या आहेत, होत आहेत अशा संघटनात सामील व्हायचं की काही प्रातिनिधिक प्रश्नांसाठी म्हणून तयार झालेल्या संघटनात जायचं हे सुद्धा ज्यानं त्यानं ठरवायला हवं. जातीभेदनिर्मूलनाचे पारंपारिक उपाय–हरिजनांना मंदिरप्रवेश, सहभोजन, एक गाव एक पाणवठा आणि आंतरजातीय विवाह हे आजसुद्धा राबवणं तितकंच महत्त्वाचं आहे. याशिवाय आजच्या आधुनिकतेची गरज कोणती ? प्रदर्शनात म्हटलं आहे, जातीवाचक आडनावांचा त्याग करायला हवा. राजेंद्र मोहितेचं नाव राजेंद्र मानव असेल तर किंवा डॉ. जगन्नाथ मिश्रा असं म्हणण्यापेक्षा नुसतंच डॉ. जगन्नाथ म्हटलं तर किंवा आडनाव पूर्णपणे मोडीत टाकून नाव-आईचं नाव-वडलांचं नाव अशीच नाव लिहिण्याची पद्धत रूढ व्हायला हवी, हाही मुद्दा विचार करण्यासारखा आहे.

### कदाचित 'तुम्ही सुद्धा'

जातिभेद मोडण्यासाठी खरा उपाय आंतरजातीय विवाहच आहे असं डॉ. आंबेडकरांनी ठासून सांगितलं. म. गांधींचाही हाच विचार होता. माझ्या प्रभावाखाली येणाऱ्या सर्व मुलींना हरिजन मुलांशी लग्न करा म्हणून मी त्यांचं मन वळवेन असं 'हरिजन'-मधे त्यांनी म्हटलेलंच आहे. आंतरजातीय विवाहाचा हा विचार आपल्या समाजात अजूनही रूढ होत नाही याचं कारण लग्न ठरविण्याची आपली पद्धतच आहे. जुन्या जातीधर्मावर आधारित पत्रिका पहाण्यापेक्षा एक नवी मानवतावादी कुंडली निदान तरुण मुलांनी तरी पहायला हवी, तसा आग्रहच धरायला हवा, असा प्रदर्शनातला विषय आहे. ही कुंडली रक्तगट, स्वभाव, आनुवंशिक रोग यासारख्या वैज्ञानिक माहितीवर आणि तो/ती मानवतावादी आहे का ? हुंडा घेणार आहे का ? अशा मूल्यांवर आधारित असावी. जाति–धर्म–वंश यांचे किल्ले मोडून नवी नाती निर्माण करायला हवीत एवढंच सांगून प्रदर्शन थांबत नाही. यातल्या व्यावहारिक अडचणीही याचवेळी डोळ्यांसमोर ठेवलेल्या आहेत. फक्त भावनिक पातळीवर ठरवलेली आंतरजातीय लग्न यशस्वी होतीलच असं नाही. कारण आंतरजातीय विवाहांना अजूनही समाजमान्यता नाही. सामाजिक विरोधातून निभावून नेऊ शकू असा विश्वास, त्यासाठी आर्थिक स्वावलंबन आणि त्याहीपेक्षा एकमेकांच्या चुका सांभाळून घेऊन एक यशस्वी सहजीवन जगण्याची इच्छा तुमच्यात असेल तरच ही जातीची कुंपणं ओलांडण्यात अर्थ.

प्रदर्शनाच्या शेवटी काही यशस्वी आंतरजातीय विवाहांची उदाहरणं मांडली आहेत. त्यातलं महत्त्वाचं लक्ष्मण मान्यांचं. 'जाती मोडण्याच्या ध्येयानं तडीस नेलेला विवाह' अशी लक्ष्मण माने यांच्या लग्नाची केलेली जाहिरात मात्र खटकली. एखादी गोष्ट घडून गेल्यानंतर त्याचं असं उदात्तीकरण करावं की नाही किंवा त्याला मान्यता द्यावी की नाही हा अर्थातच संयोजकांचा आणि स्वतः माने यांचा प्रश्न आहे. 'उपरा' मधील लक्ष्मण माने यांच्या लग्नाची पार्श्वभूमी व नंतर जातीतल्या माणसांनी दिलेला त्रास वर्णन करणारा पुस्तकातला मजकूर प्रदर्शनात पुन्हा मांडून ती जागा वाया घालवल्यासारखं वाटलं. त्या जागी २/३ चांगले विचार नक्कीच मांडता आले असते.

राजकारण–समाजकारण–साहित्य–चित्रपट–खेळ अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील, आंतरजातीय विवाह करून यशस्वी झालेल्या माणसांची नांवं एका मोठ्या फलकावर मांडली आहेत. या यादीच्या शेवटी एक ओळ आहे– 'आणि आता कदाचित तुम्हीसुद्धा.'

या 'तुम्ही सुद्धा' प्रकारात जाण्यासाठी तरुण मुलं–मुली तसा विचार करायला प्रवृत्त होतील येवढी शक्ती या प्रदर्शनात आहे. चित्रकल्पना आणि मांडणी करणाऱ्या 'आमची पंधरावी कला' चा उल्लेख त्यासाठी करायलाच हवा. लाल–पांढरा–हिरवा–केशरी–निळा या ५/६ रंगांचा फार कलात्मक उपयोग या प्रदर्शनात आहे. रंगीत कागदाच्या कापलेल्या आकृती चित्रफलकावर चिकटवलेल्या आहेत. या आकृतींमधला जिवंतपणा–सळसळ चित्रातून ऐकू येते. 'हे कुंपण ओलांडायला हवं' या चित्रात कुंपण ओलांडणाऱ्या दोन आकृतींमधे दिसणारं तारुण्य–जोम लक्षणीय आहे. आंतरजातीय विवाहांना आपण मान्यता द्यायला हवी हे सांगणारं चित्रही असंच वेधक आहे. दोन मोठ्या हातांच्या ओंजळीत एक मुलगा–एक मुलगी उभे आहेत. त्यांचे हात पूर्ण फैलावले आहेत. जणू काही सगळं आकाश त्यांना कवेत घ्यायचं आहे. असं मोकळं आकाश कवेत घेणाऱ्यांना समाजानं अलगद ओंजळीत धरलं तर ? अशा अनेक चित्रांचा उल्लेख करता येईल. हुंड्याच्या हुंड्याला दिलेला लाल रंगही बरंच सुचवून जातो.

¤

लग्न ही बाब आपण किती व्यक्तिगत आणि किती सामाजिक समजतो हा प्रश्न या प्रदर्शनाच्या नावामुळं निर्माण होतो. समाजपरिवर्तनासाठी लग्न हा विचार स्वीकारणं सध्याच्या तरुण पिढीला शक्य आहे; पण समाजपरिवर्तनाचा मार्ग म्हणून आंतरजातीय विवाह हा विचार किती तरुण मुलं-मुली मान्य करू शकतील ? तसं करण्याचं सामाजिक मोकळेपण आपल्यात आहे का ? ज्यांचे विवाह असे यशस्वी झाले आहेत ती मुलं-मुली निधर्मी विचाराची आहेत किंवा औद्योगिक महानगरीय संस्कृतीत त्यांचे धार्मिक-जातीय कंगोरे आधीच बोथट झाले आहेत प्रश्न येतो तो अशा कंगोऱ्यातच–जिथे जातीय संस्कृती पूर्णपणे वेगळी असते. याचा विचार प्रदर्शनाच्या मर्यादित अवाक्यात मांडणं शक्य नसलं तरी त्या प्रश्नापाशीच जातीची कुंपणं पडतात हे विसरून कसं चालेल ? एकाच आर्थिक पातळीवरचे आंतरजातीय विवाह यशस्वी होतात हे महत्त्वाचं कारण. वागण्या-बोलण्याच्या–खाण्याच्या तसंच सांस्कृतिक गरजा बऱ्याचशा एक असतात एकमेकांच्या आधारानं त्या बदलताही येतात.

नंतर प्रदर्शनातली चित्रं ज्यानं काढली त्या संजय पवारशी बोलले. संजय म्हणतो माझ्या बरोबरची मुलं एखाद्या सणकीत असं लग्न करतील सुद्धा ! त्या पाठीमागं स्वतंत्र विचार करण्याची कुवत मात्र दिसत नाही.

लग्न अशी सणकीत होऊ नयेत किंवा समाजपरिवर्तनासाठी हुतात्मा बनण्याच्या तयारीनंही होऊ नयेत. अनुभवांच्या मोकळेपणातून ती व्हावीत एवढंच हे प्रदर्शन पाहून वाटलं.

–मेधा राजहंस

# मुंबापुरी

याच कॉलममध्ये दोनेक आठवड्यांपूर्वी आम्ही व्यक्त केलेलं होष्यमाण इतक्या लवकर खरं होईल असं वाटलं नव्हतं. मंडळी, महापौर सरदार मनमोहनसिंग बेदी कॅनडाला चाललेत. विकसनशील राष्ट्रांच्या महापौर-परिषदेसाठी !

खरं तर यात विशेष काहीच नाही. प्रत्येक वर्षी मेयर परदेशवारीची संधी येनकेनप्रकारेण पदरात पाडून घेतो. कधी-कधी तर ही नामी संधी मिळावी म्हणून मेयरमंडळी टपून बसलेली असतात. एखाद्या राजदूताला चहापानाला बोलवायचं आणि आपली यात्रा पक्की करून घ्यायची.

एरवी, मेयरच्या नाकी नऊ आणणारे नगरसेवक अशा पवित्र यात्रांना विरोध करत नाहीत. कारण हे सगळं परस्पर सह-कार्यानंच घडत असतं. 'आता माझी पाळी, उद्या तुझी पाळी.' असा सगळा सामंजस्याचा आणि परस्परांना संकटसमयी मदत करण्याचा सद्हेतू असतो.

या अशा आंतरराष्ट्रीय परिषदा तेच तेच विषय चघळत असतात. स्वस्त घरयोजना, रस्ते-बांधणी, मलनिःसारण, जलप्रदूषण अशा चावून चोथा झालेल्या विषयांवर रवंथ करायचं असतं. अगदीच काही नाही तर बंधुभाव, भ्रातृभाव वगैरे पेटंट विषय आहेतच की !

सदोदित आपापसात भांडणाऱ्या एकशे-चाळीस नगरसेवकांना भ्रातृभावाचे धडे द्यायचे सोडून बेदी आंतरराष्ट्रीय सेमिनार-मध्ये काय सांगणार कोण जाणे. ते सांगतात. आपण आपलं नुस्तं ऐकायचं.

सुकथनकर जेव्हा आयुक्त झाले तेव्हा त्यांनी महापौरांच्या परदेशवारीला हरकत घेतली होती. यासंबंधी काही मार्गदर्शक तत्त्वे आखण्यात यावी असं त्यांनी लिहून पाठवलं होतं. म्हणून त्या वेळचे महापौर डॉ. ए यू. मेमण यांना आपली रशिया-भेट रद्द करावी लागली होती.

मार्गदर्शक तत्त्वे वगैरे राहिली बाजूला, खुद्द सुकथनकरच गेल्या वर्षी माजी मेयर डॉ. पैंबरोबर जपानला जाऊन आले. आता बोला !

बेदीही असेच जाऊन येतील. त्यांचे आठ-पंधरा दिवस आनंदात जातील. गटारे तुंबण्याची थांबणार नाहीत. नळांना पूर येणार नाही. रस्ते खणलेलेच असतील. तुम्ही आम्ही बसगाड्यांना असेच लोंबकळत प्रवास करू. तेव्हा महापौर बेदींना इतकंच म्हणू, 'जल्दी आइयो पापे !'

## ज्ञानप्रकाशात.......

मंगळवार. १२ एप्रिल. सारा दिवस कसा शांत शांत. कोठेच काही नाही. निघण्यापूर्वी संध्याकाळी साडेसहाला फायर ब्रिगेडला फोन केला.

'काही आहे का हो विशेष ?'

आताच एक कॉल आहे. अब्दुल रहिमान स्ट्रीट इस्माइल बिल्डिंग.'

'मोठी आहे का आग ?'

'अजून काही कळलं नाही. सहा इंजिन्स पाठवली आहेत.'

फोटोग्राफरला घेऊन बाहेर पडलो. अब्दुल रहिमान स्ट्रीट म्हणजे क्रॉफर्डमार्केटच्या जरा पुढे.

आगीची सर्व दृश्ये सारखीच असतात. बघ्यांची प्रचंड गर्दी. ट्रॅफिक जाम. पोलीस, फायरब्रिगेडचे लोक ह्यांची धावपळ. सर्वत्र धूर आणि पायाखाली चिखल. मुंबईच्या आगींचे एक वैशिष्ट्य आहे. ह्या नेहमी दाट लोकवस्तीच्या भागातच लागतात !

ह्या आगीत काही दम नव्हता. साठ-सत्तर वर्षांची जुनी इमारत. वेडीवाकडी बांधलेली. तिन्ही बाजूंना दुकानांची प्रचंड गर्दी आणि एका बाजूला मशीद. इमारतीच्या मध्याशी असलेल्या दुकानातून धुराचे लोट बाहेर पडत होते. अजून ज्वाळा काही दिसत नव्हत्या. दुकान प्लॅस्टिकच्या खेळण्यांचे. अशी पन्नास-साठ दुकाने ह्या इमारतीत आहेत. ह्याला 'न्यू कटलरी मार्केट' म्हणतात.

मधल्या चिंचोळ्या गल्लीतून फायर-ब्रिगेडचे चार-पाच लोक आत शिरले. दुकानापर्यंत पाणी पोहोचण्याची मारामार. आम्ही मशिदीच्या गच्चीवर गेलो. सर्वत्र धूर भरून राहिलेला. त्यात फोटो कसला घेणार ?

फायरब्रिगेडने गच्चीवरून पाण्याचा पाइप घेतला. पाण्याचा जोरही व्यवस्थित होता. तासाभरात आग विझली असती. म्हणजे इतके दूर येऊनही 'कॉपी' काहीच नाही.

गच्चीवरून खाली निघताना काही तरी कोसळल्याचा आवाज आला. मधल्या एका दुकानाचे छप्पर कोसळले होते. सर्वत्र एकच गोंधळ. गर्दी आणि धूर ह्यातून बाहेर पडणे मुष्कील झालेले.

ह्या सगळ्या गडबडीत एक बाई अचानक समोर आल्या.

'सगळी नावे घेतली ना लिहून ?'

बाई गुजराती दिसल्या; पण मराठी स्वच्छ.

आमचे कॉर्पोरेटर पण आले आहेत.

धुराने डोळे चुरचुरत होते. काहीच स्पष्ट दिसत नव्हते.

'तुम्ही ?'

'मी ? जसवंतीबेन मेहता. जनता पार्टी.'

एव्हाना लोक डॉक्टर घेऊन आले. गल्लीच्या तोंडाशी ॲम्ब्युलन्स उभी केलेली. छप्पर कोसळल्याने फायरब्रिगेडचे दोन लोक आत अडकले होते. चार लोक आधीच जे. जे. ला पाठवले होते. अर्ध्या तासाच्या धडपडीनंतर त्यातल्या एकाला ढिगाऱ्यातून बाहेर काढले. हरिश्चंद्र भोगले. हातपाय भाजलेले. जबर जखमी. छातीवर, चेहऱ्या-वर माती आणि चिखल. फोटोग्राफर्स पुढे धावले. एका मिनिटात ॲम्ब्युलन्स जी. टी. हॉस्पिटलकडे !

पुढच्या दहा मिनिटात आम्हीही निघालो. ऑफिसला पोहोचल्यावर जी. टी.ला फोन केला

'अहो, तो फायर ब्रिगेडचा पेशंट कसा आहे ?'

'आता पाच मिनिटापूर्वीच आणला. वाटेतच खलास झालाय !'

'मी एक तासापूर्वी त्याला आत शिरताना पाहिले होते.

दिवस शांत असला तरी माणसे किती चटकन मरतात. साडेबारापर्यंत दुसराही मरण पावलेला.

गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये फ्लोरा फाउंटन-जवळच्या हँडलूम हाउसला मोठी प्रचंड आग

लागली होती. त्यात मेहेर पोस्तवाला नावाची तेवीस वर्षांची एक पारशी मुलगी अडकली होती. फायरब्रिगेड आणि पोलिसांना न जुमानता ऑफिसचे काही सामान आणण्यासाठी ती आत घुसली आणि वरच्या तुळया कोसळल्याने यायचा मार्ग बंद झाला.

तब्बल छत्तीस तास तिची आई आणि बहीण रस्त्यावर वाट पाहत उभ्या. तहानभूक कशाचेच भान नाही. तिसऱ्या दिवशी रात्री साडेअकराला मेहेरचा शोध लागला. तिचा मृत्यू बहुधा गुदमरण्यानेच झाला असावा. शरीरावर जखम नाही. भाजल्याच्या खुणा नाहीत. फायरब्रिगेडचे लोक थेट स्ट्रेचर घेऊन ॲम्ब्युलन्सपर्यंत आले. मेहेरची बहीण पुढे आली. तिला मेहेरला पाहायचं होतं आणि नव्हतंही!

फायर ब्रिगेडच्या माणसाने हलक्या हाताने मेहेरच्या हातातले घड्याळ सोडवून घेतले. तिचा हात हलला. हिला आपली वेडी आशा मेहेर जिवंत असेल! ॲम्ब्युलन्स तत्काळ मॉर्गकडे निघाली. रात्रीचे पावणेबारा वाजत आले होते. आता जाऊन लिहिणार काय? मी ऑफिसकडे निघालो तेव्हा वाटेत थांबवून एक माणूस म्हणाला होता,

'भाई, जरा हमारा नाम लिखना फाउंटन मित्रमंडळ.'

आणि इथेसुद्धा निघताना इस्माईल बिल्डिंगमधल्या कटलरी मर्चंटस् असोसिएशनने आवर्जून त्यांचेही नाव लिहायला सांगितले होते.

दिवाकरांची एक नाटयछटा आहे– 'तेवढेच ज्ञानप्रकाशात!'

### इंप्रुव्हड अ लॉट

इंप्रुव्हमेंटच्या चेअरमन इंदुमती पटेल ह्यांची एक वर्षाची कारकीर्द संपुष्टात आली. गेल्या शनिवारी त्यांनी बिर्ला क्रीडा केंद्रात एक जंगी पार्टी दिली. त्याला रामराव आदिक, मुरली देवरा, महापौर मनमोहनसिंग बेदी, माजी महापौर प्रभाकर पै, रजनी पटेल ह्यांच्या पत्नी बकुल पटेल आणि इतर मिळून तीनशे तरी लोक हजर असतील. कमिटीचे चेअरमन्स सहसा अशी जेवणं घालीत नाहीत; पण इंदुमतीबाईंची गोष्टच वेगळी.

पार्टीत ऐकलेली एक कॉमेंट,

'शी हॅज इंप्रुव्हड अ लॉट विथ द कमिटी!'

–विष्णु जयदेव


# माणूस वासंतिक अंकात

'तू लग्न का करत नाहीस?'
'अमेरिकेत डोकावल्यावर'
'लग्न नावाचं खग्रास ग्रहण'
'माझा घटस्फोट'
'घरं हादरताहेत!'
'पूर्णांक–अपूर्णांक'
'माझं होणारं घर'
'पश्चिमरंग'
'आपण आपली मुलं....'

फक्त आपल्या–आपल्यापुरतं जगणाऱ्या आजच्या व्यक्तिवादी समाजातल्या विभक्त संस्कृतीचे हे काही भेदक तुकडे या कथा–लेखांमधला एखादा विषय कदाचित आपलासुद्धा असू शकतो. फक्त ते स्वीकारण्याची मनाची तयारी हवी.

आज आजूबाजूला काय दिसतं? घरातल्या माणसांचं परिपूर्ण सहजीवन हा एक प्रश्न बनलाय. माणसं मनानं एकमेकांपासून दूर पळताहेत, घटस्फोटांचं प्रमाण वाढलंय, एका विभक्त संस्कृतीचा जन्म झालाय.

या विभक्त संस्कृतीचा वेध घेण्यास एक खास वाचावा असा विषय माणूस वासंतिक अंकात–

# पाया हादरलेली घरं

# बायकांवरच्या अन्यायांचं विदारक चित्र

—न्या. व्ही. कृष्णा अय्यर

भारतीय घटनेचे मूलतत्त्व समानता हे आहे. या देशातील प्रत्येक स्त्री–पुरुषाला जाती, धर्म, लिंगभेद न करता सेवा, चाकरी आदि सर्व क्षेत्रात समान वागणूक दिली जाईल असे वचन भारतीय घटनेने दिले आहे; परंतु प्रजासत्ताक जन्मून एकतीस वर्षे झाली तरी अद्याप ही वचनपूर्ती शंभर टक्के झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. याचा प्रत्यय वारंवार येत असतो. विशेषत: स्त्रियांच्याबाबत याची विशेषत्वाने जाणीव होते. घटनेने दिलेला हा समानत्वाचा अधिकार मिळविण्यासाठी महिलांना न्यायालयांकडे धाव घ्यावी लागली आहे. 'या देशातील महिलांची स्थिती दलितांपेक्षाही हीन आहे', असे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. ज्योती त्रिवेदी म्हणाल्या.

श्रीमती ना. दा. ठा. विद्यापीठाने महिलांवर होणाऱ्या या अन्यायाबाबत वस्तुस्थिती सर्वांपुढे मांडण्यासाठी न्या. व्ही. कृष्णा अय्यर यांचे एक भाषण आयोजित केले होते. न्या. अय्यर हे पुरोगामी विचारांचे आहेत हे सुप्रसिद्धच आहे. न्यायमूर्तींच्या खुर्चीवर बसले असताही आपले पुरोगामित्व त्यांनी सोडले नाही. निवृत्तीनंतर तर ते या विचारांचा पाठपुरावा करण्यास मुक्तच झाले. त्यांनी हे आपले काम हिरीरीने चालविले आहे. विशेषत: स्त्री-अन्यायाविरुद्ध जनमत तयार करण्याचे व्रतच त्यांनी घेतले आहे. त्याचाच एक भाग म्हणजे त्यांचे हे व्याख्यान. विषय होता स्त्रीन्याय (जेंडर जस्टिस) – कायदा आपले वचन पाळील.

महिलांवर होणाऱ्या अन्यायाचे विदारक चित्र न्या. अय्यर यांनी आपल्या भाषणात उभे केले. चर्चगेटजवळील पाटकर सभागृहात सायं. ५.३० वा. हे व्याख्यान होते. चर्चगेट–परिसरात हजारो महिला मान मोडून काम करतात; पण त्यांच्याच अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आयोजित केलेल्या व्याख्यानाकडे मात्र त्या फिरकल्या नाहीत !

न्या. अय्यर यांनी मध्यमवर्गीय महिलांचे वर्णन वेठबिगार असे केले; पण त्या मध्यमवर्गीय महिला वाट जरा वाकडी करून पाटकर सभागृहाकडे वळल्या नाहीत. हे सभागृह पाऊण भरले होते. त्यात पुरुषांची संख्याही लक्षणीय होती. मुंबईसारखे शहर, चर्चगटसारखा विभाग, की जिथे सुशिक्षित महिला हजारोंच्या संख्येने येतात; पण त्यांच्याच प्रश्नावरील व्याख्यानाबाबतची त्यांची अनास्था जाणवणारीच होती

मध्यमवर्गीय महिलेला घर चालविण्याची गृहिणीची जबाबदारीही पार पाडावी लागते व कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी अर्थार्जनही करावे लागते. दुहेरी काम करून अधिकार मात्र काहीच नाहीत. विचार व आचार पतिराजांकडे पाहूनच करावयाचे. कचेरीतील सहा-आठ तास एवढेच स्वातंत्र्य तेही मर्यादित. म्हणून न्या. अय्यर म्हणतात की, मध्यमवर्गीय महिला म्हणजे 'वेठबिगार'.

पुरुष व स्त्री असा भेद करणे घटनेला अमान्य असले तरी प्रत्यक्षात मात्र 'पुरुष श्रेष्ठ' अशी सर्वांचीच वागणूक असते. मुलीला लहानपणापासून आई (म्हणजे महिलाच) आपल्या मुलीला जे वागणुकीचे धडे देते त्यातला पहिला धडा हाच असतो. बहीण व भाऊ यात भावाकडे झुकते माप. कारण तो पुरुष. हे कोण करते ? आई. मुलगा कुलदीपक म्हणून त्याच्याकडे थोडे जादा लक्ष. मुलगी दुसऱ्याच्या घरी जाणार तेव्हा तिच्यावर अधिक बंधने आणि यातूनच एक मनोवृत्ती निर्माण होते. ती मनोवृत्ती स्त्रियांवर अन्याय करते. माझ्या सासूने मला छळले म्हणून मी माझ्या सुनेला छळणार ! स्त्रीचा जन्म हा संसाराचे कष्ट उपसण्यासाठी, सारा कोंडमारा आणि छळ सहन करण्यासाठीच झाला आहे. असे हे चित्र अनादिकालापासून चालत आले आहे. या चित्राचे रंग तथाकथित सुधारलेल्या जगाबरोबर फिक्कट होण्याऐवजी जास्त गडद होत चाललेले दिसत आहेत. सामाजिक सुधारणा, समानता याच्या घोषणा झाल्या पण स्त्रीची परिस्थिती होती तशीच आज आहे व आणखी बराच काळ तशीच राहील असे दिसते.

### काही दरवाजे बंद

न्या. अय्यर यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच सांगितले की, पौराणिक काळापासून स्त्रीवर अन्याय होत आला आहे. देशाचे पंतप्रधानपद एका स्त्रीकडे गेले किंवा काही क्षेत्रात थोड्याशा स्त्रियांनी प्राविण्य दाखविले व मोठी पदे भूषविली, याचा अर्थ स्त्रियांना सर्वत्र समान वागणूक मिळाली असे मानता येणार नाही. अशी अनेक क्षेत्रे आहेत की, जिथे स्त्रियांना अद्याप प्रवेश मिळत नाही. साधी शिपायाची वा चोपदाराची नोकरी स्त्रीला मिळू शकत नाही. कारण काय तर ते काम अवजड असते व स्त्री नाजूक असल्यामुळे तिला ते जमणार नाही. उंच उंच इमारतींच्या बांधकामात स्त्रिया विटा, सिमेंट, दगड आदि अवजड सामान वाहून नेताना दिसतात; तिथे त्यांचा नाजूकपणा आड येत नाही. मग शिपायाच्या नोकरीतच तो एक अडसर कसा होतो ? केरळ कोर्टात याबाबत झालेल्या खटल्याची हकीगत त्यांनी सांगितली.

हवाईसेविका (पूर्वी त्यांना हवाईसुंदरी असे म्हणत. आता तसे म्हणणे योग्य होणार नाही. कारण आता निवड सौंदर्याच्या कसोटीवर होत नाही.) वयोमर्यादा-प्रकरणाचा इतिहासही त्यांनी कथन केला. ही आणि अशी अनेक प्रकरणे न्यायालयापुढे गेली; पण न्यायालयांनी या प्रकरणांचा विचार करताना योग्य दृष्टिकोण ठेवला नाही असे न्या. अय्यर यांचे म्हणणे. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांच्या प्रकरणात तर न्यायालये प्रत्यक्ष पुराव्याची अपेक्षा करतात. स्त्रीवर बलात्कार करणारी व्यक्ती काय साक्षीदार उभा करून असे कृत्य करील ? अशा प्रकरणी साक्षीदार मिळत नाही व गुन्हेगार सुटतात. याचे एक उदाहरण देताना ते म्हणाले की, खालच्या कोर्टात गुन्हेगाराला शिक्षा झाली, हायकोर्टाने त्यावर शिक्कामोर्तब केले; परंतु सर्वोच्च न्यायालयात मात्र तो सुटला ! कारण प्रत्यक्ष गुन्हा पाहिलेला साक्षीदार फिर्यादी पक्षाने उभा केला नाही. न्या. अय्यर यांनी न्यायालयावर टीका केली.

न्यायालयांनी आपला इंग्रजी कायद्यातून बघण्याचा दृष्टिकोण बदलला पाहिजे असे त्यांनी सुचविले.

न्या. सुजाता मनोहर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात न्या. अय्यर यांच्या या मुद्द्याला उत्तर दिले. न्यायालयांनी अनेक प्रकरणात गुन्हेगारांना शिक्षा दिल्या आहेत असे त्या म्हणाल्या व त्याची काही उदाहरणेही त्यांनी सांगितली. न्या. अय्यर हे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते हे ध्यानात घेता त्यांच्या टीकेला विशेष महत्त्व आहे. न्यायालयांनी आपला दृष्टिकोण बदलला पाहिजे हे त्यांचे म्हणणे.

महिला न्यायाधिशांची संख्या अगदीच अल्प आहे. किंबहुना नगण्यच आहे. उच्च न्यायालयातील खुर्चीवर एखादी स्त्री दिसते; पण त्याखालच्या न्यायालयातील खुर्च्यांवर स्त्रिया नाहीत. वकिली करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण जास्त वाटते; परंतु प्रत्यक्षात ते खूप कमीच आहे. बऱ्याच स्त्रिया वकिली व्यवसाय करतात. मग न्यायाधिशांमध्ये त्या का नाहीत ? याचे कारण एकच की, जिल्हा व त्याखालील न्यायालयातील न्यायाधिशांच्या वारंवार बदल्या होतात महिलांचे जीवन पतीबरोबर बांधलेले आहे. पतीची बदली झाली तर पत्नी त्याच्याबरोबर त्या गावी जाते; पण पत्नीची बदली झाली तर पती जाऊ शकत नाहीं म्हणून अशा नोकऱ्या स्वीकारण्यास महिला नकार देतात. न्या. अय्यर यांच्या मते ही परिस्थिती म्हणजेच स्त्रीवर अन्याय होय.

न्या. अय्यर यांनी आपल्या भाषणात ठासून सांगितले की, महिला न्यायाधिशांची संख्या भरपूर वाढविली पाहिजे म्हणजे स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायांचे खटले जेव्हा त्यांच्यापुढे येतील तेव्हाच स्त्रियांच्या बाजूने न्याय होईल. लगेच सुजाता मनोहर यांच्याकडे पाहून ते म्हणाले की, यावर सुजाता मनोहर म्हणतील की, त्या योग्य न्याय देणार नाहीत असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. सुजाता मनोहर यांची उच्च न्यायालयातील कामगिरी पाहिली तर असे कोण म्हणेल ? स्त्रिया जास्त योग्य न्याय देऊ शकतील. न्या. अय्यर यांना सुचवावयाचे होते की, न्यायाधिशांमध्ये स्त्रियांचे प्रमाण खूप वाढविले पाहिजे.

## त्यांनाही पिस्तूल द्या !

यानंतर न्या. अय्यर पोलीसखात्याकडे वळले. होय, पोलीसखात्यात अलीकडे महिलादल असते; पण त्यांच्याकडे काम काय ? तर वाहतूकनियंत्रण आणि मोर्चातील महिलांना अटक करून पोलीसव्हॅनमध्ये कोंबणे पोलीसदलात महिला आहेत एवढे म्हणण्यापुरत्याच महिला तिथे आहेत. हातात पिस्तूल घेऊन गुन्हेगाराच्या शोधात निघालेली महिलापोलीस कधी दिसते ? ते काम महिलांना जमणार नाही असेच आपण धरून चालतो. पोलीसदलात अर्ध्या महिला घ्या आणि त्यांच्या हातात पिस्तुले द्या ! महिलांवर होणारे अत्याचार ताबडतोब थांबतील !

त्यांच्या भाषणातील जोम व मुद्दा मांडण्याचा ठोसपणा पाहून असे वाटले की, खरोखरच पोलीसदलातील महिलांना पिस्तुले द्यावीत. हातात पिस्तुले घेतलेल्या शेकडो महिला–पोलिसांची पथके डोळ्यांसमोरून झर्कन गेली. युद्ध–आघाडीवर लढणाऱ्या इस्रायली महिलांच्या पथकांची दृश्येही आठवली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या दिशेने कूच करणाऱ्या सैन्यातील खाकी गणवेशधारी तुकड्याही दिसल्या; पण तो सर्व भास !

भारताच्या इतिहासात वीरांगनांची एक मालिकाच आहे. झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर, चांदबिबी यांनी रणक्षेत्रे गाजविली. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील अहिंसक स्वातंत्र्यलढ्यात तर शेकडो भारतीय महिलांनी भाग घेऊन देहदंड सोसला. महात्मा गांधी हे समानत्वाचे महान पुरस्कर्ते होते. महिलांना समान हक्क द्यावेत असे ते वारंवार सांगत. महात्मा गांधींचे हे स्वप्न अद्याप सत्यात उतरलेले नाही. स्वातंत्र्यासाठी हातात तलवार घेऊन घोड्याला टाच मारणारी झाशीची राणी, किल्ल्याला भगदाड पडताच तलवार परजीत खिंडारावर उभी राहणारी चांदबिबी किंवा महात्माजींच्या आदेशानुसार सत्याग्रहात भाग घेणाऱ्या हजारो महिला हा अपवाद. या महिला म्हणजे आम महिलासमाज नव्हे !

महिलांवर होणारा हा अन्याय भारतातच फक्त होतो काय ? तथाकथित सुधारलेल्या देशातही परिस्थिती फारशी निराळी नाही. म्हणूनच तिथे स्त्रीमुक्ती चळवळ चालवावी लागते. इंग्लंडसारख्या पुढारलेल्या देशात अगदी अलीकडच्या काळापर्यंत पुरुषापेक्षा स्त्रीला त्याच कामासाठी कमी पगार मिळत असे. इंग्लंडच्या लॉर्डसभागृहात स्त्रिया सदस्य नव्हत्या. इंग्लंडच्या गादीवर अनेक स्त्रिया बसून गेल्या; पण लॉर्डसभागृहात महिलांची नेमणूक झाली नाही !

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांची जी सनद जाहीर केली त्यात स्त्रियांना न्याय देणारी २, ७, १६, २३, २५ व २६ अशी सहा कलमे आहेत. सयुक्त राष्ट्रांच्या ७ नोव्हेंबर १९६७ च्या घोषणेतही लिंगभेदाला विरोध करण्यात आला आहे. महिलांच्या समान हक्कांवर गदा आणणारे कायदे रद्द करून महिलांना संरक्षण द्यावे असे त्यात म्हटले आहे. जगातील सर्व सरकारे, बिनसरकारी संघटना व व्यक्ती यांनी समानत्वाचे पालन करावे असे आवाहन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय मजूरसंघटनेनेही वेतनाबाबत स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. महिलांना प्रसूतिसंरक्षण देण्यावरही एक खास अधिवेशन घेण्यात आले. त्यामुळे मातृत्व ही सामाजिक जबाबदारी मानण्यात आली. कोपेनहेगेन येथे झालेल्या जागतिक परिषदेत महिलांबाबत राष्ट्रीय सरकारांनी पार पाडावयाच्या कर्तव्यांवर भर देण्यात आला. एकापेक्षा एक सुधारित आंतरराष्ट्रीय घोषणांचा भारतीय घटनेवर परिणाम झालेला आहे तरी पण भारतीय महिलांच्या स्थितीत व्हावा तितका बदल झालेला नाही. महिलांची छळणूक सुरूच आहे. हुंडा न मिळाल्यामुळे सुनांना छळले जाते, त्यांना जाळले जाते व बलात्कारांची प्रकरणे घडतात; पण गुन्हेगार सापडत नाहीत पुरुष व स्त्रियांच्या वेतनात अद्याप काही क्षेत्रात तफावत आहे. पुरुषाला मजुरी जास्त व स्त्रीला कमी, काम मात्र तेच, अशी परिस्थिती काही ठिकाणी आहे.

या देशातील ५० टक्के जनतेवर – महिलांवर – फार मोठा अन्याय होत आहे असे न्या. अय्यर यांनी सांगितले. या संदर्भात आणखी एका गोष्टीची इथे आठवण होते. महाराष्ट्र विधानसभेत आमदार कमलकिशोर कदम यांनी अलीकडेच एक बिनसरकारी विधेयक मांडून ५० टक्के शासकीय नोकऱ्या

महिलांसाठी राखून ठेवण्याची मागणी केली. शासनाने त्यांची ही मागणी काही मंजूर केली नाही आणि त्यांचे विधेयक मंजूर होऊ शकले नाही.

### सामान्य लोकांचं अज्ञान !

या देशात, इतकेच कशाला जगातच म्हटले पाहिजे, साधारणपणे ५० टक्के महिला आहेत. ज्या देशात लोकशाही आहे तिथे तरी निदान संसद व विधानमंडळातून ५० टक्के सदस्य महिला असावयास पाहिजेत; पण हे प्रमाण १५ टक्के तरी पडते की नाही याची शंका आहे, त्यामुळे मंत्रिमंडळातही त्यांना प्रतिनिधित्व कमी मिळते. अगदी पुढारलेल्या देशातही यापेक्षा निराळी परिस्थिती नाही हे ध्यानात घेतले पाहिजे. इंग्लंड–अमेरिकेतही सरकारी नोकऱ्या व संसदेत महिलांना ५० टक्के प्रतिनिधित्व नाही.

पुरुष मात्र वाटेल ते करू शकतो; पण स्त्रीवर मात्र अनेक बंधने असतात. राम वननासाला निघाल्याबरोबर सीतेला त्याच्याबरोबर जावे लागले; परंतु सीतेला जेव्हा वनवास घडला तेव्हा राम मात्र तिच्याबरोबर गेला नाही. सीतेला एकटीलाच वनवासात रहावे लागले. तेव्हा पौराणिक कालापासून स्त्रियांवर अन्याय चालू आहे असे न्या. अय्यर म्हणाले.

इस्लामधर्मीय चार लग्ने करू शकतो असे जे सांगितले जाते त्याबाबत न्या. अय्यर म्हणाले की, महमदाच्या याबाबतच्या वचनाचा चुकीचा अर्थ पुरुषांनी आपल्या स्वार्थासाठी लावला आहे. जो आपल्या सर्व बायकांना समान वागणूक देऊ शकेल त्यानेच एकापेक्षा जास्त विवाह करावे असे महंमद सांगतो. कोणीही व्यक्ती समान वागणूक देऊ शकत नाही म्हणून त्याने एकापेक्षा जास्त लग्ने करू नयेत. ख्रिश्चन धर्मानेही स्त्रियांना समान वागणूक दिली नाही. पाश्चात्य संस्कृतीतही स्त्रियांना गौण स्थान दिलेले आहे. आंतरराष्ट्रीय महिलावर्ष साजरे झाले तरी स्त्रियांना समान हक्क व वागणूक द्या म्हणून ओरड करावी लागते हे सर्वांत मोठे दुर्दैव !

यावर उपाय काय असा प्रश्न स्वाभाविकपणेच येतो. शासनाने सर्व आंतरराष्ट्रीय सनदा व घोषणांचा मान राखून आणि आपल्या राज्यघटनेतील तरतुदींप्रमाणे कायदे करावेत व अस्तित्वात असलेल्या कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. न्या. अय्यर तर म्हणतात की, हे कायदे करतात, ते अंमलात आणताना स्त्रियांच्या पारड्यात जास्त वजन टाकावे. आज ज्याप्रमाणे दलितांवर युगानुयुगे झालेला अन्याय दूर करण्यासाठी राखीव जागा आदि मार्गांनी जादा देण्याचा, त्या मार्गे त्यांना इतर समाजाबरोबर आणण्याचा प्रयत्न केला जातो, त्याप्रमाणे स्त्रियांना वागणूक द्यावी असे न्या. अय्यर यांचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे न्यायालयांनी स्त्री–समाजाभिमुख दृष्टिकोण घ्यावा असे त्यांना वाटते.

याबाबत जहाल कृतीची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली; परंतु राजकीय पक्षांपासून ती अलिप्त ठेवली पाहिजे; पण त्याही आधी जर कोणत्या गोष्टीची आवश्यकता असेल तर जनजागृतीची. आमजनतेला स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची प्रथम जाणीव करून दिली पाहिजे. सविस्तर माहिती दिली पाहिजे. ना. दा. ठा. विद्यापीठाने हे काम हाती घेतल्याबद्दल न्या. अय्यर यांनी विद्यापीठाला धन्यवाद दिले. केवळ पदव्या देणे एवढेच विद्यापीठाचे काम नसून अशा सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करणे हे विद्यापीठाचे काम आहे असे न्या. अय्यर म्हणाले. न्या. सुजाता मनोहर यांनी अशाच प्रकारच्या भावना व्यक्त करून विद्यापीठाचा गौरव केला.

श्री. ना. दा. ठा. विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ कन्टिन्यूड अँड अॅडल्ट एज्युकेशन विभागातर्फे हे व्याख्यान आयोजित केले होते. त्याआधी काही सामाजिक कार्यकर्त्या व कार्यकर्ते आणि पत्रकार यांची एक छोटीशी चर्चापरिषद घेण्यात आली. त्यातही या विषयावर प्रदीर्घ चर्चा झाली. त्या वेळी विद्यापीठ या प्रश्नावर एखादी चळवळ उभारू शकणार नाही; परंतु जनजागृती करू शकते असाच मुद्दा पुढे आला. सामान्य जनात याबाबत जे अज्ञान आहे ते दूर केले पाहिजे. विशेषत: महिलांना त्यांचे अधिकार, त्याबाबतचे कायदे यांची माहिती करून देणे आवश्यक आहे.

'Gender Justice' स्त्रियांना न्याय देण्याची अशी ही गंभीर समस्या आहे. ज्या देशाची पंतप्रधान एक स्त्री आहे त्याच देशात 'स्त्रियांना न्याय द्या' अशी मागणी करावी लागते. ज्या देशात स्त्री पंतप्रधान होते त्याच देशात स्त्रीला शिपायाची नोकरी करण्यास बंदी आहे. ज्या देशात स्त्री पंतप्रधान आहे त्याच देशात विवाह होताच स्त्रीला नोकरीला मुकावे लागते आणि म्हणून स्त्रीला समान हक्क द्या, आर्थिक स्वातंत्र्य द्या, न्याय द्या ! अशी मागणी करावी लागते.

–तुकाराम कोकजे


**दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल ! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्‌बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बाबुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

–ग. रा. जाधव
(केसरी, रविवार, ६–१२–८१)

## आंबेडकर भारत

लेखक : **बाबुराव बागुल**
**राजहंस प्रकाशन, पुणे.** मूल्य : २० रुपये.

# एनर्जी : दोन गीते, एक अर्थ-रस-ग्रहण

प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी

इथे रघुनाथाचिये नगरी।
भ्रष्ट लैंगिक-कौसळ चौफेरी।
वृत्तपत्र धंदा पोटभरी।
फसवून शिष्टजना॥
— खंडन 'खुस्रो'

ए के काळी निरोध (कंडोम) चा जाहीर प्रचार व जाहिरात केल्याबद्दल प्रो. रघुनाथ धोंडो कर्वे नामक कुटुंब–कल्याण–तत्त्वज्ञानाच्या प्रेषिताला शिष्ट व शिष्टांची कोर्टे यांचेकडून होणारे शारीरिक व मानसिक 'लिंचिंग' सोसावे लागले होते. (वाचा रघुनाथाची बखर) आज 'निरोध'ची जाहिरात शासन करते. गावाकडच्या मारुतीच्या देवळाच्या खडबडीत पाठीपासून ठीक रात्री १०.३० वाजेपर्यंत – काळ, स्थळ विचारात न घेता, सरकारी जाहिरातबाजी, किरकोळ अपवाद वगळता, योग्य म्हणायला हरकत नाही; पण जे शासन काही लोकप्रतिनिधींनी तक्रार करताच एखादे तिय्यम दर्जाचे प्रकाशन (आय अॅम् गिल्टीसारखे) 'बॅन' करायला सरसावते, तेच लोककल्याणहितदक्ष शासन अश्लील जाहिरातींकडे साफ दुर्लक्ष करते. उपरोक्त 'कुठून? कशी? किती? कुणी?' व 'डसला ग बाई डसला' या लिंगगंडप्रच्छन्न प्रदर्शनकारी जाहिरातीकडे ना लोकप्रतिनिधींचे लक्ष जाते, ना बहुजन हिताय–सुखायछाप शासनाचे!

सध्या 'बॉम्बे' नावाचे 'कॉंटॅक्ट' मासिक कॉंटॅक्ट मासिकाचे 'काम' लैंगिक पिसे भरलेल्या समानधर्म्यांची भेट घडवून आणणे, तेच उद्दीपक कार्य असल्या बाजारू जाहिराती वेगळ्या प्रकारे करतात. ही असली औषधे डॉक्टर्स वा वैद्य प्रिस्क्राइब' करणार नाहीत म्हणून व त्यांचा 'कौंटर–सेल' व्हावा म्हणून व 'मर्द' माणूस 'असली' व्यथा डॉक्टर-वैद्यापर्यंत सहसा नेत नाही हे माहीत आहे म्हणून या 'चेतक' जाहिराती दिल्या जातात. 'आय् अॅम् गिल्टी' मागे जसे विचारस्वातंत्र्यवाल्यांचा एक 'दंडुक' चमु आहे, तसाच एक बाजारू भांडवलदार कलीककॉकस या उद्दीपक औषधवाल्यांच्या मागे आहे! आता वरील दोन्ही लिंग–गीते वाचल्यानंतर मर्ढेकरांनी सांगितलेले 'बिंग' लक्षात यावे.

शिवलिंग माझे लिंग
तेच अशांतीचे बिंग'

सकृत्‌दर्शनी त्या दोन्ही लिंग–जातीत अश्लील शब्द नाही. एकही! परंतु शब्द–शब्दलैंगिकतेत 'चिंब'भिजलाय.' आर्ट लाईज (खोटे बोलणे, नव्हे) इन कन्सीलिंग आर्ट' प्रमाणे ऑबसीनिटी एक्सप्लोड्स् बाय कन्सीलिंग इट.' उघड अश्लील चित्र वा हावभाव-शब्द वा कृती यांच्याहून सूचक अश्लीलता त्याज्य आहे. पापा–पापांत निवडायचे तर स्थूल पाप सूक्ष्मपापापेक्षा करावे!

वास्तविक जाहिरातीत जाहीर झालेली मर्द–शक्ति सहसा विशिष्ट औषधाने, विशिष्ट ठिकाणी व विशिष्ट कर्मासाठी निर्माण करणे कठीण आहे हे वैज्ञानिक संशोधन आहे. तसेच लैंगिक सुख हे SEEKING मध्ये अधिक आहे FINDING मध्ये तेवढे नाही, हे उद्दीपक औषधांचे चतुर विक्रेते जाणून आहेत. सामर्थ्यवर्धक औषधे हा 'ड्रीम–सेलिंग' चा भाग आहे. विशेष म्हणजे जी प्रादेशिक वृत्तपत्रे आपण निष्कलंक व निष्ठावंत, भाषिक प्रादेशिक व खपाने कमी म्हणून 'गुणी' असा 'दुरभिमान' बाळगतात, ती जाहिरातींसाठी सेक्स–क्लीनिक्स, लैंगिक–शक्तिदायक औषधांची 'गिमिक्स' राजरोस छापून धंदेवाईक बाजारूपणाचे हे भांडवल वापरतात. मोठी वृत्तपत्रे एक प्रकारच्या हितसंबंधी टोळक्याचे प्रक्षेपक, तर छोटी–मध्यम वृत्तपत्रे स्वतःच्या नफेखोर वृत्तीची संवर्धक! औषधे खाणाऱ्यांना 'ताकद' येवो ना येवो, प्रादेशिक वृत्तपत्रांना ही 'सुकडी' सं–पोषक ठरते!

कुटुंब व विवाह यांसारख्या संस्था शिकताना माणसाच्या लैंगिक शक्तीचे प्रयोजन व नियोजन व त्यांची गरज शिकावी लागते. सर्वांत सावकाश (संख्येने) वाढणारा (एका जिवासाठी ९ महिने ९ दिवस); परंतु सतत लैंगिकदृष्ट्या 'जागा' असणारा प्राणी माणूसच आहे! १२ महिने १८ काळ, २४ तास व ३६५ दिवस त्याची लैंगिकतृष्णा ययाती बनून (वयात आल्यानंतर) सतत फुरफुरत राहते पाणी पडलेल्या तेलाप्रमाणे! या जाहिरातीदेखील प्राधान्याने पुरुष–लक्षी आहेत. धंदेवाईक बाजार–उठवळांचे (बाजारबसवीप्रमाणे शब्द!) पुरुषव्याधी (?) प्रधान समाजात पुरुषांवर रोख राहणे धंद्याच्या दृष्टीने 'सहज' आहे.

वास्तविक सेक्ससंबंधीचे शब्ददेखील सुरुंगासारखे असतात. लैंगिक कृती व तत्संबंधीची कल्पना अधिकच स्फोटक! पदवीधारकांचा व तज्ज्ञांचा सुळसुळाट वाढला, स्वैराचाराचीही फॅशन म्हणून लक्षणीय वाढ झाली (दारिद्र्य व वाढत्या लोकसंख्येबरोबर) पण लैंगिक गोष्टींविषयींचे अज्ञान डबक्यातील शेवाळाप्रमाणे मनोमन वाढतच आहे. सेक्सची जी काही केमिस्ट्री आहे, तिचा संबंध साक्षात मेंदूशी आहे, मांडीशी नाही, तरी औषधे विकणारे व विकत घेणारे झुंबड उठवत राहतात. पुरुषात लैंगिक 'इन्अॅडीक्वेसी'ची (अधुरेपणाची) भावना प्राय: काल्पनिक असते, त्यावर उपाय म्हणून डॉक्टरकडे जाण्याऐवजी तो गटारगप्पा ठोकणाऱ्या अशा जाहीरात–बद्ध औषधांकडे वळतो. सर्वश्री किनसी, मास्टर्स अॅण्ड जॉन्सन व रूबेन किंवा के. रघुनाथराव आदींचा 'सल्ला' घेण्यापूर्वी तो असल्या कुचकामी कुबड्यांचा 'आधार' घेऊन मोकळा होतो. ही असुरक्षितपणाची हत-पौरुष भावना हे उपरोक्त शक्तिदायक औषधी निर्मात्यांचे भांडवल आहे. तसल्या जाहिराती ह्या ते भांडवल गोळा करण्याच्या खिडक्या (कौंटर्स) आहेत.

असल्या कामशक्तिवर्धक – उद्दीपक औषधांना (ड्रग्जना) इंग्रजीत APHRODISIAC म्हणतात. अॅफ्रोडिटी या ग्रीक रतीवरून-कामदेवतेवरून हे नाव पडले आहे. त्याची व्याख्या अशी – 'Anything capable of increasing sexual desire or performance' (एनिथिंग केपेबल ऑफ इन्क्रीझिंग

सेक्स्युअल डिझायर ऑर पर्फामन्स ) म्हणजे कामेच्छा किंवा 'काप'–गिरी वाढवणाऱ्या कोणत्याही वस्तूला ॲफ्रोडिझीॲक म्हणावे. काही वनस्पती किंवा प्राण्यांचे अंग–अवयव घेऊन ती तयार केली जातात. एवढंच काय एखादे अश्लील पुस्तक किंवा ब्लू – फिल्मही 'ते' कार्य तेवढ्याच दमदारपणे निभावून नेऊ शकते. माणूस त्याच्या अनादि जन्मकालापासून केवळ चिरंजीव होण्याच्या ध्यासात नाही, तर तो ययाती, टिथोनस (ग्रीक–राजा) च्या रूपाने चिरयौवनाच्या शोधातही हरवलेला दिसतो ! हा त्याला वेडावणारा ध्यास आहे. लैंगिक सामर्थ्य व चेतनाप्राप्तीसाठी औषधाहून अधिक निरोगी शरीर, त्याहून अधिक निरोगी मेंदू म्हणजेच निरामय वृत्ती हवी, तेवढं सोडून तो काम–मृगाप्रमाणे उद्दीपक– उत्तेजकामागे वेडावून धावतो. मासे, दूध, मांस, अंडी, कंदर्प, ( मदनालाही कंदर्प म्हणतात.) ऑयस्टर्स-सारख्या आहाराने भागत नाही, हे पाहून, नाच, गाणी, दारू, गांजा घेऊन भागत नाही म्हणून ती किक येण्यासाठी त्याने अफलातून ॲफ्रोडिझिॲक्स शोधून काढली. (ती 'काम'याब ठरली नाहीत हा भाग वेगळा !) दक्षिणी अमेरिकेतील वनस्पतींपासून बनविलेला सार्सापरिल्ला, हॉप्स्चा काढा, टेस्टोस्टेरॉनसारखे हॉर्मोन्स टॉनिक, मँड्रेकची मुळी व्हिटॅमीन–ई, ॲसोफेटिडर (हिंग ?) गिनसेंग ( चिनी मुळा ) वगैरे वनस्पतिजन्य टॉनिक्स्नी पुरेसा प्रभाव पडत नाही, म्हणून स्पॅनिश–फ्लायसारखा विषारी किडा मारून, भाजून त्याचे चूर्ण करून पिऊनही झाले, गेंड्यांची शिंगे उगाळून खीर खाऊन झाली. पण ... उपाय सापडत नाही ... आणि जाहिराती व शोध 'जारी'च आहेत.

या व अशा जाहिराती शाळकरी बालके व किशोरवयातील मुले – मुली वाचतात. 'टॅबू–ग्रस्त' भारतीय समाजात शंका–निरसन होणार नाहीच या खात्रीने मुले कल्पना करून विकृत स्वप्नरंजन करतात. या अशा जाहिराती कोवळेपणावर ( फार नाजूक वाटले तर ) व सभ्यसंस्कारावर बलात्कार आहेत या कामुक बाजारी गल्लेबाज वृत्तीची दुसरीही बाजू आहे ती अशी–त्याची यादीच करतो.

(१) अश्लील वाङ्मय उघड वाचण्याची सोय नाही, ती सोय अप्रत्यक्षपणे अशा जाहिरातींनी सभ्यपणे भागते. वृत्तपत्रवाचन हा सभ्य व समाजजागृतीचा भाग मानला जातो !

(२) फ्राईडच्या थिअरीप्रमाणे LIBIDO ला प्रत्यक्ष वाव देता येत नाही, तेव्हा तो SUBLIMATION करून दिला जातो. जाहिराती उघड वा सचित्र जे सांगू शकत नाहीत, ते असे 'कोंडक्या' – शैलीने सर्वदूर सांगता येते व समजनेवालोंको इशारा काफी होता हैं ।

(३) कच्ची मंडळी जाहिरातींवर विश्वास ठेवतात. म्हणून जाहिरातीत SEX व बाईचे शरीर यांचा 'उचित' उपयोग करण्याचे तंत्र तज्ज्ञांनी विकसित केले आहे. उपरोक्त दोन्ही गीतांची गायिका वा म्हणणारी स्त्री आहे !

(४) ज्याला SEXPLOITATION म्हणतात, ते करायला जाहिरातींसारखे माध्यम नाही. वास्तविक स्त्रियांची शरीरे जाहिरातीत दाखवून पुरुषांना वेठीस धरले जाते !

(५) अशा जाहिरातींमुळे प्रत्येक पुरुषातील KINGKONG खूष होतो. त्याचा शारीरीक मर्दपणा दूर राहतो, मानसिक पौरुषाला वाढ ( PUSH ) दिली जाते.

(६) आता अशा कुडमुड्या पौरुषोत्तेजक किमयांची गरज निर्माण होते याचे कारण आजचा ( विशेषत: ) शहरी समाज स्ट्रेस, डिप्रेशन व स्ट्रेन (ताण, तणाव व मरगळ ) ग्रस्त आहे लैंगिक कार्यक्षमता ही केवळ विशिष्ट अवयवाची मक्तेदारी नाही; तर ती संपूर्ण शरीराने विशेषत: मनाने करण्याची गोष्ट आहे, हे न जाणणाऱ्यांना अशा जाहिराती दिलचस्प वाटणे स्वाभाविक.

(७) गर्भधारणा होण्यास घाबरणारी स्त्री व तदितर व तदनुषंगिक जबाबदाऱ्यांना डरणारा पुरुष ॲम्बिव्हॅलंट ( द्विधा ) मन:-स्थितीत वावरतात आणि फ्राईडच्या CASTRATEON गंडाप्रमाणे ॲबोटंट-गंडाने ग्रस्त होऊन शरीर – सुख घेण्याचे कामी ना–'काम'–याब ठरतात. ( ॲबोटंट म्हणजे गर्भ राहिला तर गर्भपातवगैरेच्या भीतीने येणारे नपुंसकत्व ! ) वास्तविक रेपिस्ट मनोवृत्तीला पायबंद घालण्यासाठी देशोदेशींचे गुन्हेगार तज्ज्ञ बलात्कारीं-साठी 'Anaphrodisiac'–(काम–मंदीपक औषधाच्या शोधात आहेत. त्यांनी काही ड्रग्ज व इंजेक्शन्सचा अशा गुन्हेगारांविरुद्ध यशस्वी वापरही केला आहे. भारतात लोकविज्ञान कारणासाठी मंद-काम–द्रव्यांचे शोध लागण्याऐवजी खोटारड्या उद्दीपक गीतांची व कथित औषधींची निर्मिती चालू आहे.

या दोन एनर्जी – गीतांचे ( हाड – हाड गीतांचे -बडबड गीतांप्रमाणे) तात्पर्य एवढेच की, वात्स्यायन आणि लोकसंख्यावाढीचे उच्चांक नोंदविणाऱ्या देशांत नॉर्मल लैंगिक व्यवहारासाठी रद्दी गीतांची गरज असणारे विक्रेते व ग्राहकही असावेत. वास्तविक संज्ञाबधिर बाजारू प्रभृतींना मर्ढेकरांच्याच शब्दांत बजावले पाहिजे–

> दाखवतील ते भोक रिकामे !
> जिथे असावे मांसल लिंग ! !

लैंगिक रोग, विकृती सांगण्यात लाज वाटणे आपण समजू शकतो. कारण त्या लज्जास्पद वाटतात; परंतु आहार, निद्रा, भय, मैथुन या प्रख्यात चौकडीपैकी लास्ट बट नॉट लीस्ट अशा मानवी प्रेरणेबाबत असा बाजार तोही उघड्या–चोरटेपणाने भरवावा लागतो ! हे संपूर्ण लक्षण समाज व शासन, साक्षर व शहरी कुठे जाणार या प्रश्नचिन्हापलीकडचे आहे. इये रघुनाथाचिये नगरी स्ट्रेट–फॉरवर्ड दृष्टिकोण कोणाच्याच बाबतीत नाही. निव्वळ गल्लाभरू बाजार ! विकणारे उठवळ, खरीदणारेही उठवळ ! वरतून सर्व सूचक – चोरीचा मामला ! पण मी बोंब उघड मारली आहे ! !

माझ्याआधी या नेभळट प्रवृत्तीविरुद्ध कोस्लरने 'लोटस ॲण्ड योगी' मध्ये बोंब मारली आहे. तो जे म्हणतो ते सांगून शेवट करतो : 'भारतीय हे वीर्यग्रस्त आहेत. लैंगिकतेने संपन्न पुराणे, उन्मादक–शृंगारसंपन्न शिल्प – मिथुने, लिंगपूजा व कामोत्तेजक औषधांचा बाजार भरविणाऱ्यांना कायम चिंता आहे ती वीर्य – रक्षणाची !' ( पर्यायाने संवर्धनाची ! ) कोस्लर परदेशी म्हणून त्याचा संताप एकांगी असू शकतो; पण एनर्जी–गीते लिहिणाऱ्या व वाचणाऱ्या आमचे काय ?

□

# कहाणी विनोबाप्रणीत भूदानयज्ञाची

## लेखक : श्रीनिवास टिळक

एप्रिल १९५१ मध्ये विनोबांनी भूदान आंदोलन सुरू केल्यावर साम्यवादीप्रणीत हिंसात्मक सामाजिक क्रांतीला पर्याय म्हणून त्याला बरीच प्रसिद्धी मिळाली. त्याबरोबरच भूदानाच्या तात्त्विक व सामाजिक पार्श्वभूमीचा अभ्यास व परामर्श याकडेही काही विचारवंतांचे लक्ष वेधले; परंतु विनोबांनी भूदानाचा प्रसार कोणत्या माध्यमातून कसा केला या विषयावर जास्त लिखाण आजमितीस उपलब्ध नाही. भूदानासारख्या रचनात्मक सामाजिक कार्याचा पुरस्कार करणाऱ्या कोणत्याही चळवळीने आपल्या मध्यवर्ती कल्पना, तत्त्वे तिच्या लक्षित श्रोत्यांपर्यंत नेऊन पोहोचविणे आवश्यक असते. नाही तर त्या चळवळीला जनमनात पाठिंबा मिळू शकत नाही. यास्तव विनोबांनी आपल्या कार्यासाठी 'प्रत्यक्ष संपर्क' या संज्ञापन-पद्धतीचा स्वीकार केला. त्यासाठी त्यांनी पारंपारिक यतींप्रमाणे खेड्यापाड्यांतून स्वत: फिरून जमीनदारांकडून जमीन दान मागून घेऊन ती शेतमजुरात ( landless labourers ) वाटण्याचा प्रयत्न केला. या कार्याबरोबरच सहकार व सहयोगाची भावना जनमनात रुजवून कृषिव्यवसायावर आधारित अशी आदर्श जीवनप्रणाली भारताच्या कानाकोपऱ्यात रूढ करण्याची आशा त्यांनी बाळगली. या ध्येयांच्या पूर्तीसाठी त्यांनी कहाणी (myth) हे पारंपारिक श्राव्य माध्यम प्रचार व प्रसाराचे एक प्रभावी तंत्र म्हणून कसे वापरले व त्यात त्यांना कितपत यश मिळाले हे विशद करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे. भूदानयज्ञाची ही कहाणी विनोबांनी अर्थातच एके ठिकाणी बसून, शांतपणे विचार करून रचलेली नाही. गावागावातून त्यांची पदयात्रा जात असताना केलेल्या प्रवचनातून, भूदानयज्ञ या त्यांनी निर्माण केलेल्या समासातील पारिभाषिक पदांची भूमिका लोकांना समजावून सांगण्याच्या प्रयत्नातून ही कहाणी हळूहळू बनत गेली. पुढे ही प्रवचने सारांशरूपाने 'भूदानगंगा' या शीर्षकाखाली ९ भागात प्रसिद्ध करण्यात आली. या गंगेच्या काठावर बसूनच भूदानयज्ञाच्या कहाणीचे खालील विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. विवेचनाच्या सोयीसाठी प्रस्तुत कहाणी खालील चार घटकांभोवती गुंफली गेली आहे असे म्हणता येईल. (१ व २) जमिनीचे वाजवी वितरण घडवून आणण्यासाठी रूपांतरित केलेले दान व यज्ञ हे दोन मूळ वैदिक विधी, (३) 'भू' या बोधचिन्हाने (symbol) प्रतीत केलेल्या कृषिजीवनाचा आदर्श स्पष्ट करून देण्यासाठी रचलेली आदिवचने (agrarian creed) आणि (४) क्रमांक १, २, ३ चे तात्त्विक व आध्यात्मिक अधिष्ठान म्हणून पुरस्कृत केलेला साम्ययोग; पण या घटकांच्या विवेचनाकडे वळण्याआधी 'कहाणी' या वाङ्मयप्रकाराबद्दल काही बोलणे उचित ठरेल.

### कहाणी–तंत्र आणि अंग

Myth या समाजशास्त्रात प्रचलित असलेल्या पारिभाषिक संज्ञेला प्रतिशब्द म्हणून 'कहाणी' या शब्दप्रयोगाचा उपयोग वि. का. राजवाडे यांनी प्रथम केला. दिव्यकथा, दैवतकथा, पुराणकथा इत्यादी इतर संज्ञा पर्यायी प्रतिशब्द म्हणून मराठीत रूढ असले तरी येथे 'कहाणी' हीच संज्ञा वापरण्याचे कारण भूदानयज्ञाची संपदा विनोबांनी प्रामुख्याने ग्रामीण जनतेशी संपर्क साधण्यासाठी एका विशिष्ट भाषाशैलीतून निर्माण केली– जी कहाणीच्या शैलीशी बरीच मिळतीजुळती आहे. तसेच सध्या मराठीत प्रचलित असलेल्या कहाणी या संज्ञेचा अर्थ myth या संज्ञेशी इतर रूढ केलेल्या प्रतिशब्दांपेक्षा अधिक जवळचा वाटतो. 'कहाणी' हे एक श्राव्य–माध्यम असल्यामुळे ती कथन केली जात असताना अधिक प्रभावी ठरते. सर्वसाधारणपणे एखाद्या परंपरेमधील काही थोर व्यक्तींना झालेल्या दैवी किंवा आध्यात्मिक साक्षात्कारासाठी सुसंगत अशी विशिष्ट नीतितत्त्वे व त्यावर आधारित जीवनप्रणाली त्या समाजात लोकमान्य करणे व तिला अधिकृत स्थान मिळवून देणे हा 'कहाणी' कथनाचा पारंपारिक उद्देश असतो. 'कहाणी' व गोष्ट यातील हा फरक लक्षात ठेवण्यासारखा आहे. 'कहाणी' प्राय: धर्मकथा असून तिच्यातून प्रामुख्याने उदात्त भाव प्रकट होतो. गोष्टीपेक्षा शास्त्र व तत्त्वज्ञान यांच्याशी कहाणीचे नाते अधिक जवळचे आहे. कारण मानवी जीवनाचा हेतु व अर्थ यांचे सैद्धांतिक स्पष्टीकरण करून देण्याचे सामर्थ्य 'कहाणी'त असते. यासाठी 'रूपक' हे वैशिष्ट्यपूर्ण संज्ञापन माध्यम (medium of communication) 'कहाणी'त वापरण्यात आलेले असते. कुशल कहाणीकार (myth–maker) रूपकाचा उपयोग पडदा व/किंवा भिंग म्हणून करतो. एखादी कल्पना नवीन दृष्टिकोनातून दाखविण्यासाठी त्या कल्पनेच्या मूळ गाभ्याभोवती जी दुय्यम परिचित विचारवलये किंवा भाव असतात त्यात रूपकाच्या सहाय्याने परिवर्तन घडवून आणण्यात येते. यासाठी काही विचारवलये पडद्याआड झाकण्यात येतात तर दुसऱ्या निवडक भावांचे मूळ दुय्यम स्थान भिंगातून पाहिल्याप्रमाणे वाढविलेले दाखविण्यात येते. समर्पक रूपकांच्या सहाय्याने कुशल कलावंत एखाद्या परिचित कल्पनेच्या समाकृतीत तिचे मूळ स्वरूप नष्ट न होऊ देता बदल घडवून आणतो व तिची नवनिर्मिती करतो आणि त्यायोगे तिच्यात नवचैतन्य व प्राण ओतू पाहतो. मग ही रूपांतरित कल्पना कहाणीच्या श्राव्य माध्यमाद्वारे श्रोत्यांपर्यंत नेऊन भिडविण्याचा प्रयत्न कहाणीकार करतो.

१८ एप्रिल १९५१ रोजी तेलंगणातील पोचमपाड खेड्यात

विनोबांना १०० एकर जमीन दान मिळाली. त्या रात्री त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना दैवी साक्षात्कार झाला व भूदानमार्गाने जमिनीचा प्रश्न सोडविण्याची प्रेरणा मिळाली. या घटनेतून भूदान-यज्ञाच्या कहाणीची सुरुवात झाली असे म्हणता येईल. या कहाणीत 'दान' व 'यज्ञ' या संज्ञा विनोबांनी विशिष्ट अर्थाने वापरल्या असल्याने त्यांचे मूळ पारंपारिक स्वरूप काय होते हे समजून घेणे उचित ठरेल.

## दान व यज्ञविधींची सांस्कृतिक परंपरा

श्रुति व स्मृति-वाङ्मय भारतीय संस्कृतीचे, विचारांचे व परंपरेचे अधिष्ठान मानले जाते. यास्तव आपल्या अवलोकनाची सुरुवात ऋग्वेदापासून करणे सयुक्तिक ठरेल. चीजवस्तू आणि संपत्ती ही एकाच व्यक्तीजवळ स्थिर न राहाता सतत संचार करीत असणाऱ्या रथचक्राप्रमाणे फिरत असते हे लक्षात घेऊन 'प्रत्येकाने जरुरीपुरतेच धन संग्रही ठेवून उरलेले झऱ्याप्रमाणे वाहात ठेवावे म्हणजे इतर त्यांच्या गरजेप्रमाणे त्याचा उपयोग करू शकतील' अशी ऋग्वेदाची शिकवण आहे. तिला अनुसरून स्वतःच्या काही वस्तूंचा कर्तव्यभावाने परित्याग करून ती यज्ञविधीच्या संदर्भात समाजाला दान करण्याचा प्रघात वैदिक संस्कृतीत होता. म्हणून वैदिक संस्कृती जरी प्रामुख्याने यज्ञप्रधान असली तरी यज्ञाची मूळ कल्पना पुढे ब्राह्मणादी ग्रंथांमध्ये प्रतिपादिलेल्या होमहवनादी कर्मकांडाहून अधिक व्यापक स्वरूपाची होती असे म्हणता येईल. यज्ञविधीचे मूळ स्वरूप म्हणून द्विविध आहे : (१) यज्ञ कर्तव्यकर्म आहे आणि (२) ते एक समाजोपयोगी कृत्य आहे. वैदिककालीन श्रीमंत यजमान सामाजिक ऋणातून मुक्त होण्यासाठी आणि त्याबरोबरच उर्वरित संपत्तीवरील आपला हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी यज्ञ घडवून आणत. तेव्हा स्वार्थ तात्पुरता बाजूला ठेवून दया–दान आदी गुणपरिपोषाच्या साह्याने समाज-कल्याणासाठी स्वामित्वाची भावना अंशतः तरी विसर्जित करण्याची प्रेरणा यज्ञसंस्थेमध्ये अभिप्रेत होती असे समजण्यास प्रत्यवाय नाही.

मनुस्मृती, महाभारत आदी स्मृतिग्रंथांतून हीच भावना पण थोडचा वेगळ्या तात्त्विक भूमिकेतून मांडलेली आढळते. उदा. अनुशासन-पर्वात भीष्म युधिष्ठिराला बजावतात, "सर्व दानांमध्ये पृथ्वीदान श्रेष्ठ आहे. भूमीसारखे दान नाही व दानासारखा संचय नाही. म्हणून पात्रापात्र विचार करून सत्पात्रीच दान करावे." भीष्म पुढे सांगतात, "पृथ्वी स्वतः विनविते 'माझेच दान करा व मला स्वीकारा. माझे दान करा व मला याच लोकी व परलोकीसुद्धा पुन्हा मिळवा!'

गीतेमध्ये मनोवृत्तीनुसार दान व यज्ञविधीचे सात्त्विक, राजस व मानसिक असे तीन प्रकार ठेवून म्हटले आहे की, "धर्मभावाने, काही मोबदला मिळेल अशी आशा मनात न बाळगता देश, काल जाणून सत्पात्री केलेले दान व यज्ञ सात्त्विक प्रवृत्तीचा ठरतो. याउलट फलाभिलाषा धरून किंवा नाखुशीने केलेले दान अथवा यज्ञ राजस वृत्तीचा द्योतक आहे, तर तामस प्रवृत्तीतून केलेल्या दानयज्ञात मंत्र, श्रद्धा, त्याग आणि विधी यांचा अभाव असतो."

वरील संदर्भावरून भारतीय परंपरेत वस्तूची हस्तांतरप्रक्रिया व समाजकल्याण यांचे अधिष्ठान काय असावे याबद्दल काही आडाखे बांधता येतात. दान (gift), परस्पर विनिमय (mutual exchange) आणि वितरण (redistribution) या तीन प्रक्रियांद्वारे वस्तूचे हस्तांतर होत असते. वैदिक कालात वितरणप्रक्रियेच्या द्वारे वस्तू व द्रव्यप्रवाह वाहता ठेवला जात असावा तर महाभारतकालात हस्तांत-राचे प्रधानत्व परस्पर विनिमय असावे. या संदर्भात पृथ्वीच्या कथनावरून आपण खालील अनुधान काढू शकतो. विभाजन आणि विनिमय हे वस्तूचे मूलभूत धर्म आहेत. आपल्या वस्तूत वाटेकरी म्हणून दुसऱ्याचा समावेश न करणे म्हणजे तिची प्राणशक्तीच नष्ट करण्यासारखे आहे. याउलट वाटून टाकलेली वस्तू पुनर्दानाच्या स्वरूपात दात्याकडे परत येते. म्हणून सुखाची गुरुकिल्ली दान आणि विनिमयात सापडते, संचयात नाही. दानाची ही परतफेड कोणत्या तत्त्वानुसार होते. कोणत्या शक्तीनुसार माणूस याचकाचा दाता बनतो या प्रश्नांच्या उत्तरादाखल पृथ्वी म्हणते, "दान दिलेली वस्तू तसेच दानाची प्रक्रिया दोन्ही चैतन्यस्वरूप असतात आणि त्या चैतन्याच्याच प्रभावाने मूळ दात्याला समान मूल्याची दुसरी वस्तू त्याने दान केलेल्या वस्तूच्या मोबदल्यात दान म्हणून मिळते."

विनोबांच्या भूदानयज्ञविधीमध्ये अभिप्रेत असणाऱ्या जमिनीच्या हस्तांतरप्रक्रियेत दान, विनिमय आणि वितरण या तिन्ही प्रक्रिया एकवटलेल्या दिसतात. प्रथम जमीनदारांनी सात्त्विक मनोभावाने यज्ञस्वरूपात (म्हणजे मनात त्यागाची भावना निर्माण करून) समाजाला दान करायची आहे. मग तिचे वितरण शेतमजुरांमध्ये होणार. पुनर्दान म्हणून शेतमजूर आपापल्या कुवतीप्रमाणे संपत्ति, श्रम किंवा अवजारे यांचे दान करून जमिनीतून पीक काढणार. जमीनदारांत सात्त्विकभावाने दान करण्याची प्रेरणा निर्माण व्हावी व इतर गावकऱ्यांत सहकार व सहयोग यांची भावना निर्माण व्हावी या हेतूने विनोबांनी साम्ययोगाचा पुरस्कार केला. त्याकडे आता वळू या.

## साम्ययोग : भूदानयज्ञाचे तात्त्विक अधिष्ठान

या कहाणीचा उगम तेलंगणात झाला आणि तेथेच तिने बाळसे धरले. त्याच सुमारास तेलंगणात साम्यवादीप्रणालीचाही जोर वाढत होता. जमिनीचे रास्त आणि वाजवी फेरवाटप हेच त्यांचेही ध्येय असल्यामुळे भूदानयज्ञविधीच्या जमिनीच्या हस्तांतरप्रक्रियेवर तात्त्विक आणि नैतिक दृष्टिकोनातून त्यांनी केलेल्या टीकेला उत्तर देणे विनोबांना अपरिहार्य होते. या कळकळीतूनच साम्ययोगाचा उद्भव झाला. समाजवाद, आत्मैक्याची भावना, स्वामित्वभावनेचा अभाव व मनाचा समतोलपणा हे त्यांनी प्रतिपादलेल्या साम्ययोगाचे महत्त्वाचे सिद्धांत आहेत. साम्ययोग व्यक्तीव्यक्तींमध्ये भेद मानत नाही. प्रत्येकाचे सर्व गुण समाजहितासाठीच आहेत. कोणीही स्वतःच्या शरीराचा किंवा संपत्तीचा सार्वभौम मालक नाही. फक्त विश्वस्त म्हणून त्याने तिची काळजी घ्यायची. समाजाचे भवितव्य व्यक्तींच्या शुभवृत्तींवर आणि तदनुरूप दान, यज्ञ, तप विधींवर विसंबून आहे. हा समर्पणविधी साम्ययोगाचा आत्मा आहे. प्रत्येक युगात भिन्न भिन्न गुणांना प्राधान्य असते. विनोबांच्या मते सांप्रत कलियुगात समाजनिष्ठेला प्राधान्य आहे, म्हणून अहंकाराचे विसर्जन करून समाजसेवेत लीन होणे (न्यास) हाच त्यांच्या दृष्टीने आजचा मोक्षधर्म ठरतो. महानारायण-उपनिषदात दानाहून न्यास श्रेष्ठ कसा

हे दाखविले आहे. त्याचा दाखला देऊन भूदानयज्ञाचे पहिले पाऊल दान व त्याची अंतिम अवस्था न्यास आहे असे ते मानतात. दानाची परिणती न्यासात होणे हाच त्यांच्या मते आजचा धर्ममार्ग आहे.

साम्ययोग व साम्यवाद यातील फरक स्पष्ट करताना विनोबा म्हणतात, 'मार्क्सप्रणीत साम्यवादाचा उगम आर्थिक वैषम्य आणि साम्राज्य व भांडवलशाहीविरुद्ध झालेल्या प्रतिक्रियेत झाला. अशा प्रकारचा प्रतिक्रियावाद साम्ययोगाप्रमाणे स्वतंत्र विचार होऊ शकत नाही.' समाजातील प्रस्थापित उच्चभ्रूवर्गाचा नाश केल्याखेरीज अर्थनिष्ठ व समाजनिष्ठ समता अशक्य आहे आणि त्यासाठी करावी लागणारी हिंसा धर्मरूप व अवश्य आहे असे साम्यवादी मानतात; पण हिंसेने दाबून ठेवलेली प्रतिहिंसा अथवा प्रतिक्रिया कालानुसार उफाळून येते. हिंसेमुळे मानवतेची प्रतिष्ठा व जीवनमूल्ये क्षीण होत जातात आणि आत्म्याचे अवमूल्यन होते. साम्यवादीप्रणीत हिंसक क्रांती चिरस्थायी शांततेला बाधक असल्यामुळे भारतीय जनता, परंपरा व संस्कृती यांच्याशी तिचा मेळ बसू शकत नाही. याउलट साम्ययोगाचा मार्ग प्रेम व अहिंसेचा असल्यामुळे त्याची मुळे भारताच्या भूमीत खोल रुजलेली आहेत. विनोबांच्या मते तो एक स्वतंत्र अमर आणि अक्षीण विचार आहे.

अशा प्रकारे साम्ययोग व साम्यवाद यांतील मूलभूत भेद विनोबांनी परखडपणे स्पष्ट केला असला तरी साम्यवादापासून बोध घेण्यास ते कचरले नाहीत. उदा. माओवादापासून प्रेरणा घेऊन त्यांनी साम्ययोगाची सांगड 'भूमिसेवा हा मानवाचा मूलधर्म' आहे या तत्त्वप्रणालीशी घातली. 'जीवनाच्या प्रत्येक कार्याला भूमीचे अधिष्ठान आहे' अशी क्रांतिकारक घोषणा करून भूमिसेवा हे साम्ययोगी जीवनाचे एक अनिवार्य अंग बनविले. जितक्या अधिक लोकांना भूमिसेवेची संधी मिळेल तितकी समाजात शांती व समाधान नांदेल असे म्हणून गावातल्या प्रत्येक कुटुंबाला तिच्या कसाप्रमाणे एक ते पाच एकर जमीन शेतीकरता मिळवून देण्याचा संकल्प त्यांनी सोडला, प्रत्येकाने आपले शेत एक सुंदर उपासना, आरोग्य आणि ज्ञानमंदिर बनवावे अशी त्यांची अपेक्षा होती. असे झाले तरच सर्वांना साम्ययोगात निर्दिष्ट केलेल्या आंतरिक समानतेची प्रचीती येईल. जे असा साम्ययोग जीवनात साधतील तेच त्यांच्या मते संसार तरतील.

## भूदानयज्ञकहाणीची निर्मिती

भूदनयज्ञाच्या कहाणीचे मूळ घटक कोणते याची चर्चा वर झाली. आता समर्पक दृष्टांत (दाखले) व रूपके यांचा वापर करून विनोबांनी या घटकांवर कहाणीचा साज कसा चढविला याकडे वळू या. सर्वप्रथम हे नमूद करावे लागेल की, ते बहुभाषिक असल्यामुळे या कहाणीची अभिव्यक्ती राष्ट्रभर, सर्व प्रांतिक भाषांमधून होऊ शकली. तसेच ते शब्दतत्त्वाचे उत्तम सारज्ञ असल्यामुळे पारंपारिक कल्पनांना अडगळीत न टाकता ते त्यांत नवीन अर्थ भरू शकले. आपल्याला झालेल्या ईश्वरी प्रेरणेची पूर्ती करण्यासाठी त्यांनी वैदिक वाङमयातील कृषिजीवन आणि दानयज्ञविधींचा कायापालट करून त्यात नवे प्राण व चैतन्य ओतले. दानयज्ञाच्या जुन्या खोडावर साम्ययोगाचे मलम करून भूदानयज्ञाचा नवीन जोमदार वृक्ष त्यांनी वाढविला. या कार्यासाठी त्यांची पदयात्रा ज्या ज्या राज्यातून जाई त्या त्या राज्यांच्या भौगोलिक, सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीशी सुसंगत असणारे दाखले, रूपके व संकेत त्यांनी उपयोगात आणले.

उदा. 'दान' या पदाची त्यांना अभिप्रेत असणारी व्याख्या स्पष्ट करण्यासाठी ते तैत्तिरीय उपनिषदातील मेघगर्जनेचा दृष्टांत देतात. ढग गडगडताना 'द-द-द' असा आवाज होतो अशी वैदिक समजूत होती. त्यावरून 'द' या अक्षराला सांकेतिक महत्त्व येऊन प्रजापतीचा संदेश 'दत्त, दयध्वम्, दम्यत' या अर्थाचा 'द' या अद्याक्षराने सुरू झालेला मानला गेला; ही व्युत्पत्ती वैयाकरणी नसली तरी परंपरेने तिला बांधीव स्वरूप आले. मेघगर्जनेद्वारा परमात्मा आपल्याला 'दान करा, दया दाखवा व इंद्रियदमन करा' असे सांगतो हे मानण्यात येऊ लागले. हा जुना दाखला देऊन विनोबा त्यात नवीन संकेत भरतात—'लोभासुराहून भयंकर राक्षस नाही. त्याला दानानेच जिंकता येते. भूदानयज्ञ या लोभासुराच्या मोचनासाठीच आहे.' संपत्तिदानाचा नवा आविष्कार म्हणून संपत्ती = द्रव्य = प्रवाही पदार्थ असे समीकरणात्मक रूपक विनोबा मांडतात. संपत्ती झऱ्यासारखी वाहती ठेवली म्हणजे प्रत्येकाला आपल्या गरजेपुरते द्रव्य काढून घेता येईल. हा दाखला ऋग्वेदीय कल्पनेशी सुसंगत असला तरी दानाच्या त्या पारंपारिक कल्पनेपेक्षा विनोबांची व्याख्या अधिक व्यापक आहे. दान हे नित्य असावे व ते यज्ञस्वरूपातच (पुढे पहा) दिले जावे असा त्यांचा आग्रह आहे नित्य दानाच्या कल्पनेमुळे दात्याच्या ठायी असणारी अहंपणाची व परोपकाराची भावना दूर होते. दान यज्ञनिष्ठ ठेवल्याने त्याला असलेले पारंपारिक वैयक्तिक स्वरूप दूर होऊन त्याला सामूहिक स्वरूप येते. तसेच दानाचे परिणाम काय असावे याबद्दल दात्यांमध्ये येऊ शकणारे दडपण किंवा भीतीची भावना दूर होते. कारण ते सामूहिक झाले म्हणजे कोणी किती दिले हे सहजपणे उघड होत नाही. त्याबरोबरच दानशूरतेचे प्रदर्शन करण्याच्या वृत्तीलाही आळा बसू शकतो.

वैदिककाळी यज्ञात आहुति देताना, 'इंद्राय इदं नमम' असे म्हटले जाई. याउलट भूदान करताना, 'समाजाय इदं न मम' अशी आहुति देण्याचा प्रघात विनोबांनी रूढ केला. सांप्रतकाळी समाजसेवा हाच मोक्षधर्म ही त्यांची भूमिका असल्यामुळे स्वामित्वाच्या भावनेवर तिलांजली सोडता यावी म्हणून हा नवा आहुतिमंत्र त्यांनी दिला.

त्यांची यज्ञाची कल्पना 'अहं क्रतुः अहं यज्ञः स्वधामहमौषधम्' गीता (९.१६) या वचनावरून घेतलेली आहे. भूदानयज्ञाला ते प्रजासूययज्ञ असे दुसरे नाव देतात. तत्कालीन राजसूययज्ञ या कल्पनेच्या धर्तीवर त्यांनी 'प्रजासूय' (प्रजेने निर्मिलेला, जन्म दिलेला) यज्ञ या अर्थाची नवी संज्ञा भूदानयज्ञाला पोषक म्हणून वापरली. यज्ञाचे स्वरूप स्वावलंबी म्हणजेच जनावलंबी राहिले पाहिजे असा अर्थ ते लावतात. जे कार्य जनतेवर, तिच्या सहकार्यावर विसंबून आहे तोच यज्ञ. पूर्वी देशावर संकट आले असता त्याच्या निवारणासाठी यज्ञ केला जाई. त्याची आठवण देऊन ते म्हणतात, 'आजही बहुसंख्य शेतमजुरांवर तसेच एक संकट उभे आहे, त्याच्या निवारणासाठीच हा प्रजासूययज्ञ सुरू केला आहे. या यज्ञाचे सामूहिक स्वरूप जनमतावर ठसविण्यासाठी ते होळीचा दृष्टांत देतात. 'ज्याप्रमाणे होळीत घराघरातून गोळा केलेल्या लाकडांची आहुती दिली जाते त्याप्रमाणेच या यज्ञात प्रत्येकाने आपल्या कुवतीनुसार भूदानाची, संपत्तिदानाची

किंवा श्रमदानाची आहुती द्यायची आहे. हाच विचार दुसऱ्या एका रूपकातून मांडताना ते म्हणतात, ' या अग्नीमध्ये आहुती द्यायची ती तुपाची नव्हे तर हृदयाच्या स्नेहाची, काष्ठांची नव्हे तर ममता व स्वामित्वभावाची. लोभरूपी पशू सध्या फार उपद्रव माजवीत आहे त्याचा बळी या यज्ञात देऊन शांती मिळवायची आहे.

वरील उदाहरणावरून जुन्या कल्पनात नवीन चैतन्य व प्राण ओतताना विनोबा दृष्टांत व रूपक यांचा उपयोग गरजेनुसार भिंग किंवा पडद्याप्रमाणे कसा करतात ते कळून येते. वैदिक यज्ञविधी-भोवती कर्मकांड व हिंसा यांची विचार-वलये व भाव होते यात शंका नाही. विनोबांच्या प्रजासूययज्ञात त्यांना स्थान नसल्यामुळे त्यांनी समर्पक रूपके वापरून ती लक्षणे पडद्याआड ठेवली. याउलट दान, त्याग जनहित इ. कल्पनांचे मूळ दुय्यम स्थान प्रजासूययज्ञात समर्पक रूपकांच्या सहाय्याने महत्त्वपूर्ण करण्यात आले.

ऋग्वेद आणि गीता (४.२८) यात लोकजीवन आणि यज्ञविधी यांतील परस्परसंबंध दाखविण्यासाठी म्हटले आहे की, माणसाने यज्ञात दिलेल्या आहुतींमुळे सूर्यास नवचैतन्य प्राप्त होऊन तो पाऊस पाडतो. या वृष्टीमुळे अन्न पिकते व मनुष्याचे पोषण होते. ' भू ' या त्यांनी निवडलेल्या बोधचिन्हात (symbol) अभिप्रेत असलेली कृषिनिष्ठ जीवनप्रणाली व दानयज्ञविधी यातील परस्परसंबंध दर्शविण्यासाठी वरील वचनाच्या धर्तीवर विनोबा एक सुंदर रूपकात्मक दृष्टांत बनवितात. विष्णूच्या कृपेचा पाऊस पडेल तेव्हाच लक्ष्मी प्रकट होईल; पण शेतकऱ्यांच्या प्रयत्नांचा नांगर चालल्याशिवाय विष्णूची कृपा अशक्य आहे. ' यज्ञात् भवति पर्जन्यः ' या गीतावचनाचा अर्थ आहे – अंगातून घामाच्या धारा काढाव्यात व पावसाच्या सरींची वाट पहावी. जेथे शेतकऱ्यांचा यज्ञ आणि विष्णुकृपेचा पाऊस असेल तेथेच लक्ष्मीचा वास होईल. सर्वांनी (बुद्धिजीवी लोकांनीसुद्धा) रोज काही तास तरी कृषिधर्म पाळावा. या मूलमंत्राचा अर्थ स्पष्ट करताना ते म्हणतात, ' ऋषी आणि ऋषभ या दोन्ही संज्ञा एकाच मूळ धातूपासून निघाल्या आहेत. दोघेही नांगराशी जोडलेले आहेत. एक नांगराच्या मागे तर दुसरा त्याच्या पुढे.

बंगालच्या दौऱ्यावर असताना साम्ययोगात स्वामित्व–भावनेला स्थान नाही, हे दाखविण्यासाठी चैतन्यप्रभूच्या त्या वैष्णवभूमीत ते पुढील दृष्टांत देतात. ' जो आपल्याला जमीन व संपत्तीचा स्वामी समजतो तो ईश्वराची जागा बळकावतो; तो अवैष्णव आहे. जे सर्वांना विष्णुमय समजतील व आपली सर्व चीजवस्तू परमेश्वराची आहे, जनतेची आहे असे समजतील तेच खरे वैष्णव. भूदानयज्ञाची परिणती कशात होईल या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणतात, ' एकीकडून मालकीची भावना त्यागायला तयार झालेला जमीनदार व दुसरीकडून दैन्य व गुलामी त्यागून भूमिसेवा करायला उत्सुक झालेला शेतमजूर असे दोघे एकत्र आले म्हणजे त्यांचे हात जुळून गावाला नमस्कार होईल. जमीनदार व शेतमजूर हे दोन विरोधी वर्ग नाहीसे होऊन गावात फक्त भूमिपुत्र हाच एक एकजिनसी वर्ग उरेल तेव्हा या भूदानयज्ञाची सांगता होईल.

प्रस्तुत कहाणीचे मूल्यमापन कोणत्या भूमिकेतून करणे वाजवी व रास्त ठरेल ? वैदिक मूलतत्त्वांचा आणि समकालीन कृषिजीवनाचा आशय घेऊ पाहणारी ही आधुनिक कहाणी कितपत अभिनव ठरते ? तिच्यात गर्भित व उघड असलेल्या आशयांचा सहज स्वीकार करणे अर्थातच दुरापास्त होईल. तसेच तिची सवंग हेटाळणी करणेही अनुचित ठरेल. विनोबांना किती एकर जमीन मिळाली व त्यापैकी कितीचे अजूनपर्यंत फेरवाटप झाले वा झाले नाही याची आकडेवारी देऊन तेवढ्यावरूनच बहुविध कहाणीचे सामर्थ्य व मर्यादा सूचित करणे गैर व अवास्तव ठरेल.

## भूदानयज्ञाच्या कहाणीचे मूल्यमापन

१९५५ च्या बंगालदौऱ्यात भूदान–आंदोलनाला उतरती कळा लागली. भूदान–आंदोलन सुरू झाल्यापासून इथेच सर्वप्रथम विनोबांना एके दिवशी एकही एकर जमीन दान म्हणून मिळाली नाही. (१५ जानेवारी १९५५, मेदिनीपूर, प. बंगाल) पुढे तामिळनाडू–दौऱ्यात असे पुन्हा पुन्हा घडणार होते याची ही जणू नांदीच होती. भूदानाच्या काळवंडत जाणाऱ्या या प्रतिमेबरोबरच विनोबांची विचारसरणी अधिकाधिक कल्पनावादी (Idealistic) व कल्पितादर्शी (Utopion) बनू लागली यात संदेह नाही. त्याच वर्षी ओरिसाच्या कोरापूर जिल्ह्यात अकल्पितरीत्या ग्रामदानाचा बूट निघाला. त्या संदर्भात भूदान–आंदोलनात येत असलेले अपयश धुऊन टाकण्यात आले ते भूदानाची कल्पना ग्रामदानाचीच एक मूळ रूप (Prototype) पण अविकसित अवस्था होती असे जाहीर करून. भूदान ते ग्रामदान ते ग्रामस्वराज्य या प्रवासात विनोबांनी आपल्या चळवळीचा रोख व पवित्रा बदलला. पाच वर्षात पाच कोटी एकर जमीन भूदानात मिळविण्याचा संकल्प सोडून देण्यात आला व त्याऐवजी भूदानयज्ञविधीच्या साधनशुचितेवर आता अधिक भर देण्यास सुरुवात झाली. जमिनीचा प्रश्न या ना त्या मार्गाने केव्हा तरी सुटणार आहे, अशी त्यांनी आता भूमिका घेतली. तेव्हा किती एकर जमीन कोण, केव्हा, कुठे व कोणाला दान करेल याबाबत आता त्यांना शहानिशा उरली नव्हती. त्यांच्या विफल होत जाणाऱ्या या मनोराज्याबरोबरच भूदान-गंगेलाही ओहोटी लागली. त्याचा जो काही अनिष्ट परिणाम झाला तो सर्वश्रुतच आहे.

भूदानयज्ञाच्या कहाणीला जो यशापयशाचा प्रतिसाद लाभला त्याचे मूळ विनोबांना अवगत असलेल्या भारताच्या सांस्कृतिक परंपरेच्या गाढ ज्ञानात सापडते. त्याच्या जोरावरच भूदानाच्या कार्याला अनुकूल व समर्पक असे दाखले व रूपके वैदिक आणि स्मृति–वाङ्मयातून ते वेचून काढू शकले व त्यांच्याद्वारे जमिनीच्या सुयोग्य वितरणाची आवश्यकता जमीनदार व शेतमजूर या दोन परस्परविरोधी वर्गांसमोर ते मांडू शकले. त्या ज्ञानाच्या बळावर त्या दोघात शांतिमय वातावरणात सुसंवाद सुरू करून देण्यात त्यांना यश आले; परंतु याबरोबरच आपल्याला हेही लक्षात घेतले पाहिजे की, सर्वसाधारण ग्रामीण (आणि नागरी) जनतेला त्यांनी रूपांतरित केलेले दानयज्ञविधी पूर्णपणे उमगले नाहीत. कारण एकाच बोधचिन्हात किंवा रूपकात निसर्गतः परस्परविरोधी अर्थ सूचित करण्याची क्षमता असल्यामुळे कहाणीकाराला अभिप्रेत असणारा विवक्षित संदेश कहाणीच्या माध्यमातून तिच्या श्रोत्यांपर्यंत जाऊन पोहोचेलच याची शाश्वती नसते आणि जरी विनोबांसारखा एखादा कुशल कहाणीकार तसा संदेश श्रोत्यांपर्यंत पोहोचवू शकला तरी तो

अंमलात आणला जाईलच याचीही शाश्वती नसते. म्हणूनच ऐकलेल्या कहाणीचा अर्थ आपल्या सोयीप्रमाणे लावून त्यानुसार कृती करणे हे ती ऐकून प्रभावित होणाऱ्या गटाच्या मर्जीवर असल्यामुळे एकच कहाणी दोन गटांत कलह किंवा सामंजस्य निर्माण करू शकते. जमीनदार व शेतमजूर यांनी विनोबा आणि भूदान–आंदोलनावर परस्परविरोधी आरोप केले यावरून वरील मुद्द्याचे समर्थन होते. शेतमजुरांचा व साम्यवाद्यांचा मुख्य आक्षेप असा की, जमिनीचा फक्त सहावा हिस्सा सुरुवातीला मागून व भूदानक्रांतीचे स्वरूप शांतिमय राहील अशी ग्वाही देऊन विनोबांनी जमीनदारवर्ग व जमीनदारी–प्रथा जिवंत ठेवली. याउलट जमीनदारवर्गाच्या मते त्यांनी प्रत्येकाला स्वत:ची जमीन मिळवून देण्याची प्रलोभने दाखवून जमिनीच्या भुकेचा आणि क्रांतीचा वणवा पेटविला. भूदानयज्ञाची कहाणी ऐकून शेतमजुरांची दृढ समजूत झाली (आणि अर्थातच काहींनी तशी ती करून घेतली) की, परार्थवादाने भारावून गेलेले जमीनदार आपली अधिक जमीन त्यांना वाटून टाकतील; पण जमीनदारांचा मतलब काही वेगळाच होता. शास्त्रापुरती थोडी जमीन दान करून उरलेल्या जमिनीवर आपण मालकी हक्काची वहिवाट कायम राखू शकू असा त्यांचा विश्वास होता. जमीनदारांनी भूदानयज्ञविधीला अंशत:च पाठिंबा देऊन पारंपारिक दानयज्ञकल्पनांचा पाठपुरावा अधिक करावा ही विनोबांच्या कहाणीची एक गंभीर मर्यादा ठरते. ही मर्यादा लक्षात येऊनही विनोबांनी या दोन परस्परविरोधी वर्गांत समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न जारी ठेवला व त्या नादात त्यांना अनेकदा वैचारिक आणि तात्त्विक कोलांटया माराव्या लागल्या.

या आंदोदलात महत्त्व दान केलेल्या जमिनीच्या प्रमाणाला नसून प्रकाराला आहे असे विनोबा म्हणत; परंतु हाच निकष दानात मिळालेल्या जमिनीच्या फेरवाटपाच्या संदर्भात लावण्यात आला नाही असे आढळून येते. कारण जी काही जमीन दान करण्यात आली तिच्या वितरणासंबंधी दात्यांनी बऱ्याच अटी घातल्या. दिलेली जमीन आपल्या जातीच्या गरिबांनाच वाटली जावी ही त्यापैकी एक मोठी अट होती. हरिजनांना जमिनीच्या फेरवाटपात स्थान मिळू नये असाही आग्रह काहींनी धरला. भूदानाची काही आश्वासने भीती, भीड किंवा लाजेच्या दडपणाखाली दिली गेली असावीत. कारण ती पूर्णत: पाळली गेली नाहीत. आता दान करण्याची प्रवृत्ती माणसात विनोबा म्हणतात त्याप्रमाणे स्वाभाविक व उपजतच असली तरी दानाचे परिमाण दाता आणि याचक। ग्राहक यांच्यात जाणवणाऱ्या परस्परांमधील संबंधाच्या घनतेवर। तीव्रतेवर अवलंबून आहे. दुसऱ्याबद्दल वाटणारा जिव्हाळा किंवा आपुलकीची भावना त्याच्या सामाजिक दर्जाशी निगडित असते. म्हणूनच एखाद्या बेवारशी, बेघर भिकाऱ्यापेक्षा स्वत:हून थोडयाच गरीब असणाऱ्या व्यक्तीबद्दल आपल्याला अधिक दया वाटते. याउलट धनाढ्य करोडपतीपेक्षा अधिक मत्सर आपल्याला स्वत:हून थोडीशीच चांगली परिस्थिती असणाऱ्या माणसाबद्दल वाटतो. त्यात भर म्हणून आपल्या समाजात अजूनही प्रचलित असलेल्या जातिसंस्थेमुळे ही वाढत किंवा कमी जाणवत जाणारी परकेपणाची व तिच्याशी निगडित असलेले दानाचे परिमाण यांचा एक अधिक्रमच ( hierarchy ) निश्चित झाला आहे. जमीनदारांनी स्वत:च्या जातीच्या किंवा स्वत:ला जवळ वाटणाऱ्या जातीच्या शेतमजुरांना, हरिजन शेतमजुरांपेक्षा भागश: अधिक जमीन दान केली, यावरून वरील विधानाची सयुक्तता पटू शकते.

## अराजकीय प्रवृत्ती

भूदान–आंदोलनाबद्दल दुसरा एक वाजवी आणि रास्त आक्षेप आपण घेऊ शकतो की, विनोबांनी भारतभर हिंडून पाच कोटी एकर जमीन भूदानात मिळविण्याचा जवळजवळ अशक्य असा अट्टाहास धरण्याऐवजी एके ठिकाणी २५।३० गावांचा समूह (जेथे बव्हंशी जमीन दान मिळालेली आहे) बनवून ग्रामस्वराज्य म्हणता येईल अशा धर्तीचे काही रचनात्मक कार्य लोकांसमोर एक आदर्श उदाहरण म्हणून ठेवायला पाहिजे होते; पण असल्या आरोपांनी भारतीय संस्कृतीत पूर्णत: अपरिचित नसलेली त्यांची अराजकीय (anarchist) • प्रवृत्ती उसळून येई. 'शास्त्रं तु ज्ञापकं न कारकम्' या शास्त्रवचनाचा आधार घेऊन ते म्हणत, 'मी फक्त एक sign–post आहे. ध्येयाकडे जायची दिशा तेवढी मी दाखवितो. तेथे कोणी जावे असा आग्रह नाही. 'अनिकेत: स्थिरमति:' या गीतावचनाशी एकनिष्ठ राहून गावोगावी भूदानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांनी आपल्यासारखे शेकडो भिक्षुरूपी कार्यकर्ते तयार केले; परंतु त्यांची अराजकीय वृत्ती त्यांना भिक्षूंचा संघ बनवून एके ठिकाणी रचनात्मक प्रयोग करण्यासाठी ठाम वास्तव्य करू देईना. कोणतेही नैतिक वा क्रांतिकारी आंदोलन काही काळाने थंड पडते व त्यायोगे त्याची गती आणि प्रगती मंदावते हे त्यांना उमजत होते; पण त्यांच्या त्या अराजकीय प्रवृत्तीला संस्था आणि कायदे-कानू यांचे वावडे असल्यामुळे संस्था स्थापून क्रांतीचे चैतन्य टिकविण्याचा प्रयत्न करणे किंवा कायदे करवून घेऊन तिची ज्योत पेटती ठेवणे त्यांच्या रक्तात नव्हते. थंडावत जाणाऱ्या क्रांतीत नवचैतन्य ओतणारा दुसरा कोणी प्रणेता परमेश्वर जन्माला घालील अशी त्यांची श्रद्धा होती. या पार्श्वभूमीवरच भूदानकार्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या जिल्हा व प्रांतिक समित्या बरखास्त करण्याचा त्यांनी १९५६ मध्ये दिलेला आदेश आपण समजू शकतो गांधी-निधीच्या केंद्रीय संचित-निधीतून भूदानकार्याला मिळणारी मदत थांबविण्याचा निर्णयही घेण्यात आला तो या तत्त्वावरच; परंतु यामुळे वेतन घेऊन भूदानकार्य करणारी बरीच माणसे ती चळवळ सोडून निघून गेली. ज्याप्रमाणे जंगली हत्तींना पकडून देण्यासाठी पाळीव हत्ती वापरले जातात त्याचप्रमाणे जमीनदार-दाते आपल्या बांधवांकडून भूदानासाठी जमीन मिळवून देतील आणि अशा प्रकारे ते निघून गेलेल्या या कार्यकर्त्यांचे कार्य चालू ठेवतील अशी त्यांना उमेद होती.

मधून मधून त्यांच्या सहकाऱ्यांत भूदानयज्ञाची योग्य दिशा व धोरण कोणते हे ठरविण्याच्या प्रश्नाबर वादंग माजे. तेव्हा विनोबा धमकीच्या सुरात म्हणत, 'मी एक बेदरकार फकीर आहे. जग मिथ्या समजून त्याची सेवा करतो. जेथे भांडणे किंवा मनोमालिन्य आहे तेथे मला चैन पडत नाही. तुमची भांडणे मिटली नाहीत तर ती निघून जाईन !' अशा धमक्यांमुळे कार्यकर्त्यांमधील मतभेद

तात्पुरते मिटत असले तरी भांडणातून निर्माण झालेली बेदिली कायम राहिलीच व त्याचा परिणाम दान मिळणाऱ्या जमिनीच्या परिमाणावर झाला. उदा. ऐनउमेदीच्या काळात जेथे रोजी सरासरी ३०० एकर जमीन व ३०० दानपत्रे मिळत तेथे १९७६ मध्ये सरासरीचे प्रमाण १२५ एकरांपर्यंत घसरले! ह्या अपयशामागे विनोबांची अराजकीय प्रवृत्ती हे एक महत्त्वाचे कारण ठरू शकते. 'शास्त्रं तु ज्ञाण्कं न कारकम्' या वचनाचा आधार घेणारे विनोबा 'शास्त्रसिद्धं न सर्वत्र ॥ असेही एक दुसरे शास्त्रवचन आहे हे सोयिस्करपणे विसरतात.

भूदानयज्ञाच्या कहाणीत प्रत्येक कुटुंबाला जमिनीच्या कसानुसार एक ते पाच एकर जमीन स्वत: लागवडीखाली आणण्यास मिळावी हे एक स्वप्न आहे; परंतु सांप्रत वस्तुस्थिती अशी आहे की, बरेच जमीनदार जमीन स्वत: न कसता ती दुसऱ्यांना भाड्याने मेहनत करण्यास देतात किंवा मजूर लावून तिच्यातून पिके काढून घेतात; परंतु जमीन कसण्याचे हे पर्यायी मार्ग का व कसे अस्तित्वात आले आणि अजूनही का प्रचलित आहेत याचे काहीच विवेचन विनोबा करीत नाहीत. वाढत्या लोकसंख्येचा जमिनीवर पडणारा दाब, शेतमजुरांची फुगत चाललेली अफाट संख्या, त्यांना मिळणारे वेतन, जातिसंस्था व भौगोलिक परिस्थिती या कारणीभूत गोष्टींवर स्वत: जमीन कसण्याचे पर्यायी मार्ग अवलंबून असू शकतात. उदा. कृषिजाती ज्या भागांत प्रामुख्याने आढळतात तेथे स्वत: कसणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. गव्हाच्या शेतीपेक्षा भातशेती अधिक कष्टप्रद आहे. म्हणून पश्चिम बंगाल केरळ इत्यादी राज्यांतील जमीनदार त्यांची ५.४ एकरांहून सुद्धा कमी जमीन मजूर लावून पिकवून घेतात. याउलट पंजाब-हरियाणामधील पंधरा एकरांहून अधिक जमीन असलेले सधन शेतकरी स्वत:च गव्हाचे पीक काढतात. अशा परिस्थितीत सरसकट कुटुंबाला जरुरीपुरती जमीन स्वत: कसण्यासाठी मिळवून देण्याचा विनोबांनी योजिलेला उपक्रम कसा अव्यवहार्य ठरला असता हे कळून येते.




वरील विवेचनातून भूदानयज्ञकहाणीच्या मर्यादा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु याचा अर्थ या कहाणीद्वारे काहीच साध्य झाले नाही असा नाही. क्रांतिकारी साम्यवाद अथवा प्रातिनिधिक लोकशाही यांनीही आपापल्या परीने जमिनीच्या फेरवाटपाचे पर्यायी मार्ग दाखविलेले आहेत. त्यांच्या तुलनेने भूदानयज्ञाचा मार्ग कसा अधिक तर्कशुद्ध आहे याची चर्चा कहाणीच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीद्वारे करताना विनोबा म्हणतात, 'साम्यवाद वा लोकशाही हे अनुक्रमे परशुरामावतार व रामावतार आहेत असे गृहीत धरले तर भूदानाचा मार्ग हा वामनावतार आहे. परशुरामाने हिंसात्मक मार्ग पत्करून एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रीय करण्याचा प्रयत्न केला होता; पण तो अयशस्वी ठरला. रामावतारात सर्व सूत्रे रामाच्या आज्ञेने (आजच्या भाषेत कायद्याच्या जोरावर) हलत; पण कत्तल व किंवा कायदा या तत्त्वावर आधारलेल्या या दोन मार्गांनी जमिनीचा प्रश्न सुटणार नाही. कारण वरील दोन्हीपैकी एकही मार्ग प्रजेत आंतरिक किंवा आध्यात्मिक शक्ती अथवा एकता किंवा परस्पर सहानुभूतीची भावना निर्माण करू शकत नाही. हिंसा आणि कायदा यांची मूलभूत प्रेरणा बळ आणि दमनशक्तीवर आधारलेली आहे, तर या आधुनिक वामनाची प्रेरणा दानशक्तीत आहे.

जमिनीच्या फेरवाटपाच्या संदर्भात साम्यवाद, लोकशाही व भूदानयज्ञ यांनी अनुक्रमे हिंसा, कायदा व दान या तीन भिन्न साधनांचा मार्ग सुचविला असता तरी विनोबांच्या मते भूदानाचे ध्येय इतर दोघांच्या अंतिम ध्येयाशी समन्वय साधू पाहणार होते असे म्हणता येईल. कारण या संदर्भात ते म्हणतात, 'मी हे सरकारचे व साम्यवाद्यांचेच काम करीत आहे. भूदानकार्य ही पाचर आहे. ती आत शिरल्यावर कायद्याचा हातोडा पडणारच. जमिनीच्या फेरवाटपाला आरंभ दानानेच झाला. त्याची समाप्ती कायद्याने होईल. तसे पाहिले तर एका विशिष्ट अवस्थेनंतर साम्यवादीही कायद्याचा आसरा घेऊ इच्छितात; पण तत्पूर्वी मी पाचर म्हणून प्रेम व दानाचा उपयोग करतो तर त्यांना लाठी व लूट यांचा अवलंब करावासा वाटतो.

विनोबांच्या मते सरकार कायदे पास करून आपले कर्तव्य पार पाडीत राहील; पण जमिनीचे फेरवाटप हा एक महान् क्रांतिकारी विचार आहे. तो कृतीत आणण्यासाठी आधी लोकांची मने जिंकली पाहिजेत व त्या विचाराचा प्रचार आणि प्रसार खेड्यापाड्यांतून झाला पाहिजे. जेव्हा असा विचार जनमान्य होतो तेव्हाच सरकार त्याची दखल घेऊ शकते व कायदे पास करून त्या विचाराला वैधस्वरूप प्राप्त करून देऊ शकते म्हणून या प्रकारच्या कामात भूदानकार्यकर्त्यांनी जो अनुभव मिळविला आहे त्याचा आज नक्कीच उपयोग होऊ शकतो. प्रातिनिधिक लोकशाहीत उदय पावून वाढीस

लागलेली राजकीय पक्षपद्धती भूदानासारख्या सामाजिक क्रांतीच्या कामात एक तर पुरी पडत नाही किंवा तिची एकपक्षीय हुकूमशाहीत विकृती होण्याची शक्यता असते. त्यायोगे लोकशाहीचाच अंत होऊन कोणताही प्रश्न सोडविण्यासाठी हिंसेला पाचारण करण्याची प्रवृत्ती बळावते. या कारणास्तव जमिनीच्या फेरवाटपासारखे कार्य विनोबांच्या मते केवळ सत्तेवर आलेल्या पक्षाचे कार्य बनता कामा नये. ते प्रारंभिक अवस्थेत तरी पक्षातीत पार्श्वभूमीवर व स्वतंत्रपणे चालावयास पाहिजे. या दृष्टीने विनोबांनी उचललेले भूदानयज्ञाचे पाऊल प्रशंसनीय ठरते.

काही उदारमतवादी विचारवंत भूदानयज्ञाच्या कल्पनेला विसंवादी कल्पितादर्श (muddled utopianism) म्हणून मोकळे झाले तर संभाव्य क्रांतिकारी शेतमजुरांना साम्यवादी ध्येयापासून वंचित करून, होऊ घातलेल्या क्रांतीचा वणवा विझवला, म्हणून साम्यवाद्यांनी विनोबांच्या नावाने खडे फोडले. शोषित शेतमजूर आपली हलाखीची अवस्था आता पुढे निमूटपणे अधिक सहन करणार नाहीत, इतकेच नव्हे तर ती बदलण्यासाठी ते हिंसात्मक मार्गाचा अवलंब करण्यासाठी अधीर झाले आहेत या अनुमानावर साम्यवाद्यांचा वरील आरोप मुख्यतः आधारित होता; परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, जुलूम व पिळवणूक गरीब, दीनदुबळ्या रयतेचे मनोधैर्य पार खच्ची करून टाकते व त्यांना असहाय करून सोडते. तळागाळातली जनता अशा तऱ्हेने जरी चिरडली जात असली आणि आपल्या दुर्भाग्याची रडकथा गात असली तरी अन्यायाविरुद्ध हिंसात्मक लढा ती फार काळ उभारू शकत नाही हे कटुसत्य आहे. म्हणूनच मूठभर नक्षलवाद्यांनी चार जमीनदारांवर केलेल्या खुनी हल्ल्यांचा बदला असहाय शेतमजुरांवर घेतला जातो आणि तो मुकाट्याने सहन केला जातो तर माओ व मार्क्सप्रणीत साहित्य आणि त्याचा प्रचार गरिबांना फक्त घाबरवून सोडण्यात यशस्वी ठरतो. जमीनदार आणि शेतमजूर या दोघांच्याही पारंपारिक मूल्यांना नवीन दिशा दाखविणे हे जरी अत्यंत आवश्यक असले तरी ते कार्य विनोबांनी दर्शविलेल्या मार्गानेच सुरळीतपणे आणि शांतिमय वातावरणात पार पडण्याची शक्यता अधिक वाटते. असले रचनात्मक कार्य करणारे कार्यकर्ते खेड्यापाड्यांतून एका विशिष्ट भूमिकेतून (role) दिसले पाहिजेत तरच ते ग्रामीण जनतेशी सुसंवाद साधू शकतील. साधू किंवा संन्यासी ही त्यापैकी अशी एक भूमिका आहे जिच्याद्वारे प्रचारकार्यासाठी बाहेरून आलेली अपरिचित व्यक्ती खेडूत स्त्रीपुरुषांबरोबर विनासायास संपर्क जोडू शकते. म्हणून विनोबांनी दूरदर्शीपणे स्वतःसाठी आणि आपल्या सहकाऱ्यांसाठी ही भूमिका जाणीवपूर्वक निवडली. आज अनेक शासनप्रणीत विकासयोजना जनतेचे पुरेसे सहकार्य मिळत नाही म्हणून अयशस्वी ठरत आहेत. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे शासनाने नियुक्त केलेले कार्यकर्ते आणि जनता यांच्यातील संपर्क व संज्ञापनाचा अभाव. अशा परिस्थितीत भूदान-कार्यकर्त्यांनी मिळविलेल्या अनुभवाचा फायदा शासनाने विकासकार्यासाठी उठविणे उचित ठरेल.

क्रांतियज्ञात सर्व जुन्या पारंपारिक व रूढ कल्पना आणि मूल्ये यांची आहुती दिली तर नवीन क्रांतिकारी जीवनमूल्ये व प्रणालीचे युग भारतात (व इतरत्र) आपोआप उजाडेल असा एक बरेच अवडंबर माजलेला लाडका सिद्धांत आज जगभर भुरळ टाकीत आहे; पण भूदानयज्ञाच्या कहाणीत त्याला स्थान नाही. नवीन समाजरचना आणि घडण फुलासारखी हळूहळू उमलत जाते, पारंपारिक चिरस्थायी जीवनमूल्यांच्या खोडातून तिचे पोषण होते. या कारणास्तव शेतकीप्रधान व ग्रामनिष्ठ अशा जीवनप्रणालीशी इमान राखू शकणाऱ्या निवडक पारंपारिक जीवनमूल्यांचे 'क्रांतिकारी' पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न या कहाणीत केलेला आढळतो. या पार्श्वभूमीवरच आपण त्यांची 'क्रांतिकारी' सर्वोदय' ही घोषणा समजू शकतो. भारतीय जीवनात कृषिनिष्ठ क्रांतीचे स्वप्न पाहणाऱ्या विनोबांच्या या करणीत राजकीय क्रांतीला स्थान नाही. समाजाचे खरे परिवर्तन त्यांच्या मते अहिंसा, करुणा, शिक्षण व सहकार या अराजकीय साधनांनीच होऊ शकेल.

विनोबांची भूदानयज्ञाची कहाणी ऐकून तिच्या श्रोत्यांनी विनोबांना अपेक्षित असलेले स्वप्न आपल्या कृतीने साकार केले नाही हे खरे आहे. तरी पण त्यांच्या वृत्तीत त्या ध्येयाला पोषक असा बदल काही अंशी तरी घडून आला हे मानावेच लागेल. या कहाणीचे ध्येय हे नेहमीच अमूर्त राहणारे ध्येय होते, आहे आणि राहील; परंतु ह्या अमूर्ततेतच विनोबांच्या कहाणीची प्रेरकशक्ती सामावलेली आहे. □


गांधींच्या सहवासातून शिररला दिसला ख्रिस्ताशी साधर्म्य सांगणारा एक महात्मा...आणि त्या महात्म्यात दडलेला माणूस. त्या महात्म्यालाही या माणूसपणाची जाणीव होती. अनेकदा तसं तो जाहीरपणे बोलूनही दाखवायचा....

राजहंसचे आगामी प्रकाशन

# महात्मा आणि माणूस

लेखक : विल्यम शिरर । स्वैर रूपांतर : निखिल वागळे

लवकरच प्रसिद्ध होत आहे !

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०




# पोलंडचा पुरुषोत्तम
# लेक वालेसा

संगमरवरी भिंती अन् लाकडाचं नक्षीदार छत असलेल्या पोलंडच्या पार्लमेंटमध्ये (Sejm) सारे सदस्य गंभीर चेहऱ्यानं बसले होते. त्यांच्या चेहऱ्यांवरूनच तिथल्या तणावाची कल्पना कुणालाही येण्याजोगी होती. बऱ्याच चर्चेनंतर अखेरीस ठराव मतदानासाठी टाकण्यात आला. हे मतदान लोकशाहीतलं होतं थोडंच! कोणत्याही कम्युनिस्ट राजवटीत घडावं तसंच नाटक इथंही घडलं. निकाल अगोदर अन् मतदान नंतर......जगाच्या डोळ्यांत धूळफेक करण्यासाठीच योजण्यात आलेलं. एकामागोमाग एक सारे सदस्य उभे राहिले अन् प्रत्येकानं आपला उजवा हात उंचावून ठरावाला आपलं अनुमोदन दिलं.

स्वातंत्र्यासाठी झगडणारी, हक्कांसाठी लढणारी, सोव्हिएट साम्राज्याला सतावून सोडणारी. पोलंडमधल्या कोटयवधी कामगारांची संघटना--सॉलिडॅरिटी सर्वार्थानं संपुष्टात आणण्यात आली सतत सोळा महिने सत्ताधीशांच्या मस्तकशूळाला कारणीभूत ठरलेल्या सॉलिडॅरिटीच्या शेवटावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. जनरल यारुझेल्स्कीनं १९८१ च्या अखेरीस लष्करी कायदा लागू करून अस्थिरतेच्या कड्यावर उभ्या असलेल्या देशाला तात्पुरतं का होईना स्थैर्य दिलं. टायफॉइडच्या तापात अॅस्पिरिन देऊन थोड्या वेळापुरता ताप उतरवण्याचाच हा प्रकार होता. असली सिम्प्टमॅटिक ट्रीटमेंट ताप उतरवला तरी मूळ रोग हटवू शकत नाही. म्हणूनच यारुझेल्स्कींनी कायद्याचा बडगा उगारून सॉलिडॅरिटीची समाप्ती केली. एवढ्यावरच न थांबता सत्ताधीशांनी पोलंडमध्ये अस्तित्वात असलेल्या सर्वच कामगार-चळवळी बेकायदेशीर ठरवून टाकल्या. यापुढं सरकारच सहानुभूतीनं (?) कामगारांचे सर्व प्रश्न सोडवणार होतं......

यारुझेल्स्कींनी हा जुगार खेळण्यापूर्वी सर्वच गोष्टींचा विचार केला होता. सॉलिडॅरिटीचा समर्थ नेता लेक वालेसा आणि त्याचे ६०० अनुयायी गजाआड होते. नेतृत्वाचा आवाज बंद होऊन वर्ष उलटत आलं होतं. म्हणजे या ठरावाविरुद्ध देशात फारसा आवाज उठणारच नव्हता. देशाबाहेरची परिस्थितीही याहून वेगळी नव्हती. पॅलेस्टाइनच्या प्रश्नानं पोलंडचा प्रश्न बोथट करून टाकला होता. बैरुतच्या युद्धानं साऱ्या जगाचं लक्ष आपल्याकडं वेधून घेतलं होतं. त्यामुळं दोस्तराष्ट्रं अरब-इस्रायल तंटा सोडवण्यातच मश्गुल झाली होती. त्यांच्याकडूनही जोरदार निषेध होण्याची शक्यता नव्हती. नेमकी हीच वेळ साधून सॉलिडॅरिटी संपवण्याचं यारुझेल्स्कींनी ठरवलं होतं अन् झालंही तसंच......

पोलंडच्या जनतेनं फारसा आवाज उठवलाच नाही. सॉलिडॅरिटीच्या भूमिगत कार्यकर्त्यांनी पत्रकं वाटून लोकांना रस्त्यावर येण्याचा आदेश दिला. तुरळक निषेध अन् मोर्च्यांचे प्रकार सोडले तर पोलंडमध्ये शांतताच राहिली. ३१ ऑगस्टच्या सरकारविरोधी निदर्शनात पाच लोकांचा बळी गेला होता, ही ताजी घटना लोक विसरले नव्हते. पोलीस आणि लष्कराला तोंड देण्याची लोकांची तयारी नव्हती. देशातली शांतता भंग न झाल्यानं बाहेरच्या राष्ट्रांना निषेधाचा आवाज उठवणं अवघड झालं.

अमेरिकेचे अध्यक्ष शनिवार-रविवारची सुट्टी सॅन्टा बार्बारा येथील आपल्या रँचवर घालवण्यासाठी कॅलिफोर्नियातील सॅनडियागोच्या विमानतळावर 'एअरफोर्स वन' या विमानात चढत असतानाच पोलंडची ही बातमी त्यांच्या कानावर पडली. त्यांचा उत्साहच क्षणभर मावळून गेला. ते वैतागून उद्गारले, 'इट इज हॉरिबल! इट इज हॉरिबल!' पोलंडमधून अमेरिकेत आयात होणाऱ्या ४० कोटी रुपयांच्या मालावर जबरदस्त कर लादण्याचा निर्णय अमेरिकन सरकारनं लागलीच घेऊन टाकला.

फ्रान्सचे पंतप्रधान पियरे मोरॉय म्हणाले, 'व्यक्तिस्वातंत्र्यावर अन् मानवी हक्कांवर पोलंडच्या सत्ताधीशांनी केलेला हा सर्वांत मोठा आघात!' अध्यक्ष मितराँ उद्गारले, 'फ्रान्स आणि पोलंडच्या सुरळीत असलेल्या संबंधात या घटनेमुळं फार मोठा व्यत्यय येईल!'

## ते 'भूत' गाडून टाकायचंय!

ब्रिटनच्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर या आपल्या भाषणात पोलंडमधल्या घटनेला रशियाला जबाबदार धरून खडसावून म्हणाल्या, 'मानवी स्वातंत्र्याची पायमल्ली करण्यात रशियानं आणखी एक पाऊल पुढं टाकलं आहे.' जर्मनीनं पोलंडची मुस्कटदाबी आता पूर्ण झाली आहे असा जाहीर निषेध व्यक्त केला.

पण ही झाली शाब्दिक सहानुभूती. आपल्या मित्रराष्ट्रांकडून

या बाबतीत सक्रिय निषेधाची अपेक्षा अमेरिकेला होती. अमेरिकेनं नाटोराष्ट्रांनी पोलंडमधलं आपलं प्रतिनिधित्व कमी करावं अन् पोलंडबरोबरच्या व्यापारात कपात करावी असा आग्रह धरला. या सूचनांच्या विचारासाठी ब्रुसेल्स येथे एकत्र जमलेल्या पश्चिम युरोपीय राष्ट्रांच्या प्रतिनिधींत एकमत तर झालंच नाही, उलट अमेरिकेला हात दाखवून अवलक्षण पदरी पाडून घेण्याची वेळ आली. यामागे इतर अनेक कारणं असली तरी सर्वांत महत्त्वाचं कारण होतं ते म्हणजे सैबेरियाची गॅस-पाइप-लाइन !

रशियानं पश्चिम युरोपीय राष्ट्रांना पेट्रोलियम गॅस-इंधनाचा पुरवठा करण्याचा करार केला. सुरुवातीला या कराराला अमेरिकेनं मान्यता दिली नाही तरी विरोधही केला नाही. मौन हीच संमती समजून रशिया व युरोपीय राष्ट्रांनी हा करार कार्यवाहीत आणण्यास सुरुवात केली. रशियाच्या सैबेरिया प्रांतातून पश्चिम युरोपात गॅस आणण्यासाठी हजारो मैलांची पाइपलाइन टाकणं आवश्यक होतं. यासाठी लागणारी अत्याधुनिक यंत्रसामुग्री ना रशियाजवळ होती ना युरोपीय राष्ट्रांजवळ. आतून कशा काय चाव्या फिरल्या कोण जाणे; पण ही यंत्रसामुग्री पुरवण्यास अमेरिका एकदाची तयार झाली. पाइपलाइन टाकण्याचं कामही जोरात सुरू झालं...अन् पोलंडमध्ये लष्करी कायदा जारी झाला.

'प्रथमग्रासे मक्षिकापातः' असा प्रकार घडला. अमेरिकेनं या घटनेच्या निषेधार्थ रशिया आणि पोलंडवर अनेक बाबतीत बहिष्कार टाकला. त्यांनी जाहीर केलेल्या विविध निर्बंधांच्या कचाट्यात सैबेरियन पाइपलाइन सापडली अन् हे काम मधेच रेंगाळलं. दोस्तांनी दडपण आणूनसुद्धा रीगनमहाशयांनी माघार घ्यायचं नाकारलं. या पाइपलाइनच्या कामासाठी लागणारी यंत्रसामुग्री पुरवण्यास अमेरिकन सरकारनं अमेरिकन कंपन्यांवर बंदी घातली.

नेमकी हीच गोष्ट युरोपीय दोस्तराष्ट्रांना काट्याप्रमाणं सलत होती म्हणूनच त्यांनी पोलंडच्या बहिष्काराबाबतीत बोटचेपेपणाचं धोरण स्वीकारून अमेरिकेशी अप्रत्यक्ष असहकारच केला.

सैबेरियन पाइपलाइन पूर्ण होण्यास आता वेळ लागणार होता. कारण रशियालाच पश्चिम युरोपीय राष्ट्रांच्या सहाय्यानं हे काम पूर्ण करावं लागणार होतं. रशियाला मिळणाऱ्या परदेशी चलनासाठी आता काही काळ थांबावं लागणार होतं. अगोदरच अवघड झालेल्या अंतर्देशीय आर्थिक परिस्थितीची घडी आणखीनच विस्कळित होणार होती याची कल्पना रशियाला नव्हती असं नाही; पण रशियन राज्यकर्त्यांना भांडवलशाही राष्ट्रांत या कारणावरून का होईना दुफळी होते आहे ही दुःखात सुखाची बाब वाटली. या दुफळीचा फायदा पोलंडच्या बाबतीत त्यांना प्रत्यक्षच पहायला मिळत होता.

पोलिश सरकारनं सॉलिडॅरिटी संपुष्टात आणली तरी कामगारांना नव्या संघटना स्थापण्यास परवानगी दिली. कामगारांचं कल्याण व्हावं हाच आपला अंतिम हेतू आहे असं सरकारला दाखवायचं होतं. मात्र नव्या संघटना कशा असाव्यात हे सरकारच ठरवणार होतं. कोणत्याही कम्युनिस्ट देशात कामगारांच्या कल्याणाची संपूर्ण जबाबदारी कम्युनिस्ट पक्षावर पर्यायानं सरकारवरच असते हे गृहीतच धरलं जातं. लेक वालेसाच्या सॉलिडॅरिटीला हे सरकारी कल्याण अकल्याणकारी वाटत असल्यामुळं त्यांनी सत्ताधाऱ्यांना आव्हान दिलं. कामगारांनी कम्युनिस्ट मतप्रणालीला दिलेलं हे आव्हान काही काळ का होईना दडपून टाकण्यात जनरल यारुझेल्स्की यशस्वी झाले आहेत.

कामगारांच्या नवीन संघटना स्थापताना खालील पथ्यं पाळण्याचे आदेश कामगारांना देण्यात आले.

सुरुवातीला कामगारसंघटना प्रत्येक कारखान्यात स्वतंत्रपणे काम करतील. त्यावर पक्षाचं वा सरकारचं नियंत्रण नसलं तरी सरकारचे प्रतिनिधी सभासद म्हणून काम पाहतील. (याचा अर्थ मेंढ्यांच्या कळपात मेंढ्यांची कातडी पांघरून काही लांडगे शांततेने (?) वावरणार होते.)

संप करायचा असेल तर सरकारकडून खास परवानगी घ्यावी लागणार होती. कडक शिस्तीच्या बापाला मुलांनी, 'घरात दंगा घुडगूस करू का' असं विचारण्यातलाच प्रकार होता.

पोलिश गणराज्याची घटना वा कायद्याची चौकट मोडून काम करणाऱ्या संघटनांवर बंदी घालण्याचा हक्क सरकारनं स्वतःकडं राखून ठेवला होता.

शेतकऱ्यांना मात्र कामगारांप्रमाणं कसल्याच संघटना स्थापण्याचं स्वातंत्र्य देण्यात आलं नव्हतं.

पोलंडचे उपपंतप्रधान मायझेस्लाव राकोवास्की हे या निर्बंधांचं समर्थन करताना जाहीर भाषणात म्हणाले, 'सॉलिडॅरिटीनं देश

---

**आणि सॉलिडॅरिटी संपुष्टात आली. हे फार पूर्वीच घडून येईल असं साऱ्यांना वाटत होतं; पण त्यालासुद्धा अकरा महिन्यांचा काळ जावा लागला. मनात असूनही यारुझेल्स्की ते करू शकले नाहीत; पण रशिया–अमेरिका या दोन शक्तींच्या रस्सीखेचीत पोलंडवरचं दडपण वाढत होतं. अखेर इथंही रशियानंच बाजी मारली!....**

**लेखांक : नववा**

**लेखक : श्रीकांत मुंदरगी**

---

अनागोंदीच्या कड्यावर नेऊन ठेवला होता, तो आता परत सुस्थिर होऊ शकेल. देशाचं वाटोळं क पाहणाऱ्या या लोकांना पुन्हा संधी मिळू नये म्हणूनच आम्ही सॉलिडॅरिटीचं भूत गाडून टाकायचं ठरवलंय ! ...' हे भूत सॉलिडॅरिटी संपुष्टात आणूनही गाडलं जाणार होतं की नाही हा भाग वेगळा !

## तुम्हाला तसं का वाटतं ?

गेलं दीड वर्ष सॉलिडॅरिटीचं सातत्यानं समर्थन करत आलेला लेक वालेसाचा आवाज मात्र कुठंच ऐकू येत नव्हता. याचा अर्थ तो आवाज बंद पडला होता असा नव्हे. तो फक्त लोकांपर्यंत पोहोचू नये याची खबरदारी सरकार घेत होतं. वालेसा या वेळी होता तरी कुठं ? जनतेला त्याचा निश्चित ठावठिकाणा समजू नये म्हणून त्याच्या बंदिवासाची जागा वारंवार बदलण्यात येत असे. सॉलिडॅरिटी कायद्यानं रद्द करण्यात आली तेव्हा त्याला वार्सापासून २०० मैलांवर असलेल्या अरलॅमोच्या सरकारी हंटिंग लॉजमध्ये ठेवण्यात आलं होतं.

आदल्या दिवशी संध्याकाळी दरवाजावरचा पहारेकरी आत आला. त्याच्याबरोबर आणखी एक माणूस होता. वालेसानं हातातला बियरचा मग खाली ठेवून त्याला विचारलं,

' डिनरला अजून बराच वेळ असताना मधेच कसा काय आलास ? हे बरोबर आलेले गृहस्थ कोण ? त्यांनामी आजवर कधी पाहिल्याचं आठवत नाही. '

' दॉब्री वेचूर ' ( गुड इव्हनिंग ! ) आपण यांना पहाणार कसे ? प्रथमच येतायत ते इथं... मिस्टर सोब्रोस्की. ' त्या गृहस्थाची वालेसाशी ओळख करून देत पहारेकरी पुढं म्हणाला, ' हे टी. व्ही. टेक्निशियन आहेत. इथला टी. व्ही. सेट दुरुस्तीसाठी न्यायला आलेत ते. '

' अरे. पण इथल्या टी. व्ही. ला झालंय काय ? तो तर व्यवस्थित चालू आहे !' आश्चर्यानं वालेसा म्हणाला.

' तो बिघडलाय असा रिपोर्ट आज सकाळीच करण्यात आला. म्हणून तर त्यांना इतक्या तातडीनं पाठवून देण्यात आलंय. '

ते ऐकून वालेसा उठला अन् त्यानं टी. व्ही. सुरू केला. काही क्षणातच पडद्यावर चित्रं दिसू लागली अन् आवाजही व्यवस्थित ऐकू येऊ लागला.

'तुम्हीच पहा मि. सोब्रोस्की, मला तर यात काहीच बिघाड आढळून येत नाही. तुम्हाला काय वाटतं ?' वालेसानं त्यांच्याकडे पहात विचारलं.

सोब्रोस्की किंचित हसून म्हणाले, 'हे पहा मि. वालेसा, ज्या अर्थी वरून रिपोर्ट आलाय त्या अर्थी नक्कीच त्यात काही तरी बिघाड असणार !'

' पण तुम्हाला तसं वाटतं का ?' वालेसानं थोडंसं कातावून प्रश्न केला.

' मला वाटण्या न वाटण्याचा प्रश्न येतोच कुठं ? वरून हुकूम आलाय की, हा सेट बिघडलाय अन् तो तातडीनं दुरुस्तीला न्यायला हवा. तेव्हा तो मला न्यायलाच हवा !' असं म्हणून त्यानं टी. व्ही. डिसकनेक्ट करून पहारेकऱ्याच्या सहाय्यानं उचलून नेला. दूर जाणाऱ्या त्या दुकलीकडे पहात वालेसा मनाशी म्हणाला, ' या राजवटीत माणसंच काय; पण यंत्रसुद्धा राज्यकर्त्यांच्या मर्जीनुसार वागतात. त्यांच्या मनात आलं की, यंत्रांनी बिघडायला हवं, मनात येईल तेव्हा चालायला हवं. नशीब आपलं निसर्ग तरी निदान इथं आपल्या मर्जीनुसार वागू शकतो. काही तरी गडबड सुरू असावी हेच खरं ! इतक्या गडबडीनं टी. व्ही. हलवला जातो, याचा अर्थ काही तरी महत्त्वाची घटना घडणार असावी. मला ती कळू नये अशी या लोकांची इच्छा असावी...!'

## झिरो ऑप्शन

लष्करी कायदा लागू केला तेव्हा यारुझेल्स्कींना सॉलिडॅरिटीचा निव्वळ आवाज बंद करायचा होता. या संघटनेच्या वरिष्ठ नेत्यांना तुरुंगात टाकलं की तिची चळवळ आपोआपच बंद पडेल. सेनापती पडला की सैन्यात जशी पळापळ होते तसाच प्रकार इथंही होईल अन् हां हां म्हणता या संघटनेचा आपण निकाल लावून टाकू शकू असं यारुझेल्स्कींना वाटत होतं; पण त्यांचा होरा चुकला. वालेसाला आणि त्याच्या निकटवर्तीय सहकाऱ्यांना बंदिवासात टाकूनही संघटनेचं कार्य चालूच राहिलं. वरिष्ठ नेते तुरुंगात जाताच संघटनेत असलेले फितूर मनोवृत्तीचे कनिष्ठ नेते लालूच दाखवली तर सरकारला येऊन मिळतील असा जनरलसाहेबांचा कयास होता. त्याप्रमाणं त्यांनी काही कनिष्ठ नेत्यांना गटवण्यासाठी काही सरकारी अधिकारी पाठवले.

' तुमचे सारे प्रमुख नेते आता गजाआड गेलेत. ते कित्येक वर्षं बाहेर पडू शकतील असं मला वाटत नाही. ' एक सरकारी अधिकारी सॉलिडॅरिटीच्या एका दुय्यम नेत्याबरोबर बोलत होता.

' ते आत गेले म्हणून काय झालं ? संघटना थोडीच बंद पडणार आहे ? आम्ही आहोत ना तिचं कार्य पुढं चालू ठेवायला !' त्याच्या स्वरात आत्मविश्वास प्रकट होत होता.

' पण हे तर सुकाणू नसलेल्या नावेसारखं आहे. प्रचंड वादळ उठलेल्या समुद्रात अशी नाव खडकावर आपटून केव्हा फुटेल सांगता येत नाही. तेव्हा असं दिशाहीन भरकटण्यापेक्षा आम्ही पुढं केलेला मदतीचा हात स्वीकारून सुरक्षित स्थळी पोहोचणं शहाणपणाचं ठरणार नाही का ?'

' तुमच्या-आमच्या सुरक्षितपणाच्या कल्पनाच भिन्न असल्या तर ?'

' सुरक्षितपणाच्या कल्पना भिन्न असूच शकत नाहीत. रहायला चांगलं घर, खायला उत्तम अन्न, मुलाबाळांना झकास शिक्षण आणि गाडी, टी. व्ही. आदि सर्व सुखसोयी हे सारं न झगडता-सवरता मिळणं म्हणजेच सुरक्षितपणा नव्हे काय ? आम्ही हे सारंच तुम्हाला न मागता देऊ करतोय. '

' हे सारं तुम्ही मला द्याल, माझ्यासारख्या आणखी चारचौघांना द्याल, मूठभर लोकांना द्याल; पण हा प्रश्न त्या मूठभर लोकांचा नाही. आम्ही पाच-पन्नास लोक ज्यांचं नेतृत्व करतोय त्या कोट्यवधी कामगारांचा आहे. त्या साऱ्यांना तुम्ही या गोष्टी देऊ शकणार आहात का ?...तसं असेल तर सारा प्रश्नच मिटला. मग आम्हाला ही संघटना अन् या चळवळी चालू ठेवायची गरजच राहणार नाही.

आहेत का तुम्हाला आमच्या या शर्ती मंजूर ?...होतील का जनरल-साहेबांना आमच्या या अटी मान्य ?...'

तो सरकारी अधिकारी थोबाडीत बसल्यासारखा चेहरा करून निरुत्तर होऊन पहातच राहिला. पाणी उथळ आहे म्हणून पाय टाकायला जावं अन् पाण्याच्या खोलीचा थांगच लागू नये अशी त्याची अवस्था झाली. जबरदस्त आमिषं दाखवली की, मासा झटक्यासरशी गळाला लागेल अशा अपेक्षेनं आलेल्या त्या अधिकाऱ्याला हात हलवत परतावं लागलं. थोड्याफार फरकानं हाच अनुभव या खास मोहिमेवर बाहेर पडलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना आला. सॉलिडॅरिटीच्या दुय्यम नेतृत्वाची फळी अभंग राहिली. यारुझेस्कींची गोळाफेक या तटबंदीला खिंडार पाडू शकली नाही.

In the faee of recalcitrance, the regime finally fell back on the 'zero option' of abolishing the union.

या 'झिरो ऑप्शन' शिवाय आता दुसरा पर्यायच नव्हता. सॉलिडॅरिटी संपवून टाकली की देशात धगधगत असलेली असंतोषाची ज्योतच विझून जाईल. एकदा ही आग विझून गेली की, शांतता प्रथापित होऊ शकेल. मग लष्करी कायदा मागं घेणं अशक्य राहणार नाही. डिसेंबर १३ ला लष्करी कायद्याचा पहिला वाढदिवस होता त्या दिवशी लष्करी कायदा संपुष्टात आणण्याचा यारुझेस्कींचा इरादा होता. लष्करी कायदा मागं घेतला की, आपल्या देशावर असलेले आंतरराष्ट्रीय आर्थिक आणि व्यापारी निर्बंध उठवण्यात येतील आणि विस्कळित झालेली देशाची आर्थिक व्यवस्था पुन्हा सुधारू शकेल असं त्यांना वाटत होतं; पण रुळावरून घसरलेली गाडी परत रुळावर येण्याचं चिन्ह काही दिसेना. सॉलिडॅरिटीचं कार्य उघडपणे नसलं तरी गुप्तपणे पूर्वीच्याच जोमानं चालू राहिलं होतं. जनरलसाहेबांच्या निराशेत भरच पडत होती.

## तोच निर्णय समजायचा का ?

नव्या कामगार संघटना स्थापण्यात आल्या की, सॉलिडॅरिटीविषयी लोकांना वाटणारं आकर्षण हळूहळू कमी होत जाईल असं जनरलसाहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांना वाटतं. संपूर्ण स्वावलंबी, स्थानिक अन् स्वतंत्र अशा छोट्या छोट्या कामगारसंघटना स्थापन करायच्या, निरनिराळ्या कारखान्यांतील लोकांना त्या त्या संघटनात सामील करून घ्यायचं आणि त्यांच्या कार्याचं स्वरूप त्यांच्या त्यांच्या कक्षेपुरतंच मर्यादित ठेवायचं असा त्यांचा हेतू आहे. त्यामुळं या लहान-लहान संघटना एकत्र येऊन त्यातून सॉलिडॅरिटीसारखी देशव्यापी संघटना उभी राहण्याचा धोका उद्भवणार नाही अन् अशी संघटना उभीच राहिली नाही तर त्यातून सरकारविरोधी राजकीय चळवळ होण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही.

सॉलिडॅरिटी बेकायदेशीर ठरवून तिला निकालात काढण्याचं निश्चित केल्यावर जनरल यारुझेस्कींनी एक खास पत्र लेक वालेसाला पाठवलं. त्या पत्रात आपली भूमिका प्रामाणिकपणे विशद करताना जनरलनी लिहिलं होतं......

...अशा नव्या कामगार संघटना देशाला निश्चितच नवी दिशा दाखवू शकतील. या संघटना कामगारांच्या कल्याणासाठी झटतील; पण राजकीय बाबीत ढवळाढवळ करणार



मग चळवळी चालू ठेवण्याची गरजच नाही !


नाहीत. मला असं वाटतं की, तुम्ही सॉलिडॅरिटीचं नेतृत्व हाती घेतलंत त्या वेळी तुमच्या डोळ्यांसमोर कामगारांचं कल्याण हाच एकमेव उद्देश होता; पण त्या संघटनेत नंतर शिरलेल्या काही व्यक्तींनी तुमच्या चळवळीला अनिष्ट आणि अभद्र असं राजकीय वळण दिलं. देशाला अनागोंदीच्या खाईत ढकलून त्यावर परकीयांचं वर्चस्व यावं असा देशद्रोही हेतू यामागं होता. म्हणूनच नाइलाजानं देशाच्या आणि पोलिश जनतेच्या भल्यासाठी मला देशात लष्करी कायदा लागू करावा लागला.

कामगारांचं कल्याण हा एकमेव हेतू तुमच्या डोळ्यांसमोर आहे हे गृहीत धरून मी तुम्हाला विनंती करू इच्छितो की, सरकारमान्य अशा नव्या स्थानिक कामगार संघटनांना तुम्ही आशीर्वाद द्यावा. अर्थात अशा संघटना स्थापण्याला तुमची मान्यता असेलच.

तुमच्या पाठिंब्यामुळं कामगारांना काबूत आणणं आणि त्यांना देश आणि स्वहिताची नवी दिशा दाखवणं शक्य होईल. तुमच्या सर्वंकश सहकार्याची देशाच्या अंतिम हितासाठी आम्ही अपेक्षा करत आहोत...

हे पत्र जसं संदिग्ध होतं तसंच संशयास्पदही होतं. सॉलिडॅरिटीला संपवण्याचा त्यात चुकूनही उल्लेख नव्हता. वालेसानं तीन वेळा ते पत्र वाचून पाहिलं; पण सरकारमान्य कामगार संघटना कामगारांच्या कल्याणासाठी कोणत्याही योजना कशा काय राबवू शकतील हेच त्याच्या ध्यानात येईना. अशा संघटनांना आपण मान्यता दिली तर सॉलिडॅरिटीच्या मृत्युपत्रावर साक्षीदार म्हणून सही करण्याजोगं आहे हे तो समजून चुकला. जनरलसाहेबांना पाठवलेल्या उत्तरात त्यानं लिहिलं ...

सॉलिडॅरिटीशिवाय दुसरी कोणतीही संघटना कामगार कल्याणाचं काम करू शकेल असं मला वाटत नाही. ज्या संघटनेत ८० टक्क्यांहून अधिक म्हणजे कोटी कामगार सामील झाले आहेत तीच संघटना कामगारांची अधिकृत संघटना म्हणून काम करू शकेल असा माझा ठाम विश्वास आहे. म्हणूनच इतर कोणत्याही कामगार संघटनांना मान्यता देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.



**तुम्ही कोणता सौदा करायला आला आहात ?**

¤

परकीयांचं वर्चस्व पोलंडवर यावं असं कोणत्याही देशाभिमानी पोलिश नागरिकाला वाटणार नाही. तशी कल्पना माझ्या स्वप्नातदेखील सहन होणारी नाही हे तुम्ही जाणताच. मात्र आपल्या देशाच्या हितासाठी योग्य असेल ते सर्व सहकार्य तुम्हाला माझ्याकडून मिळेल ...

इथला टी. व्ही. सेट असा अचानक, बिघडल्याचा दावा करून का उचलून नेण्यात यावा ? या प्रश्नाचं उत्तर शोधण्याच्या प्रयत्नात वालेसा असतानाच कोणी तरी बाहेरच्या खोलीत आलंय असं वालेसाला जाणवलं. बियरचा मग खाली ठेवून बेडरूमबाहेर जाऊन पहावं अशा उद्देशानं तो उठला असतानाच एक अनोळखी इसम त्या खोलीत शिरला. त्या प्रौढ गृहस्थाच्या अंगावर काळ्या रंगाचा फ्लॅनेलचा सूट होता. त्याच्या हातात एक छोटीशी ब्रीफकेस होती.

' बर्जे .. पुफाले दॉब्रीवेचुर (हॅलो ... गुड इव्हनिंग) !' आपला हात हस्तांदोलनासाठी पुढं करत त्या गृहस्थानं हसऱ्या चेहऱ्यानं वालेसाला अभिवादन केलं.

हा पूर्वी कधीही न पाहिलेला गृहस्थ परवानगी घेतल्याविना आपल्या बेडरूममध्ये शिरतो काय अन् लागलीच वर्षानुवर्षांची जुनीपुराणी ओळख असल्यासारखं आपल्याशी सलगीनं वागू लागतो काय या साऱ्याच गोष्टींचा वालेसाला अचंबा वाटला. त्याचा हात हस्तांदोलनासाठी हातात घ्यावा की नाही या विचारात वालेसा पडला.

' मी झिब्रोस्की, पोलिश सरकारचा अनधिकृत प्रतिनिधी आणि तुमचा हितचिंतक !' त्यानं आपली ओळख करून दिली.

त्याच्याकडं काहीशा संशयानं पहात वालेसानं त्याच्याशी हस्तांदोलन केलं आणि समोरच्या खुर्चीवर त्याला बसण्यास सांगून वालेसा आपणही स्थानापन्न झाला.

' आपण असं न कळवता अचानक येण्याचं प्रयोजन काय हे कळेल का ?' पुढ्यातला दुसरा मग बियरनं भरत वालेसानं विचारलं अन् मग हसल्यासारखं करून स्वत:शीच बोलल्यासारखा म्हणाला, ' अर्थात या प्रश्नालाही काही अर्थ नाही म्हणा ! कोणतीही गोष्ट अशी अचानक करून लोकांना बुचकळ्यात पाडायचं ही आपल्या देशातली रीतच आहे नाही का ?'

झिब्रोस्की काहीच बोलला नाही. बियरचा मग उचलून एक घोट घेऊन तो सावकाशपणे बोलू लागला, ' मि. वालेसा, आपण जनरलसाहेबांना जे पत्रोत्तर पाठवलंय तोच आपला अखेरचा निर्णय समजायचा काय ?'

## तुम्हाला काय सुचवायचंय ?

' अर्थातच ! मी बोलतो तेच लिहितो अन् लिहितो तसंच वागतो. बोलायचं एक अन् वागायचं वेगळं ही पद्धतच मला जमत नाही.' वालेसाला आता कुठं थोडासा अंदाज येऊ लागला. म्हणजे हा माणूस काही तरी खास सरकारी कामगिरीवर आलाय. वालेसा आता अधिकच सावध झाला.

' पण काही वेळा ही पद्धत बदलणं जसं आपल्या हिताचं असतं तसंच देशाच्या हिताचंही ठरू शकतं.' झिब्रोस्की समजावणीच्या सुरात म्हणाला.

' आपलं हित किंवा देशाचं हित नेमकं कशात आहे हे प्रत्येकानं आपल्या सद्विवेक बुद्धीला स्मरून ठरवावं लागतं.' वालेसा उत्तरादाखल बोलला.

' हे पहा मि. वालेसा, मला असं वाटतं की, आपण जवळजवळ नऊ महिने एकांतवासात आहात. आपल्याला या एकांताचा विलक्षण कंटाळा आला असणार ! ...' झिब्रोस्कीचं बोलणं पूर्ण होऊ न देता वालेसा म्हणाला,

' एकांतवासाची मला फार आवड आहे म्हणून मी हौसेनं इथं आलोय असं वाटतंय की काय तुम्हाला ? अन मला याचा लाख कंटाळा आला असला तरी त्याचा काही फायदा आहे का ? इथं येणं जसं माझ्या हातात नव्हतं तसंच इथून बाहेर जाणंही माझ्या हातात नाही !'

' फायदा जरूर जरूर आहे. इथं येणं जरी तुमच्या हाती नव्हतं, तरी इथून बाहेर पडणं सर्वस्वी तुमच्या हाती आहे. तुम्हीच ठरवू शकाल ते !' झिब्रोस्कीनं ब्रिफकेसमधला टाईप केलेला एक कागद वालेसाच्या पुढ्यात ठेवत म्हटलं.

वालेसानं त्या कागदावर नजर टाकत त्याला विचारलं, ' तुम्ही कसला सौदा करण्यासाठी आलाय की काय माझ्याकडं ? तुम्हाला नेमकं काय म्हणायचंय ते सांगा पाहू !'

' मि. वालेसा, असं नाराज होऊ नका. हा कागद वाचून पहा म्हणजे सारं कळेल.'

वालेसानं तो कागद हाती घेऊन मिनिटाभरातच वाचून काढला. जनरलसाहेबांनी त्याला पत्रात लिहिलेला मजकूर वेगळ्या शब्दात इथं मांडण्यात आला होता. सरकारनं स्वत:ला अभिप्रेत अशा कामगार संघटना उभ्या करण्यास उत्तेजन देणार असून वालेसाची त्याला संमती असावी, एवढाच त्याचा अर्थ होता.

'या कागदावर तुम्ही सही दिलीत की काम झालं!' झिब्रोस्की विनवणीच्या सुरात म्हणाला.

'कुणाचं?' वालेसानं तीव्र स्वरात प्रश्न केला.

'तुमचं आणि सरकारचंही!'

'सरकारचं काम होतंय हे ठीक आहे; पण माझं काम कसं काय होतंय बुवा यात?' वालेसानं तिरकसपणानं विचारलं.

'अगदी सरळ आणि सोपं गणित आहे हे!'

'सगळीच गणितं तुम्ही इतकी सोपी करून काढताय की वरवर पाहणाऱ्याला इथं काही प्रश्न आहेत असं वाटूच नये.'

'हे पहा मि. वालेसा, तुमची पत्नी आणि मुलं तुमची उत्सुकतेनं वाट पहातायत. मिसेस वालेसांनी महिन्या-दोन महिन्यांतून कधी तरी यायचं, तास दोन तास तुम्हाला भेटायचं. परवानगी मिळालीच तर एखादा दिवस इथं रहायचं. कधी दोन मुलांना आणायचं तर कधी तीन मुलांना आणायचं. बापाला भेटायचं झालं तर त्या बछ-ड्यांना सरकारची परवानगी घ्यावी लागते. त्या साऱ्यांना एकत्र असं एकदाही भेटता आलं नाही तुम्हाला या नऊ महिन्यात. किती त्रास झाला असेल तुमच्या मनाला .. आपल्या नवजात अर्भकाच्या नामकरणविधीलासुद्धा जाता आलं नाही तुम्हाला. फार वाईट वाटतं मला या गोष्टींचं.' आपल्या बोलण्याचा वालेसावर काय परि-णाम होतोय हे पाहण्यासाठी झिब्रोस्की क्षणभर थांबला. तेवढ्यात निर्विकार चेहऱ्यानं मनातली खळबळ शब्दात उमटू न देण्याची काळजी घेत वालेसानं त्याला विचारलं,

'तुम्हाला नेमकं काय सुचवायचं आहे ते सांगा. हा बाकीचा फापटपसारा मांडून शब्द कशाला व्यर्थ दवडता?'

या कागदावर तुमची सही दिलीत तर ४८ तासांच्या आत तुम्ही तुमच्या कुटुंबियांत परतू शकाल ..' झिब्रोस्कीचं वाक्य तिथंच तोडत वालेसा हसून मिस्किलपणे म्हणाला,

'अन् तुमच्या राजकीय व्यक्तिमत्त्वावर कायमचा पडदा पाडू शकाल... असंच ना?

'का बरं? असं व्हायचं काय कारण? उलट सही दिलीत तर तुम्हाला सरकार या नव्या संघटनांच्या सल्लागार मंडळावर लोक-प्रतिनिधी म्हणून नेमून घेईल, इतकंच नव्हे तर तुम्हाला राहण्यासाठी मंत्र्यांना मिळतो तसा प्रशस्त बंगला मिळू शकेल, फिरण्यासाठी खास वाहनाची सोय करण्यात येईल, तुमच्यासाठी फूड आणि लिकरचे स्पेशल परवाने देण्यात येतील. तसंच सुट्टी घालवण्यासाठी तुम्हाला खास डाच्याची सोय करण्यात येईल. तुम्हाला मंत्र्याइतकं मानधन मिळू लागेल. पुढील आयुष्यात स्थैर्याच्या दृष्टीनं कायमचं पेन्शन मिळू शकेल. शिवाय तुमच्या बायको-मुलांना पोलंडमध्ये असलेल्या सर्व सुखसोयी उपलब्ध करून देण्यात येतील!' झिब्रोस्कीनं बोलणं थांबवताच वालेसानं प्रश्न केला,

'म्हणजे थोडक्यात, मंत्री न होता आयुष्यभर मंत्र्याच्या सुख-सोयी मी भोगू शकेन असं तुमचं म्हणणं आहे.'

'म्हणजे तुम्हाला हे सारं पटलं तर?' निश्वास सोडून उरावरचं ओझं उतरल्यासारखं झिब्रोस्की बोलला.

'महाशय, तर मग मी तुम्हाला स्पष्ट सांगतो की, मला या गोष्टींत काडीइतका रस नाही. मला साऱ्या सुखसोयी स्वीकारून सत्ताधीशांची मर्जी संपादन करण्यापेक्षा कामगारांचं खऱ्या अर्थानं कल्याण करणं महत्त्वाचं वाटतं. मग त्यासाठी माझ्या कपाळी काय-मचा एकांतवास आला तरी चालेल! या एकांतवासात मी जेवढा सुखी समाधानी आहे त्याच्या शतांशानंदेखील सुख तुम्ही देऊ केलेल्या गुलाबी शय्येवर मला मिळणार नाही!'

'हे तुमचं शेवटचं उत्तर समजू का? की अजून विचार करायला तुम्हाला अवधी हवा?'

'माझे विचार अन् माझे आचार हे परस्पर विरोधी नसतात. त्यामुळं यावर पुन्हा विचार करायची मला गरज भासत नाही.' आणि तो कागद झिब्रोस्कीच्या हातात देत वालेसा म्हणाला,

'दुब्रॉनोच... पा! (गुडनाईट...बाय बाय!')

दूर जाणाऱ्या झिब्रोस्कीकडं पहात असतानाच वालेसाला उमजलं की, उद्या फार मोठा असा राजकीय निर्णय घेतला जाणार असावा अन् आपल्याला ते समजू नये म्हणूनच इथला टी. व्ही. सेट उचलून नेला असावा!

(क्रमशः)


"मला शक्य असते तर मी या ग्रंथाच्या लाख प्रती काढून ग्रामीण भागातील मुलाबाळांच्या हाती पडतील अशी व्यवस्था केली असती."
— कलकत्त्याहून **श्री. बा. जोशी**

'कार्व्हर' पहिल्या आवृत्तीचे असे उत्फूर्त व भरघोस स्वागत झाले.


मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी शाळांसाठी — शिक्षण संस्थांसाठी या ग्रंथाची शिफारस केली.

**दुसरी आवृत्ती प्रकाशित**

**एक होता कार्व्हर** सौ. वीणा गवाणकर

मूल्य : तीस रुपये । सवलत मूल्य : बावीस रुपये
नजीकच्या विक्रेत्यांकडे मागणी करा.
ठराविक प्रतींची विक्री होईपर्यंतच सवलत चालू.

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव, पुणे ३०




# श्रम एव जयते

नेतृत्व, शिस्त आणि कठोर परिश्रम यामुळेंच ९वा आशियाई क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यात नेत्रदीपक यश मिळाले आणि त्यामुळेंच प्रचंड योजनांची आंखणी आणि त्वरित अंमलबजावणी याबाबतीत भारताच्या क्रियाशीलतेचा साऱ्या जगातर्फे गौरव करण्यात आला.

ठराविक मुदतीत क्रीडा मैदाने उभारण्यात आली देशात तसेंच देशाबाहेर लक्षावधि घरांतून लोकांना रंगीत दूरचित्रवाणीवर क्रीडा स्पर्धा आणि सामने पाहणे शक्य झाले. गणकयंत्रें, विद्युतकण विस्तार केंद्रे, मायक्रो-व्हेवआणिउपग्रह शृंखला यांचा प्रचंड विस्तार करून, त्याचा विविध सेवांसाठी सुरक्षीत आणि कार्यक्षमतेने उपयोग करण्यात आला.

# ही ज्योत जळत ठेवा

राष्ट्रीय उत्थानाच्या भव्य क्षेत्रात, आपण आशियाई क्रीडा महोत्सवातील प्रेरणेंचा विस्तार करू या.



आमचा आर्थिक विकास चालूच आहे. ही प्रगति जलद करून आपल्या लक्षावधि बांधवांवरील बोजा कमी करणे आमच्या हातांत आहे. आपण प्रत्येकाने कटिबद्ध होऊन हा प्रयत्न करावयाचा आहे.

खांद्याला खांदा लावून करू काम
आपल्या राष्ट्राला करू बलवान.

davp 82/592

रंगभूमी

**कन्यादान** : २६ मार्च अंकात या नाटकावरचा एक अभिप्राय विनया खडपेकर यांनी लिहिला होता. ही आणखी एक प्रतिक्रिया...

# तेंडुलकरांची सराईत कारागिरी, देखणा प्रयोग

सदानंद बोरसे

माणसे प्रथमतः 'व्यक्ती' असतात. ती आधी 'व्यक्ती' आणि मग सर्व काही असतात. या अर्थाने नाटकातली माणसे प्रथमतः स्वतःचेच प्रतिनिधित्व करतात.

त्यानंतर ती कोणत्याही धर्मपंथाची वा पक्षाची प्रतिनिधी असू शकतील.

त्यांच्याकडे पाहताना हे विसरले जाऊ नये. ते नमुने (Type) नव्हेत, प्रातिनिधिक तर नव्हेतच नव्हेत. एका विशिष्ट परिस्थितीत ही माणसे सापडतात आणि हे नाटक आकार घेते.

प्रातिनिधिक काही असेलच तर कदाचित या नाटकातला विचार.

□

इंडियन नॅशनल थिएटरनिर्मित, विजय तेंडुलकर-लिखित आणि सदाशिव अमरापूरकर-दिग्दर्शित 'कन्यादान' हे नाटक रंगभूमीवर सादर झाले. प्रमुख भूमिकेत डॉ. श्रीराम लागू हे नाटकामागच्या अन्य बड्या नावांबरोबरच नाटकाचे सर्वांत मोठे आकर्षण होते. नाटकाच्य पहिल्या प्रयोगाच्या निमित्ताने श्रेयनामावलीसोबत जोडलेल्या पत्रकावर लेखाच्या सुरुवातीला उद्धृत केलेला मजकूर छापलेला होता. संस्थेतर्फे अधिकृतरीत्या दिलेल्या पत्रकावरील या ओळींना नाटकाचे लेखक म्हणून विजय तेंडुलकरांची मान्यता असणार. कदाचित त्या ओळींचे जनकत्वही त्यांच्याकडे असेल, असे मी गृहीत धरतो.

'कन्यादान' चे कथानक असे—

समजावादी देवाळालीकर (डॉ. श्रीराम लागू) हे समजावादी पक्षाचे नेते, विधान परिषदेचे आमदार, आयुष्यभर उराशी विश्वासाने बाळगलेली लोकशाही मूल्ये अगदी स्वतःच्या घरगुती जीवनातही निष्ठेने जपणारे. त्यांची पत्नी सेवा (सुहास जोशी) हीही त्यांच्याप्रमाणेच सामाजिक कार्यकर्ती. ज्योती (सुषमा तेंडुलकर) आणि जयप्रकाश (डॉ शिरीष आठवले) ही देवळालीकर दांपत्याची मुले, हे त्यांच्या समाजवादी नावांवरूनच लक्षात येते. तर असे हे चौकोनी समाजवादी कुटुंब. नाथ देवाळालीकरांची अधिवेशने, भाषणे, सेवा देवाळालीकरांची शिबिरे आणि पोरांची शिक्षणे यातून सुखरूप चाललेल्या या समाजवादी संसारजहाजाला अचानक एक दिवस धक्का बसला, ज्योतीने दिला. तिने जाहीर केले, 'मी लग्न ठरवले आहे. मुलाचे नाव अरुण आठवले. मुलगा दलित आहे.' मुलीची ही वार्ता कानी पडताच मुलीचा बाप 'अजि मी ब्रह्म पाहिले' प्रमाणे संद्गदूनच आला; पण मुलीच्या व्यवहारी आईने मात्र रीतीप्रमाणे मुलगा काय करतो, स्वभावाने कसा आहे, घरी कोण कोण आहे इत्यादि चौकश्या रीतसर केल्या आणि त्यातून निष्पन्न इतकेच निघाले की, जेमतेम महिन्याभराचा अल्प परिचय असल्यामुळे ज्योतीला या गोष्टींची फारशी कल्पना नाही, मुलगा बी. ए. ला असून त्याच्या कवितांवरच ज्योती मुख्यतः फिदा आहे.

यानंतर एकदा मुलगा मुलीच्या आई—वडिलांना दाखवण्याचा कार्यक्रम झाला आणि सेवा आणि जयप्रकाशच्या इच्छेला न जुमानता ज्योतीच्या मताप्रमाणे तिचे लग्न अरुण आठवलेशी झाले. नाथ देवळालीकरांना तर हे लग्न म्हणजे सामाजिक क्रांतीचे पाऊल पुढे नेणारा एक अभिनव प्रयोग वगैरे वाटत होता. लग्नानंतर मात्र सगळेच बदलले. ज्योतीच्या वाट्याला तीव्र शारीरिक आणि मानसिक छळ आला. अरुण आठवले (सदाशिव अमरापूरकर) नावाचा माणूस एकाच वेळी एक प्रियकर आणि एक रानटी नवरा, एक कवी आणि एक व्यापारी अशा अने परस्परविरोधी छटा स्वतःमध्ये वागवत होता. हा साक्षात्कार झाल्यानंतर ज्योती एक दिवस वडिलांकडे आली. 'माणसातील देवत्वाचा विकास घडवायचा आणि पशुत्व गाडून टाकायचं, या तुमच्या बकवासाला काही अर्थ नाही. माणूस स्वीकारायचा असेल तर त्याच्यामध्ये एक क्रूर पशू आहे, हे मान्य करून त्याच्यासकटच स्वीकारायला हवा. हा पशू त्याच्यातून वेगळा काढता येत नाही. तुम्ही या गोष्टीपासून मला अंधारात ठेवलेत; पण अरुणकडे मी ही गोष्ट शिकले.' असे नाथच्या आयुष्यभरच्या निष्ठांचे आणि (सर्वोदयी—समाजवादी) तत्त्वज्ञानाचे बरेच वाभाडे काढून 'मी दलित नाही, ज्योती अरुण आठवल नावाची म्हारीण आहे.' असे त्या वाभाडयांवर थुंकून चालती झाली!

## शोकांतिकेचा आभास उत्तम !

सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे या नाटकातून विजय तेंडुलकरांना कोणतीच सामाजिक समस्या वगैरे मांडायची नाही. (कारण समाजसुधारक अशी त्यांची प्रतिमा कधीच नव्हती. कोणताही विचार वा तत्त्वज्ञान त्यांना मांडायचे वा खंडायचे नाही. (कारण विचारवंत वा तत्त्वज्ञ ही विशेषणे स्वतः तेंडुलकरही स्वप्नातसुद्धा स्वतःच्या मागे लावणार नाहीत. त्यांच्या दृष्टीने ही 'माणसे प्रथमतः व्यक्ती असतात, एका विशिष्ट परिस्थितीत सापडतात आणि हे नाटक आकार घेते.' या व्यक्तींचा वेध एक कलाकार म्हणून तेंडुलकरांना या नाटकातून घ्यायचा आहे. या तेंडुलकरांच्या कामगिरीचा वेधही नाटकाचे कथानक असा synthetically न करता पात्रांचे 'व्यक्ति' विश्लेषण अशा स्वरूपात घेणे अधिक योग्य ठरेल.

१) अरुण आठवले – या महार तरुणाची व्यक्तिरेखा. या नाटकातील 'विशिष्ट परिस्थिती' घडवणारी व्यक्तिरेखा. हा गृहस्थ लग्नानंतर बायकोला लाथाबुक्क्यांनी तुडवतो, क्वचित डागतो. बायको गरोदर असल्याचीही तमा न बाळगता तिला रक्तस्राव होईपर्यंत लाथा घालतो, शिवीगाळ म्हणजे काही विशेष नाही, 'तुझी आई म्हणजे समाजवादी पुढाऱ्यांना सेवादलातल्या पोरी पुरवणारी कुंटीण आहे आणि बाप तुझा खरा बाप नाही. तो गुरुजींसारखाच छक्का आहे !' अशी सत्काराची मुक्ताफळे बायकोच्या गळ्यात घालतो. हे सगळे करून वर (तेंडुलकरांच्या मते) हा नवरा आपल्या बायकोवर अगदी मनापासून प्रेमही करतो; कारण रात्री शेजेवर हा प्रियकर बायकोला चुंबनधारांखाली भिजवून टाकतो आणि शिवाय त्याला काही साजूक कविताही होतात. आपल्या सामाजिक दु:स्थितीचे, शोषणाचे अत्यंत भेदक वर्णन करणारी आत्मकथाही या तरुणाने लिहिली आहे. ती अतिशय गाजल्यानंतर त्या गाजावाजाचा यथायोग्य व्यापारी विनिमयही त्याने करून घेतला आहे. या माणसाला प्रेम आणि क्रौर्य यांचे चमत्कारिक मिश्रण असे तेंडुलकर मानत असतील; तर त्यांनी 'प्रेम' आणि 'क्रौर्य' या दोन्हीच्या त्यांच्या डोक्यातील व्याख्या आधी स्पष्ट कराव्यात. माणसाचे व्यक्तिमत्त्व फक्त काळ्या अथवा पांढऱ्या धाग्यांनी विणलेले नसते, हे घीसेपीटे वाक्य मी पुन्हा उगाळण्याची आवश्यकता नाही; पण मग ज्या वेगवेगळ्या रंगांनी, त्यांच्या छटांनी हे व्यक्तिमत्त्व बनलेले असेल ते रंग, त्या छटा तेंडुलकरांमधील कलाकाराला दिसत नाहीत की त्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यात त्यांच्यामधील नाटककार थिटा पडला ? की, बायको नावाच्या व्यक्तीचा विचार न करता तिच्या थकल्या शरीरावर आणि श्रांत मनावर बलात्कार करीत स्वत:ची वासना भागवून घेणे हीच प्रेमाची खरीखुरी रीत आहे; त्यामुळे अरुण आठवल्यांच्या या जिवंत प्रेमापुढे त्यांचे बाकी सर्व काही फिके, असे तेंडुलकरांना वाटते ? देवपण आणि पशुत्व हे ढोबळ वर्गीकरण बाजूला ठेवा; पण सच्चेपणा आणि ढोंगीपणा, अगतिकता आणि आपमतलबीपणा, असहाय्य संयमीपणा आणि संधीसाधू शिरजोरी या प्रत्येकामध्ये फरक नाही, असे तेंडुलकरांना वाटते का ? ज्योतीला एकदा मारल्यानंतर आपला हात तोडून घेण्याची – तीही दारू पिऊन लास झालेल्या अवस्थेत – बडबड करणारा अरुण ज्योतीवरील जान–कुर्बान प्रेमाचे प्रतीक आहे, असे तेंडुलकरांना वाटते का ?

२) ज्योती – काहीशा संरक्षित पण भरपूर मोकळ्या, स्वतंत्र आणि रूढार्थाने समृद्ध वातावरणात वाढलेली ही मुलगी काहीशी impulsive आहे; पण उथळ नाही. त्यामुळेच 'अरुण आठवले'च्या व्यक्तिमत्त्वाचा विचार न करता ती फक्त त्याच्या शब्दकवितांमध्ये अडकून त्याच्याशी लग्न करण्यास तयार होईल हे पटत नाही. फक्त वडिलांच्या प्रयोगाखातर वा स्वत: दिलेल्या शब्दाखातर अरुणचे वाटेल ते वागणे खपवून घेण्याइतकी झापडे ज्योतीने स्वत:च्या डोळ्यांना बांधून घेतली आहेत, असे तेंडुलकरांना सुचवायचे आहे का ? संपूर्ण नाटकात ज्योती सुरुवातीला प्रथम दृष्टिक्षेपातील प्रेमात विरघळलेली भाबडी किशोरी आणि नंतर नवरेशाही, मारझोडशाही यांनी गांजलेली अबला अशीच उभी राहाते. अरुणच्या किंवा कोणत्याही महाराच्या घरातील वातावरण किंवा 'माझ्या आईला हागीनदारीत काम करावं लागतं.' ही त्याच्या घरातील परिस्थिती याबाबत ज्योती अनभिज्ञ असू शकेल ? पुन्हा हे सगळे वातावरण आणि त्यातून तिला दिसलेला पशूस किंवा माणूस अरुण पाहून असे काय घडले की, ज्यामुळे तिने आपल्या बापाच्या 'माणसातील पशुत्व कमी करणे' वगैरे निष्ठांवर एकदम तुटून पडावे ? फार तर माणसाचे analysis करण्याची वडिलांची पद्धत अमान्य करून ती Synthesis च्या दृष्टिकोनातून या माणसाचा एकत्रितपणे विचार करीत होती, असे म्हणता येईल. अरुणचा पशू, कवी, प्रियकर वगैरे एकजिनसीपणा पोटातील लाथा विसरून बापापुढे मांडणारी आणि अरुणची तरफदारी करताना बापाच्या ढोंगी भाषणाची निर्भर्त्सना करणारी ज्योती असा विचार का करीत नाही की,' पशुत्व वगैरे मारण्याचा प्रयोग करणारा मानवतावादी बाप आणि अरुणची, त्याच्या पुस्तकाची भाषणातून मनाविरुद्ध स्तुती करणारा आपला ढोंगी बाप हेही दोघे एकच आहेत ? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे एवढीच आहेत की, निरनिराळ्या गोष्टींची मनचाही मोडतोड करून आणि त्यांची अत्यंत चमत्कारिक जोडाजोड करून 'हे बघा हो, काय विचित्रच झालं.' असे एखादे विवाद्य उत्पादन तेंडुलकरांना काढायचे असते. खरे तर या नाटकातील या दोनही व्यक्तिरेखांबाबत आलेले अरुण हा दलित तरुण आणि ज्योती ही समाजवादी ब्राह्मणनेत्याची मुलगी हे दोन संदर्भ काढून टाकल्यास हे संपूर्ण नाटक म्हणजे एक चौकोनी कुटुंब, त्यातील मुलीने केलेला प्रथमदृष्टिक्षेपघटित प्रेमविवाह आणि नंतर 'जामातो दशमो ग्रह:' मुळे तिचा फसलेला संसार असा अत्यंत पारंपारिक साचा तयार होतो. हे दोन संदर्भ या साच्याला जोडल्यामुळेच त्यातील व्यक्तींमधील तात्त्विक संघर्ष उभा राहतो आहे, असेही नाही. हे संदर्भ जोडून हा पारंपारिक संघर्ष उगाचच वेगळ्या सामाजिक व तात्त्विक पातळ्यांवर नेल्याचा आणि त्यातून समाजवादी नेत्याच्या व्यक्तित्वाची अथवा तत्त्वनिष्ठांची शोकांतिका बनवल्याचा आभास तेवढा तेंडुलकरांनी उत्तम उभा केला आहे. चालू परिस्थितीत उभारी धरणाऱ्या अथवा लक्षणीय वाटणाऱ्या एखाद्या सुराच्या विरुद्ध अेखादा आवाज काढायचा आणि जमल्यास त्यामुळे उठणारे वादळ परस्पर पदरात लाटायचे, असा गनिमीकावा तेंडुलकरांच्या गेल्या काही कलाकृतींमधून दिसतो. उदाहरणार्थ– (१) विज्ञाननिष्ठेचा, बुद्धिनिष्ठेचा आग्रह मूळ धरत असताना 'गहराई'-मधून अनैसर्गिक अनुभूतींचा मांडलेला दृष्टिकोन. (२) 'मित्राची गोष्ट' मधून समलिंगी संभोग ही विकृती नसून प्रकृतीच आहे का, असा मांडलेला दृष्टिकोन. त्यातही माणसातील क्रौर्याचे तेंडुलकरांना आकर्षण आहेच. प्रश्न येतो तो या क्रौर्याला माणसाचा अविभाज्य घटक बनवून तेंडुलकर त्याचे समर्थन करू लागतात तेव्हा, जसे त्यांनी 'कन्यादान' च्या अखेरीस अरुण आठवलेचे केले आहे. यात तेंडुलकरांचा अप्रामाणिकपणा आहे, असे मला अजिबात म्हणायचे नाही; पण प्रामाणिकपणेच ज्या पायावर ते आपले म्हणणे रचतात तो पाया पुन्हा एकदा तपासून पाहायला हवा. माणूस आणि त्याच्यामधील प्रवृत्ती यांची फारकत करता येत नाही. असा अभंगत्वाचा सूर काढणारे तेंडुलकर नाटकाच्या पत्रकातील

'ते (माणसे) नमुने Type नव्हेत; प्रातिनिधिक तर नव्हेतच नव्हेत ... प्रातिनिधिक काही असेलच तर या नाटकातला विचार.' या म्हणण्याला मान्यता देतात किंवा असे म्हणतात; तेव्हा प्रश्न पडतो, माणसाच्या प्रवृत्ती जर वेगळ्या काढता येत नाहीत, तर त्यांचे विचार वेगळे काढता येतील का? मग माणूस प्रातिनिधिक नाही; पण विचार मात्र प्रातिनिधिक हे कसे काय? का नाटकाचा विचार आणि त्यातील पात्रांचे विचार हे वेगवेगळे काढता येतात? फारसे खोलात न शिरण्यासाठी ठेवलेली पळवाट म्हणजे हे निवेदन. शेवटी फक्त प्रस्थापिताला नाकारण्यामुळेच नाकारणाऱ्या प्रत्येक गोष्टीचे समर्थन होऊ शकत नाही.

### नाथ आणि सेवा

तेंडुलकरांच्या बहुतेक नाटकांमधून मला तरी असे जाणवते की एखाद्या व्यक्तिमत्त्वातील नाट्यमयता किंवा घटनेतील नाट्य त्यांना प्रकर्षाने जाणवते, उभेही करता येते; पण तेवढे केल्यानंतर नाटककाराच्या पायरीपलीकडे फार खोलवर जाण्याची तेंडुलकरांची इच्छा नसते. साहजिकच त्यांनी मांडलेले नाट्य काही वेळेस एखाद्या इतिवृत्तासारखे (हे इतिवृत्त फक्त चांगल्या कसबी वार्ताहराचे) बनते; तर कधीकधी अगदी उथळ वा बटबटीत बनते. नेमका हाच उथळपणा आणि बटबटीतपणा 'कन्यादान'मध्ये दुर्दैवाने अरुण आणि ज्योती या दोन प्रमुख व्यक्तिरेखांच्या वाट्याला आला.

३) नाथ देवळालीकर – सर्व दृष्टींनी चोख उतरलेली नाटकातील ही व्यक्तिरेखा. प्रत्येक व्यक्तीला समजून घेणारा, प्रत्येक व्यक्तीच्या विचारांचा आणि भावनांचा सन्मान करणारा, आपले तत्त्वज्ञान आणि आचरण यात शक्य तितकी एकरूपता ठेवणारा नाथ ज्योतीच्या बाबतीत अतिशय हळवा बनतो तिच्या आयुष्याच्या झालेल्या परवडीला स्वतःलाच जबाबदार धरतो. अरुणचा उद्दामपणा किंवा त्याच्या वागण्यातील शिष्टाचारांचा अभाव यांच्याकडे काहीसे कौतुकानेच बघणारा नाथ अरुणच्या असभ्यपणामुळे मात्र घायाळ होतो. अरुणच्या आत्मकथेची भाषणातून मनाविरुद्ध स्तुती करणे हा नाथाचा ढोंगीपणा असेल कदाचित; पण तो अगतिकतेतून आलेला आहे, अरुणप्रमाणे मतलबी वा व्यापारी ढोंगीपणा नाही. नाटकाच्या शेवटीही तेंडुलकरांचे माणूस आणि त्याच्या प्रवृत्तींचे अभंगत्व किंवा एकत्व वगैरे वगैरे बाजूला राहते आणि लक्षात फक्त नाथ देवळालीकर आणि सेवा देवळालीकर राहतात.

४) सेवा देवळालीकर– नाथ देवळालीकऱ्च्या बरोबरीनेच नाटकामध्ये उठून दिसणारी व्यक्तिरेखा म्हणजे नाथची पत्नी सेवा. नाथच्या ध्येयवादाला संसारात मिळालेली व्यावहारिकतेची जोड म्हणजे सेवा. विचार वा निष्ठा यांची सेवाला जाण आहे; पण त्याचबरोबर फक्त त्यांच्यामागेच 'हरहर महादेव' करीत धावण्याचे वेडे साहस परवडणारे नाही, हे सावध व्यवहारी शहाणपणही तिच्याजवळ आहे.

थोडक्यात या चारही व्यक्तिरेखांचा 'व्यक्ती' म्हणून विचार केल्यानंतर नाटकाला आकार देणाऱ्या 'विशिष्ट परिस्थिती'च्या संदर्भात त्यांच्या व्यक्तित्वाचा फारच थोडा भाग अडकलेला असतो. उदाहरणार्थ अरुण आणि ज्योतीबद्दल मी केलेल्या आधीच्या उल्लेखांप्रमाणेच नाथ आणि सेवाही समाजवादी न दाखवता एक हपिसात जाणारा कारकून बाप आणि त्याचे घर सांभाळणारी सुगृहिणी असे दाखवले असते तरी फारसा फरक पडला नसता. संवाद फार तर 'तरी मी तुम्हाला सांगत होते की, या घरी मुलगी देऊ नका' आणि 'जाऊ दे ग, तिचं नशीब आणि आपले गेल्या जन्मीचे भोग म्हणायचं आणि गप्प राहायचं!' असे थोडेसे बदलले असते.

बाकी तेंडुलकरांच्या नाट्यलेखनातील सराईत कामगिरीबद्दल, अत्यंत प्रवाही आणि सुंदर संवादांबद्दल तेचतेच नेहमी नेहमीचे किती वेळा लिहिणार?

नाथ आणि सेवा स्टेजवर समूर्त करण्यात तेंडुलकरांबरोबर डॉ. श्रीराम लागू आणि सुहास जोशींचा वाटा अतिशय मोठा दोघांना रंगमंचावर पाहणे आणि ऐकणे म्हणजे एक प्रत्येकाने घ्यावा, असा अनुभवच आहे. हीच गोष्ट अरुण आठवले झालेल्या सदाशिव अमरापूरकरांची. डॉ. शिरीष आठवल्यांना चहाचे कप आणण्या-नेण्याची वेटरी आणि प्रवासी बॅगा आणण्या-नेण्याची हमाली याव्यतिरिक्त फारसे काम नाही.

नाटकाचे दिग्दर्शक सदाशिव अमरापूरकर आहेत 'नाटक' या माध्यमावरचे आपले नियंत्रण 'हॅंड्स अप'नंतर अमरापूरकरांनी पुन्हा सिद्ध करून दिले आहे. फक्त नाटकाच्या शेवटी ज्योतीचे सर्व वाक्ताडन संपल्यानंतर नाथ देवळालीकरांभोवती एकदम गडगडाटी ढग आणि कडकडाटी विजा घोंघावायला लागतात, त्या कशासाठी?

अत्यंत आवश्यक तेवढेच संगीताचे दोन तुकडे आणि अत्यंत जरुरीपुरती प्रकाशयोजना यामुळे संगीत आणि प्रकाश या दोनही बाबतीत नाटकाने कान आणि डोळे यांना त्रास देण्याचे अजिबात नाकारले.

नाटकाच्या आशयाबद्दल आणि संहितेबद्दल नानाविध आक्षेप असले तरी नाट्यप्रयोग म्हणून एक देखणा अनुभव इंडियन नॅशनल थिएटरच्या या 'कन्यादान'ने दिला. □

---

**वनस्थळी ग्रामीण विकास केंद्र आणि म. गांधी विद्यालय, उरळीकांचन यांचेतर्फे**

## ग्रामीण महिलांसाठी बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण

ग्रामीण अल्पशिक्षित महिलांसाठी वरील संस्थांतर्फे उरुळीकांचन येथे बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण सुरू होते आहे. आपापल्या गावात ग्रामपंचायती, समाजसेवी संस्थांच्या सहाय्यानं, स्वतःच्या पुढाकारानं बालवाड्या सुरू करण्याची तयारी असणाऱ्या महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा.

यापूर्वी हवेली, शिरूर, पारनेर, खंडाळा या तालुक्यांमध्ये सहा सहा महिने मुदतीचे प्रशिक्षण-वर्ग योजिले गेले. त्यातून उत्तीर्ण झालेल्या अनेक शिक्षिका आपापल्या गावात, वाड्या-वस्त्यांवर बालवाड्या चांगल्या पद्धतीने चालवीत आहेत.

प्रशिक्षणाच्या सहा महिन्यांच्या अभ्यासक्रमासाठी हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेच्या पूर्व प्राथमिक अध्यापन विद्यालयाचे मार्गदर्शन आहे.


वनस्थळीतर्फे जून ८३ पासून हवेली तालुक्यात उरुळीकांचन व खानापूर तसेच पुरंधर तालुक्यात सासवड येथे सुरू होणाऱ्या प्रशिक्षणवर्गाची माहिती :

– अभ्यासक्रमाचा काळ : जून ते नोव्हेंबर १९८३.
– प्रशिक्षणार्थी महिलांची शैक्षणिक पात्रता : किमान ८ वी पास.
– वयोमर्यादा : १८ ते २५.
– फी : द. म. रु १५/– फक्त.
– निवासव्यवस्था : आवश्यकता वाटल्यास करण्यात येईल. त्याचा खर्च वेळेवर कळविण्यात येईल.

ज्या महिलांना या प्रशिक्षणासाठी प्रवेश घ्यावयाचा असेल त्यांनी सविस्तर माहितीसह पुढील पत्त्यावर अर्ज करावेत.

अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख ३० एप्रिल १९८३ आहे.

पत्ता : निर्मला पुरंदरे
वनस्थळी ग्रामीण विकास केंद्र, २६ पर्वती, पुणे ४११००९.




## दादा आता हिंदी चित्रपटाकडे वळले आहेत...

# पांडोबा फसले रे फसले !

'दादा, हे पिक्चर आपण सेन्सॉरबोर्डासाठी काढतो आहोत, नाही ?'— अमजद म्हणतो.

'मग काय तर ! हे पिक्चर मी आधी राजीव गांधीला दाखवणार आहे. मग सेन्सॉर बोर्डाला !'—दादा कोंडकेंनी आपली युक्ती सांगितली.

'माझी चूकच झाली. 'चोर—पोलीस' हा मी आधी राजीवला दाखवायला पाहिजे होता. आता अडकून बसलाय !'

दादा कोंडके आता हिंदी चित्रपट काढताहेत—' तेरे मेरे बीच में ' म्हणजे ' राम राम गंगाराम ' चाच हिंदी अवतार ! ह्यातली महत्त्वाची ममद्याची भूमिका करतोय अमजदखान आणि तो इतका फिट्ट बसलाय भूमिकेत की दादा एकदम खुष ! कोल्हापूरच्या वेगळ्या परिसरात जयप्रभा स्टुडिओच्या घरगुती वातावरणात शूटिंगचा हा वेगळाच अनुभव अमजद घेतोय. दोघंही एकमेकांवर इतके खुष आहेत की, एकमेकांना दादा खान आणि अमजद कोंडके संबोधण्यापर्यंत मजल गेलीये !

दादा कोंडके हे मराठी चित्रपटसृष्टीतलं वादग्रस्त व्यक्तिमत्त्व. त्यांच्या चित्रपटातला विनोद वादग्रस्त, अश्लील आणि खालच्या दर्जाचा म्हणून गणला गेलेला आणि तरीही बराच काळ मराठी चित्रपटांच्या 'त्याच त्याचपणा'ला कंटाळून हिंदी चित्रपटांकडे वळलेल्या मराठी प्रेक्षकवर्गाला परत मराठीकडे वळवण्याचं श्रेय घेणारी अशी ही दादा कोंडके शैली.

द्व्यर्थी संवाद म्हणजे तर दादांच्या चित्रपटांचा प्राण ! हे सगळं असूनही आजवर ते सेन्सॉरच्या कात्रीतून सहीसलामत 'यू' सर्टिफिकेटसहित सुटून येत आले आहेत. त्यांचं एक नेहमीचं अर्ग्युमेंट असतं—'सेन्सॉरला द्व्यर्थी संवाद वाटतात. कारण सेन्सॉर स्वतःच त्यातून दुसरा अर्थ काढतं. त्याच वाक्याचा निरागस अर्थ असतो, तो का नाही विचारात ते घेत ?'

एकीकडे असं म्हणत असतानाच दुसरीकडे ते दुसरं एक अर्ग्युमेंट करतात. 'दोन अर्थ निघाल्याशिवाय विनोदनिर्मिती कशी होईल ? एकदा एका माणसानं आपल्या मित्राला पेढा दिला. म्हणाला, 'घे पेढा घे, मला मुलगा झाला !'

'अरे वा ! अभिनंदन हं ! शाब्बास !'— वगैरे त्या मित्राची मुक्ताफळं.

त्यावर पहिल्यानं विनयानं म्हटलं, 'ऊपरवाल्याची कृपा आहे बाबा !'

'ऊपरवाल्याची कृपा ? तुझ्यावर कोण रहातं ?'—हा त्या मित्राचा वाकडा प्रश्न. आता त्यातून जो विनोद निर्माण होतो, तो मित्राने 'ऊपरवाला' म्हणजे देव असा सरळ अर्थ घेतला नसता तर विनोद निर्माण झालाच नसता !'

तर अशा त्या आपल्या वैशिष्ट्यांसहित दादा कोंडके आता हिंदी चित्रपटक्षेत्रात पदार्पण करीत आहेत. खरं तर 'पांडू हवालदार'च हिंदीत काढायचा त्यांचा बेत होता; पण पाय मागे खेचले नाहीत तर लोक कसले !

'हिंदी चित्रपट काढायचा म्हणजे काय खायचं काम आहे का ? शिवाय पोलीसचा विषय !' राहिलं, त्याऐवजी दादा कोंडके तोच विषय दुसऱ्या हिंदी निर्मात्याला देऊन मोकळे झाले आणि तोही 'दो हवलदार' नावाचा पडेल चित्रपट काढून अक्षरशः 'मोकळा' झाला !

खरं तर ह्यापूर्वी हा विषय मागितला होता महमूदनंच. थेट दादा कोंडकेंकडे न जाता त्यानं बाळासाहेब ठाकऱ्यांच्या मध्यस्थीनं दादांशी संपर्क साधायचा प्रयत्न केला. दादा कोंडकेंना बाळासाहेब ठाकऱ्यांनी सरळ हिंदीच्या राइट्सबद्दल दीड लाख मागायला सांगितले. मेहमूदला काही ते पटलं नाही आणि त्यानं उत्तरादाखल 'जनता हवलदार' नावाचा पडेल चित्रपट काढून दाखवला.

दरम्यान एक गरजू निर्माता दादांकडे आला आणि हिंदीचे राइट्स घेऊन गेला. त्यानं असरानी आणि जगदीपला घेऊन 'दो हवलदार' काढला. दादा कोंडकेंनी निर्माण केलेल्या इमेजमध्ये असरानीला काही स्वतःला फिट बसवता आलं नाहीच. चित्रपटही पडला.

आता मात्र दादा कोंडकेंनी स्वतःचा विषय स्वतःच हिंदीत आणायचं ठरवलंय. बजेटमध्ये कुठेही तडजोड नाही. इथं असलेलं फर्निचर सगळं त्यांनी सरळ विकतच घेतलंय. मध्येच फर्निचरवाल्यानं भाड्याचं फर्निचर घेऊन जायचं आणि आपण कंटिन्युटीत अडकायचं असला प्रकारच नको.

### पाच पायांचं बकरं

चित्रपटासाठी लागणाऱ्या दोन बकऱ्या त्यांनी देवनारच्या १५ हजार बकऱ्यांतून निवडून आणल्या. लोक म्हणाले, 'दादा, बकऱ्या त्या काय अन् त्यासाठी एवढा आटापिटा !' दादाही काही कमी नव्हतेच.

'हिंदी चित्रपट म्हणजे खायचं काम नाही' म्हणणाऱ्या ह्या लोकांना त्यांचं उत्तर तयार होतं. 'हिंदी चित्रपट काढतोय. काय खायचं काम हाय व्हय ?'

मराठीला चार पायांचं बकरं व्हतं, मंग हिंदीला पाच पायांचं नको ?'

पहिल्याच शेड्यूलमध्ये सगळ्या हिंदी कलाकारांच्या डेट्स घेऊन त्यांचं काम ज्या ज्या सेट्सवर होतं, ते सारे ५—६ सेट्स एकाच वेळी जयप्रभा स्टुडिओत उभे केले.

आता ह्या हिंदी चित्रपटाचं आकर्षण आहे ममद्याच्या भूमिकेत अमजदखान. अमजदलाही स्वतःला विनोदी भूमिका करायला आवडतं आणि हिंदीतले हे शॉट्स घेता घेता जाणवायला लागलं की, अमजद अत्यंत चपखल बसतो आहे ह्या भूमिकेत. जणू त्याच्यासाठीच लिहिली असावी ही भूमिका !

'राम राम गंगाराम'चा नायक, नायिका,

आये हे सर्व प्रमुख कलाकार तेच ठेवले असताना ममद्याच्या भूमिकेसाठी अशोक सराफऐवजी अमजदला आणण्याचं मूळ कारण अमजदचं हिंदीतलं जबरदस्त मार्केट हेच आहे ना?' असं विचारलं असता दादा कोंडकेंनी सविस्तर कारणं सांगायला सुरुवात केली.

'हिंदीसाठी माझ्या मनात अशोक सराफ मुळी नव्हताच. अमजदच होता अमजद मिळाला नसता तर प्रश्न होता; पण अमजदनं पटकन 'हो' म्हटलं आणि तसा प्रश्न उद्भवलाच नाही. फिगरच्या दृष्टिकोणातून ह्या भूमिकेत अमजद जेवढा फिट आहे, तेवढा अशोक नाही. आता ह्या गावातला हिरॉइनचा बाप–सावकार इतका दुष्ट आहे की, त्यानं कित्येकांना म्हणता म्हणता खतम केलेलं आहे. असा हा सावकार गंगारामला कसा काय शिल्लक ठेवतो? —हा प्रश्न आता उद्भवणारच नाही. कारण गंगारामचा मित्र ममद्या इतका 'सॉलिड' आहे की, त्याची दहशत ह्या सावकाराला निश्चित बसते. अमजदमुळं आपोआपच हे समर्थन मिळालं आहे.

**अमजदनं जे सीन्स एका टेकमध्ये केले, त्यासाठी अशोकवर मला अर्धा अर्धा दिवस घालवायला लागला होता. ह्याउलट आता अमजदकडून इतकं उत्स्फूर्त काम मिळतंय की, त्यामुळं मी माझे स्वतःचेच काही सीन्स कमी करून त्याचे वाढवलेत.**

मारामारीच्या दृश्यात मराठीमध्ये मी व अशोक असे दोघेही लढत असू. आता अमजद असताना गंगारामला लढण्याचं कारणच राहिलं नाहीय आता मी ते दृश्यच बदललंय. ममद्या ठोसाठोशी करतोय आणि गंगाराम मागं बसून खोबरं खातोय. ममद्याची कॅरॅक्टर मधून मधून शेरो–शायरी पेरते. त्याचेही अशोकचे रिटेक्स बरेच होत. ह्याउलट अमजद कॅरॅक्टरच्या ह्या वैशिष्टचालाही पुरेपूर न्याय देतो आहे.

## जोडी जमली!

'अमजद आणि एकूणच 'तेरे मेरे बीच में'च्या हिंदी कलाकारांकडून दादांना इतकं छान सहकार्य मिळालंय की, हा चित्रपट चालला तर आपल्या सर्वच मराठी चित्र पटांच्या हिंदी आवृत्त्या काढायचा त्यांचा बेत आहे. एवढंच नव्हे, तर अमजदबरोबर स्वतःची कायमची जोडी पेश करीत रहाण्याचाही मनसुबा त्यांनी बोलून दाखवला.

दादांच्या हिंदी चित्रपटाच्या निमित्तानं उषा चव्हाणला हिंदीत ब्रेक मिळतो आहे. तशी 'शिरडी के साईबाबा' चित्रपटात एक भूमिका ह्यापूर्वीही तिनं केली होती; पण खऱ्या अर्थानं, नायिकेच्या रूपात हिंदीत ब्रेक मिळतोय तो हाच. हिंदीतल्या लोकप्रिय चित्रतारकांना करारबद्ध करायचा प्रयत्न दादा कोंडकेंनी केला नाही असं नाही; पण —'मी हिरो आहे म्हटल्यावर हेमामालिनी थोडीच तयार होणार आहे?'—इति स्वतः दादाच रीना रॉयनं जाणूनबुजून जूनमधली डेट दिली. इतकं थांबण्यात काहीच अर्थ नव्हता. रीनाचा नाद सोडून दिला. जयप्रदानं होकार भरला; पण आपला पाच–सहा माणसांचा लवाजमा बरोबर येईल म्हणून अट घातली. हे नसते लाड होते. मग दादांनी पुन्हा आपल्या धाडसी स्वभावानुसार वागायचं ठरवलं. सरळ उषा चव्हाणलाच नायिकेची भूमिका दिली. उषानंही हिंदी बोलण्याचा सराव करण्याचा चंग बांधलाय.

हिंदी चित्रपटाशी तुलना करता कोणत्याही भाषेतल्या प्रादेशिक चित्रपटाचं असं एक वैशिष्टय असतं. ते म्हणजे, त्या चित्रपटात प्रतिबिंबित होणारी त्या विशिष्ट प्रांताची संस्कृती. त्या चित्रपटाचं हिंदीकरण झालं की, त्याचं हे विलोभनीय वैशिष्टय नष्ट होतं. कारण हिंदी चित्रपटाचा प्रेक्षकवर्ग भारतभर वेगवेगळ्या प्रांतांतून पसरलेला असतो त्या प्रत्येक प्रांतात 'अपील' होईल अशी एक हिंदी फॉर्म्युला चित्रपटांनी आपली स्वतःची जी संस्कृती निर्माण केली आहे, तिच्या पठडीत जाऊन तो चित्रपट बसतो. मग नायिका जर 'गाव की गोरी' असेल तर ती रंगीबेरंगी, झगमगते घागरे घालून मिरवू लागते. पनघटवर चकचकीत नक्षीदार घागर घेऊन जाऊ लागते. आई गुजराती पद्धतीची (उत्तर भारतात हीच पद्धत रूढ आहे) साडी नेसते. एखादं 'रामभरोसे'चं पानाचं दुकान दिसू लागतं. गाव अवध प्रांतातलं असो की पाटण्याजवळचं, ज्यांना ज्यांना जमेल ती ती पात्रं भोजपुरी संवाद फेकू लागतात.

उषा चव्हाण अशीच 'गाँव की गोरी' बनलेली दिसली. म्हणून विचारलं, तर दादांनी आपण घेतलेल्या खबरदारीविषयी सांगितलं—

'कुठेही 'कमिट' केलेलं नाहीय. कुठचंही एक गाव समजायचं. भोजपुरी भाषा वापरलेलीच नाही. मी जशी हिंदी बोलतो तशीच ठेवलीय. कुणी काहीही समजावं.'

## शुद्ध बोलके चुक्या!

अमजदला आपल्या संवादात अस्सल मराठी शिव्या वापरायला दादा कोंडकेंनी शिकवलंय आणि अमजदही मन लावून शिकलाय. मात्र दादा जेव्हा त्याला' ... 'मै कुछ बोल्या क्या रे?' असा संवाद सांगतात, तेव्हा तो आपला आपल्या ओघात 'मै कुछ बोला?' असं शुद्ध बोलून जातो आहे.

**मात्र 'गंगाराम'ला हिंदी अवतारात सादर करता करता कित्येक शाब्दिक कोटचांवर पाणी सोडावं लागलंय. जिथे जिथे विनोद केवळ दृश्य माध्यमातून व्यक्त होऊ शकतो, तेवढाच विनोद केवळ भाषांतरित होऊ शकतो. ही मर्यादा फार जाचक आहे. शब्दनिष्ठ विनोदावर भर देणाऱ्या दादा कोंडकेसाठी तर फारच आणि तरीही विनोदाचं हे आव्हान ते आपल्या सर्वच चित्रपटांकरिता स्वीकारू इच्छितात.**

'माणसाची हसण्याची वा रडण्याची पद्धत जोवर बदलत नाही, भौगोलिक फरकामुळं मानवी भावनांमध्ये जोवर फरक पडत नाही, तोवर दृश्य विनोद भाषांतरित होऊ शकतो आणि यशस्वीही होऊ शकतो. काहीजण म्हणाले, बंगालमध्ये तुमची कॉमेडी बिल्कुल चालणार नाही. मी म्हणतो, बंगालमध्ये लॉरेल हार्डी चालतो नं? चार्ली चॅप्लिन चालतो नं? मग भारतीय कॉमेडी का नाही चालणार?' — त्यांच्या मते आपल्याकडे विनोद फक्त टवाळाला आवडणारा म्हणून निष्कृष्ट समजला गेलाय. विधिनिषेधांच्या जंजाळात सापडून घुसमटलाय. एका परदेशी चित्रपटात डॅनी के चालवत असलेलं विमान स्वातंत्र्यदेवतेच्या पुतळ्याला टक्कर देणार, एवढ्यात तो पुतळाच झटकन खाली वाकतो! आता असा विनोद आपल्याकडे करायचा म्हटला तर गांधींच्या पुतळ्याचा अपमान केला म्हणून लोक आरडाओरड करणार.

'पारतंत्र्यात इतकी वर्षं आपण काढली, की हसणं विसरून गेलो. दुःख माणसाला

कायम चिकटून आहे आणि हसवणं महाकठीण ! म्हणून तर यशस्वी होण्यासाठी चार्ली चॅप्लिन आणि राजकपूरलासुद्धा आपल्या कॉमेडीला ट्रॅजेडीची किनार लावावीच लागली.

कॉमेडीविषयी दादांचं तत्त्वज्ञान खरोखरीच मौल्यवान आहे. त्यांच्या विनोदाचं महत्त्वाचं वैशिष्टय म्हणजे एकीकडे द्वयर्थी संवाद आणि एकीकडे कॉमेडीविषयीचा हा गंभीर विचार – हे काहीसं विरोधाभासयुक्त व्यक्तिमत्त्व वाटू लागतं खरं आणि तरीही त्यात कुठे तरी सुसंवाद आहे. कारण ते स्वत: मुळी ह्या द्वयर्थाला अश्लील समजतच नाहीत.

### हुकमी एक्का

त्यामुळं संवादातल्या गीतांतला हा द्वयर्थ हा हिंदीतही त्यांचा हुकमी एक्का ठरला तर नवल नाही. ' तेरे मेरे बीच में ' ची गाणी घेऊन सेन्सॉरबोर्डाशी ते कसा कायं सामना देणार आहेत ते पहाणं मनोरंजक ठरेल.

सध्या तरी गाणं म्हणण्याकरिता उषा मंगेशकरांना ते कन्व्हिन्स करू शकले नाहीत आणि मग ते गाणं अलका याज्ञिककडून गाऊन घ्यावं लागलंय. ह्या गाण्यांचे बोल चर्चेचे विषय होतीलच. राम–लक्ष्मणच्या संगीतात नवं काही नसलं तरी डोलायला लावणारं ' ओ. पी. नैयरपण, शंकर–जयकिशनपण ' वगैरे निश्चित आहे.

आणि ह्या ' गंगाराम ' नंतर नंबर लागणार आहे ' सदाशिव ' चा. अर्थात भिस्त सगळी गंगारामवरच आहे !

–रेखा देशपांडे

---

**सर्चलाइट**

# टिक्...टिक्.... घड्याळ

गेली अनेक वर्षे शास्त्रज्ञ आणि पंडितमंडळींना एका गोष्टींचा मोठा अचंबा वाटत आला आहे. ही गोष्ट म्हणजे ' वेळ. ' वेळ कुठून सुरू झाला ? वेळ कुठे चालला आहे ? तो येतो कसा ? त्याचे काय होते ? ही सर्व मोठी कोडीच आहेत. जेव्हा मनुष्य नव्हता, जेव्हा पृथ्वी नव्हती, जेव्हा सूर्यदेखील नव्हता तेव्हा वेळ होता आणि पुढे सुद्धा जेव्हा सूर्य, पृथ्वी नष्ट होतील तेव्हा वेळ असणार आहे ! आपल्याला वेळ कधीकधी चटकन गेला असे वाटते तर कधी वेळ जाता जात नाही. खरी गोष्ट अशी आहे की, गेली कित्येक कोटी वर्षे वेळ एखाद्या बाणाप्रमाणे एकाच वेगाने व एकाच दिशेने प्रवास करत आहे.

जवळजवळ इ. स. १६०० पर्यंत माणसाला वेळाचे योग्य मापन करण्याची पद्धती माहीत नव्हती. गॅलिलिओ गॅलिली या शास्त्रज्ञाने प्रथम लंबकाच्या घड्याळाचा शोध लावला. हा शोध कसा लागला याची एक मोठी गमतीदार हकिगत आहे. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी हे महाराज एकदा एका चर्चमध्ये प्रार्थनेला गेले. चर्चमध्ये सर्वजण मान खाली घालून व छातीवर हात आडवे ठेवून मनोभावे प्रार्थना करत होते. त्याच वेळेला कुठूनशा येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकीमुळे चर्चमध्ये टांगलेला मोठा दिवा हालत होता. या महाशयांनी ते बघितलं. बघता–बघता यांना असं जाणवलं की या दिव्याचे प्रत्येक आंदोलन हे समान कालामध्ये होत असावं; पण तिथे ऐनवेळेला ही गोष्ट पडताळून कशी बघणार ?

विचार करा. इथेच तुमच्या–आमच्यात आणि शास्त्रज्ञांमध्ये फरक असतो. शास्त्रज्ञ प्रत्येक जाणवलेली, कळलेली किंवा शोधलेली गोष्ट पडताळून बघतो आणि आपण ?... असो. गॅलिलिओने लंबकाची आंदोलने एकसारख्या वेळाने होतात ही गोष्ट पडताळून बघण्यासाठी एक सोपी युक्ती वापरली. प्रार्थना चालू असताना याने एका हाताने दुसऱ्या हाताच्या मनगटाच्या नाडीवर बोट ठेवलं. त्याला उत्तर मिळालं !

पण खरी गंमत याच्या पुढेच आहे ! गॅलिलिओला हे समजलं तरी ते त्यानं प्रत्यक्षात बऱ्याच उशिरा आणलं. लंबकाच्या घड्याळाचा शोध पुढे काही वर्षांनी लागला.

गॅलिलिओचा अजून एक सिद्धांत म्हणजे ' एक जड आणि एक हलकी वस्तू एकाच वेळेला एकाच उंचीवरून सोडली तर ती एकाच वेळेला जमिनीवर येते. ' या शोधासाठी वापरलेले चित्र फार प्रसिद्ध आहे. गॅलिलिओ पिसाच्या झुकलेल्या मनोऱ्यावर उभा आहे. त्याच्या एका हातात एक छोटा व दुसऱ्या हातात मोठा दगड आहे आणि तो ते खाली टाकतो आहे; परंतु प्रत्यक्षात असे काही घडलेले नाही. प्रयोग करण्यासाठी त्याने एक वेगळीच युक्ती वापरली. त्याने जड आणि हलका असे दोन गोल पदार्थ एका उतारावरून घरंगळत सोडले व त्यांना वरून खाली यायला सारखाच काळ लागतो असे सिद्ध केले; परंतु या प्रयोगाला स्वत: गॅलिलिओनं मात्र घटिकापात्राचा उपयोग केला होता !

कालांतराने कालमापनात बऱ्याच सुधारणा झाल्या. हळूहळू लंबकाची घड्याळे कालमापनामध्ये कमी पडू लागली. कारण लंबकाचे झोके तपमानाप्रमाणे बदलतात हे लक्षात आले.

कामाचा, आयुष्याचा वेग वाढला तसा एक सेकंदसुद्धा मोठा वाटायला लागला. स्प्रिंगची घड्याळे आली; पण तीसुद्धा या वेगाला पुरी पडेनात. शर्यतींमध्ये फार तर फार एकशतांश सेकंद मोजावा लागतो; परंतु प्रयोगशाळेचे तेवढ्यावर भागत नाही. तिथे एकलक्षांश किंवा एकदशकोटीअंश किंवा त्याहूनही कमी वेळ मोजावा लागतो.

वर सांगितल्याप्रमाणे लंबकाची आंदोलने पुरी पडेनात. त्यासाठी दुसरी अत्यंत अचूक अशी पद्धती शोधण्याच्या मागे शास्त्रज्ञ लागले. गेली कित्येक शतके सूर्य, पृथ्वी आणि भव्य अशा तारामंडलाचा उपयोग वेळ मोजण्यासाठी केला जात होता; परंतु त्यांच्या गतीमध्येसुद्धा फरक येतो असे लक्षात आले.

आणि एक दिवस शास्त्रज्ञांच्या प्रयत्नांना यश आले. उत्तर सापडले. भव्य तारामंडलाची जागा अतिसूक्ष्म अशा अणू आणि परमाणूंनी घेतली. या अणूंच्या घड्याळांमुळे वेळेचे मापन अत्यंत अचूक करता येऊ लागले.

### भिंतीवरची घड्याळे

अणूंच्या घड्याळात लक्ष घालण्याच्या

आधी आपण भिंतीवरच्या घड्याळांकडे थोडं लक्ष देऊ. आपल्या साध्या विजेच्या घड्याळात लंबक नसतो; परंतु विजेचा बदलता प्रवाह (A. C.) लंबकाचे काम करतो. आपल्या वीजकेंद्रातून पुरवला जाणारा ४० सायकलस्चा प्रवाह हा सर्वसाधारण कामासाठी पुरेसा असतो.

परंतु त्यापेक्षा चांगल्या घड्याळात क्वार्टझ्चा स्फटिक एक गमतीदार गुणधर्म आहे. त्याला जरका विजेच्या बदलत्या प्रवाहात ठेवला तर तो विशिष्ट अशा गतीने स्पंदन पावायला लागतो आणि जरका अशा एखाद्या स्फटिकाला ऑसिलेटर सर्किटमध्ये बसवला तर त्याच्यामुळे एक स्थिर आणि वैशिष्टयपूर्ण फ्रिक्वेन्सी त्या सर्किटला मिळते. ही फ्रिक्वेन्सी इतकी स्थिर असते की, त्यामुळे घड्याळाला एकास एक कोटी एवढ्या प्रमाणात कार्यक्षमता मिळते.

परंतु तपमानातील बदलामुळे या स्फटिकाच्या फ्रिक्वेन्सीमध्ये किंचित फरक पडतो. तसेच हा स्फटिक जसजसा जुना होऊ लागतो तसतशी त्याची नैसर्गिक फ्रिक्वेन्सी बदलत जाते.

मूलतः सर्व घड्याळे ही कुठल्या तरी मूळ घड्याळाला धरून लावावी लागतात. हे मूळ घड्याळ म्हणजे दिवसाच्या चोवीस तासांत फिरणारी पृथ्वी; परंतु पृथ्वीची स्वतःभोवती फिरण्याची गती इतकी बदलते की काय वाट्टेल ते केलं तरी एकास वीस दशलक्ष याच्यापेक्षा कार्यक्षम घड्याळ बनवता येणे अशक्य होऊन जाते. यावरून आपल्यास एक गोष्ट लक्षात येईल की, शास्त्रज्ञ एवढा आटापिटा का करत आहेत आणि अणूंचे घड्याळ हे त्यांना सापडलेलं योग्य उत्तर आहे.

अणूंची सतत एखाद्या लंबकासारखी हालचाल चालू असते आणि ती सुद्धा कमालीच्या कार्यक्षमतेने.

अणूंच्या जगात काही काही हालचाली या इतक्या भयंकर गतिमान असतात की, त्या अत्याधुनिक उपकरणांनीसुद्धा मोजता येत नाहीत. उदाहरणार्थ जे इलेक्ट्रॉन्स स्पंदनांमुळे प्रकाशकिरण बाहेर टाकतात ते इतक्या प्रचंड वेगाने स्पंदन पावत असतात की, ही स्पंदने मोजणे अशक्य आहे; परंतु अणूंची मायक्रोवेव्ह विभागातील स्पंदने ही हल्लीच्या तंत्रज्ञानामुळे मोजणे शक्य झाले आहे. त्यांची फ्रिक्वेन्सी असते काही कोटी सायकलस् प्रतीसेकंद फक्त !

## अमोनियाचे घड्याळ

अमोनियाच्या रेणूच्या हालचालींवर पहिले घड्याळ बनवले गेले. अमोनिया हा रेणू एक नायट्रोजन व तीन हायड्रोजनच्या अणूंपासून बनलेला असतो. त्यांची रचना सुद्धा विशिष्ट असते. ते एका त्रिकोणी पिरॅमिडच्या आकारात बसलेले असतात. तीन हायड्रोजन म्हणजे त्रिकोणी पाया व एक नायट्रोजन म्हणजे कळस.

सर्वसाधारणपणे सर्व अणूंची त्याच जागी रहाण्याची प्रवृत्ती असते. अमोनियाचे मात्र तसे नाही नायट्रोजन हा नेहमी त्रिकोणी पायातून वर-खाली हालचाल करत असतो; (आकृती १) परंतु ही हालचाल एका ठराविक फ्रिक्वेन्सीलाच होते. ही फ्रिक्वेन्सी अमोनियासाठी २३८७० मेगा सायकलस् एवढी आहे.

जेव्हा जेव्हा अमोनियाचा रेणू उद्दीपित केला जातो, तेव्हा तेव्हा नायट्रोजनचा अणू एखाद्या लंबकाप्रमाणे वरखाली हालचाल करायला लागतो; परंतु अमोनियाच्या नैसर्गिक फ्रिक्वेन्सीने जर का त्याला उद्दीपित केले तर मात्र त्याची ही हालचाल भयंकर जोरात होते. याचाच दुसरा अर्थ असा की या फ्रीक्वेन्सीला तो सर्वांत जास्त ऊर्जा ग्रहण करून त्याचे मोठ्या पण ठराविक स्पंदनांमध्ये रूपांतर करतो. २३८७० मेगासायकलस्ची रेडिओवेव्ह अमोनियाला सर्वांत जास्त प्रमाणात कार्यप्रवण करते.

अमोनियाच्या घड्याळाची रचना मोठी हुषारीने केलेली असते. आपला नेहमीचा क्वार्टझ् स्फटिक अशा फ्रिक्वेन्सीने स्पंदन पावायला लावतात की, या फ्रिक्वेन्सीला तांत्रिक पद्धतीने वाढवत नेले तर ती अमोनियाच्या रेणूच्या नैसर्गिक फ्रिक्वेन्सीएवढी होईल. ही गतिमान स्पंदने एका अँटेनाच्या मदतीने रेडिओवेव्हमध्ये रूपांतरित करून नंतर एका लांबट चेंबरमध्ये किंवा नळीमध्ये सोडली जातात. या चेंबरमध्ये अमोनिया वायू ठेवलेला असतो.

जर का आत येणाऱ्या लहरींची फ्रिक्वेन्सी बरोबर अमोनियाच्या रेणूच्या नैसर्गिक फ्रिक्वेन्सीएवढी असेल तर बहुतेक सर्व शक्ती या लहरींकडून अमोनिया मिळवतो व दुसऱ्या टोकाला अगदी थोड्या लहरी पोचतात. या ठिकाणी सर्व लहरी गोळा केल्या जातात आणि पुन्हा त्या पहिल्या स्फटिकाच्या ऑसिलेटरला दिल्या जातात. त्याचबरोबर एक नेहमीचे विजेचे घड्याळ त्याला जोडून दिलेले असते. या घड्याळामध्ये 'अमोनिया' फक्त स्फटिकाच्या घड्याळात येणारे सर्व मामुली दोष दूर करण्याचे काम करतो. हे घड्याळ दोनास दहा कोटी एवढ्या कमी प्रमाणात चुका करते; परंतु शास्त्रज्ञ एवढ्यावर समाधानी नव्हते. त्यांना याच्यापेक्षा अचूक घड्याळ बनवायचे होते.

## सिझियमचे घड्याळ

आणि एक दिवस शास्त्रज्ञांनी हेसुद्धा साधलं ! सिझियम या धातूचा उपयोग करून. सिझियम हे सर्वसाधारण तपमानाला एका चकाकणाऱ्या द्रवाच्या स्वरूपात असते.

सिझियमच्या अणूला अमोनियाच्या रेणूप्रमाणे स्वतःची अशी नैसर्गिक फ्रिक्वेन्सी असते. ( ९१९२ मेगा सायकलस् ) प्रथम सिझियम धातू त्याची वाफ होईपर्यंत तापवला जातो. त्याच्यासाठी एका विद्युत-भट्टीचा उपयोग केला जातो. ही वाफ एका सूक्ष्म छिद्रातून एका वातरहित नळीमध्ये सोडली जाते. हे उष्ण अणू एका सरळ रेषेत प्रवास करत दुसऱ्या टोकाला येतात. त्यामुळे त्यांच्यात आदळआपट होत नाही. (अमोनियाचे रेणू एकमेकांवर आपटतात व त्यामुळे अमोनियाच्या घड्याळात थोडी चूक सापडते). त्यानंतर हा अणूंचा प्रवाह अचानक एका विद्युतलोहचुंबकात सापडतो. या सर्व अणूंची उर्जा कमी जास्त असते. या चुंबकामुळे एका ठराविक शक्तीचेच अणू वेगळे काढले जातात. त्यांना नंतर ९१९२ मेगा सायकलस्च्या रेडिओलहरींमधून जावे लागते. ही फ्रिक्वेन्सी एकदम अचूक असेल तर जास्तीत जास्त अणू त्याच्यामुळे उद्दीपित होतात. त्यांना पुन्हा एकदा एका विद्युत-चुंबकामधून पाठवल्यावर फक्त उत्तेजित झालेले अणू बाजूला काढले जातात व नंतर त्यांना एका पट्टीवर धडकायला लावले जाते. त्यामुळे पट्टीतून प्रवाह वाहू लागतो. याचा उपयोग पुन्हा क्वार्टझ्च्या स्फटिकातील दोष दूर करण्यासाठी केला जातो. हे सिझियमचे घड्याळ कमालीचे अचूक आहे.

अर्थात हे सर्व ढोबळ वर्णन झाले. मुळात हे सर्व कमालीचे गुंतागुंतीचे व किचकट असते. परंतु उगाच आपण खोलात कशाला शिरायचे ?

—अमृत पुरंदरे

# माणुसकीचा झरा

दुर्बल घटकांच्या आर्थिक विकासासाठी भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी जाहीर केलेले वीस कलमी आर्थिक कार्यक्रम म्हणजे माणुसकीचे झरेच. मिंटी म्हणजे असाच एक माणुसकीचा झरा.

अल्पभूधारक, कुष्ठरोगी, विद्यार्थी, विणकरी, दुकानदार इ. अनेक घटकांच्या जीवनात मिंटीच्या झऱ्याने वसंत फुलवला आहे. त्याची ही किंचितशी झलक–

- शेत जमिनीच्या कमाल धारणाविषयक कायद्यानुसार जमीन मिळालेल्या ६००० भूधारकांना शेतीसाठी ८७ लाख रुपये दिले आहेत.
- कुष्ठरोग निवारणासाठी आनंदवन व तपोवन येथे आपल्या शाखा उघडून २७०० कुष्ठरोग्यांना ही सेवा त्यांच्या दाराशीच उपलब्ध करून दिली आहे. कुष्ठरोग प्रतिबंधक औषधे तयार करणाऱ्या कंपनीलाही काही लाखांचे आर्थिक साहाय्य देण्यात आले आहे.
- विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व वह्या रास्त भावात मिळण्यासाठी पाठ्यपुस्तक मंडळास चार कोटी रुपये दिले आहेत.
- रास्त भावाच्या ७०० दुकानदारांना रुपये २३ लाखापर्यंत मदत केली आहे.
- हातमागाच्या विकासासाठी ४२८ हातमाग उद्योगांना १५ लाख रुपये दिले आहेत. हस्तकला, ग्रामीण कारागीर व ग्रामोद्योग यांच्या विकासासाठी १५७७ लोकांना ५९ लाख रुपये दिले आहेत.

**मिंटी म्हणजेच महाबँक**

**महाबँक म्हणजेच माणुसकीचा झरा––**



## बँक ऑफ महाराष्ट्र

**[ भारत सरकारचा उपक्रम ]**

**मुख्य कचेरी : "लोकमंगल" १५०१, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५**